सोलापूर
# तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
Solapur Tarun Bharat
छत्रपती संभाजीनगर, अहमदनगर, नांदेड, परभणी, हिंगोली, जालना व बीड येथून वितरित
छत्रपती संभाजीनगर गुरूवार, दि. २१ ऑगस्ट २०२५ ⏮ वर्ष - तिसरे ⏮ अंक १३९ ⏮ पाने : ८ ⏮ किंमत रु. ६/-
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## लोकसभेत सादर झालेली ३ विधेयके काही मिनिटांत संयुक्त संसदीय समितीकडे

नवी दिल्ली : केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत बुधवार २० ऑगस्ट रोजी तीन महत्त्वाची विधेयके सादर केली. ही विधेयके सादर होताच विरोधकांनी सभागृहात प्रचंड घोषणाबाजी आणि गोंधळ सुरू केला. या गोंधळातच अवघ्या काही मिनिटांत ही तिन्ही विधेयके सयुक्त संसदीय समितीकडे पाठवण्याचा निर्णय झाला.

भारतीय संविधानात १३० वी दुरुस्ती सुचविणारे विधेयक, केंद्रशासित प्रदेशांचे सरकार (दुरुस्ती) विधेयक आणि जम्मू आणि काश्मीर पुनर्रचना दुरुस्ती विधेयक ही तीन विधेयके केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांनी लोकसभेत सादर केली. ही



विधेयके सादर होताच विरोधकांनी सभागृहात गोंधळ घालून कामकाजात व्यत्यय आणला.

सरकारने विधेयक आणून सुचविलेल्या १३० व्या दुरुस्तीनुसार पाच वर्षांपेक्षा जास्त तुरुंगवासाची शिक्षा असलेल्या गुन्ह्यात अटक झालेल्या कोणत्याही मंत्र्याला (केंद्र किंवा राज्य) किमान ३० दिवस पोलीस किंवा न्यायालयीन कोठडीत राहिल्यास तत्काळ पदमुक्त केले जाईल. यासाठी कोणाच्याही स्वतंत्र शिफारशीची आवश्यकता नसेल. या विधेयकाला विरोधकांनी तीव्र विरोध केला. काही विरोधी खासदार अध्यक्षांसमोरच्या मोकळ्या जागेत आले. त्यांनी घोषणाबाजी केली. विधेयकाची सरकारी प्रत फाडली. काहींनी तर केंद्रीय गृहमंत्री अमित शाह यांच्या दिशेने फाडलेले कागद फेकले. अमित शाह यांनी सरकार ही तिन्ही विधेयक संयुक्त संसदीय समितीकडे सादर करण्याचा प्रस्ताव ठेवत आहे, असे म्हणत होते त्यावेळीही विरोधक गोंधळ घालत होते. विरोधकांचा भर कामकाज करण्याऐवजी सभागृहात गोंधळ घालण्याकडे असल्याचे चित्र यामुळे निर्माण झाले होते.

### जीएसटी भवनच्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे - अजित पवार

मुंबई : वडाळा येथे उभारण्यात येत असलेल्या जीएसटी भवनच्या चार पैकी पहिल्या इमारतीचे काम डिसेंबर २०२६ पर्यंत पूर्ण करावे. इमारतीचे बांधकाम पूर्ण झाल्यानंतर या इमारतीमध्ये मुंबईमधील भाड्याच्या जागेमध्ये असलेली शासकीय कार्यालये स्थलांतरित करावीत, अशा सूचना उपमुख्यमंत्री अजित पवार यांनी दिल्या. मंत्रालयातील उपमुख्यमंत्री कार्यालयातील समिती कक्षामध्ये जीएसटी भवन येथे विविध शासकीय कार्यालयांना जागा वाटप करण्याविषयी बैठक झाली. त्यावेळी उपमुख्यमंत्री पवार बोलत होते. बैठकीस वित्त विभागाचे अपर मुख्य सचिव ओ. पी. गुप्ता, नियोजन विभागाचे अपर मुख्य सचिव डॉ. राजगोपाल देवरा, सार्वजनिक बांधकाम विभागाच्या अपर मुख्य सचिव मनीषा म्हैसकर, जीएसटी आयुक्त आशिष शर्मा यांच्यासह संबंधित अधिकारी उपस्थित होते.

## उपराष्ट्रपतीपदासाठी एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी भरला अर्ज

नवी दिल्ली : जगदीश धनखड यांनी तब्येतीच्या कारणास्तव राजीनामा दिल्यामुळे रिक्त झालेल्या उपराष्ट्रपतीपदासाठी एनडीएचे उमेदवार सीपी राधाकृष्णन यांनी आज म्हणजेच बुधवार २० ऑगस्ट रोजी सकाळी उमेदवारी अर्ज भरला. सीपी राधाकृष्णन यांच्यासाठी २० जणांनी प्रस्तावक आणि २० जणांनी अनुमोदक म्हणून उमेदवारी अर्जावर सही केली आहे. प्रस्तावकांमध्ये पंतप्रधान नरेंद्र मोदी यांची सही सर्वात आधी आहे. केंद्रीय गृहमंत्री अमित शाह, संरक्षणमंत्री राजनाथ सिंह, भाजपाध्यक्ष जगतप्रकाश नड्डा यांच्यासह एनडीएतील निवडक घटक पक्षाच्या नेत्यांनीही प्रस्तावक म्हणून सीपी राधाकृष्णन



यांच्या उमेदवारी अर्जावर सही केली आहे.

जगदीप धनखड यांच्या राजीनाम्यानंतर देशात पुन्हा एकदा उपराष्ट्रपती निवडले जात आहेत. ही निवडणूक केवळ संसदेच्या वरिष्ठ सभागृहाच्या म्हणजेच राज्यसभेच्या राजकारणाच्या दृष्टीने महत्त्वाची नाही तर त्याचे निकाल येणाऱ्या वर्षांच्या संसदीय कामकाजावरही परिणाम करू शकते. उपराष्ट्रपती या पदासाठी संविधानाच्या कलम ६६ अंतर्गत निवडणूक होते. इलेक्टोरल कॉलेज म्हणजेच लोकसभा आणि राज्यसभेतील निवडून आलेले आणि नामांकित सदस्यच मतदान करतात. या निवडणुकीत गुप्त पद्धतीने मतदान होते.

जिंकण्यासाठी उमेदवाराला एकूण वैध मतांपैकी ५० टक्क्यांपेक्षा जास्त मते मिळवावी लागतात. उपराष्ट्रपतींचा कार्यकाळ पाच वर्षांचा असतो. उपराष्ट्रपती हे देशातील दुसऱ्या क्रमांकाचे सर्वोच्च घटनात्मक पद आहे.या निवडणुकीत एनडीएकडून सीपी राधाकृष्णन यांना उमेदवारी देण्यात आली आहे. सीपी राधाकृष्णन यांची निवड बिनविरोध व्हावी यासाठी केंद्र सरकार प्रयत्न करत आहे. मात्र विरोधात इंडी आघाडीने उमेदवार उभा केला तर निवडणूक होणार आहे.

## आळंदीत इंद्रायणीला पूर, जुना पूल आणि घाटावर जाण्यास बंदी



आळंदी : मुसळधार पावसामुळे संत ज्ञानेश्वर महाराजांच्या आळंदीतील इंद्रायणी नदीला पूर आला आहे. मंदिराच्या दिशेने जाणारा भक्ती-सोपान पूल आणि दर्शन बारीचा पूल पाण्याखाली गेले आहेत. पाण्याचा प्रवाह वाढतच चालला आहे, नदी पात्र सोडून वाहू लागली आहे. पुढचा संभाव्य धोका पाहता जुना पूल आणि इंद्रायणीच्या घाटावर भाविकांना बंदी घालण्यात आली आहे.

पावसामुळे इंद्रायणी नदीच्या पाणी पातळीत वाढ झाली आहे. नदीचे पाणी घाटावर आले आहे तसेच मंदिराच्या परिसरात शिरले आहे. मंदिरात जात असलेल्या भाविकांना सावध राहण्याचा सल्ला देण्यात आला आहे.

पिंपरी चिंचवडमध्ये पवना नदीकिनारी असलेले केजुबाई मंदिर पाण्याखाली गेले आहे. पवना धरणातून पंधरा हजार सातशे मिलिमीटर पाण्याचा विसर्ग पवना नदीत सुरू आहे. पवनेचे पाणी चिंचवडचे ग्रामदैवत असलेल्या मोरया गणपतीच्या भेटीला आले आहे.

## विद्यार्थी स्कूल व्हॅन नियमावली अंतिम करून अधिसूचना जारी करा

मुंबई : विद्यार्थ्यांच्या सुरक्षित वाहतूकीसह रोजगाराच्या संधीसाठी परिवहन विभागाकडून स्कूल व्हॅन नियमावली आणण्यात येत आहे. ही नियमावली अंतिम करून याबाबत तातडीने अधिसूचना जारी करावी, असे निर्देश परिवहन मंत्री प्रताप सरनाईक यांनी दिले.

परिवहन आयुक्त कार्यालयात आयोजित बैठकीत स्कूल व्हॅन बाबत सादरीकरण करण्यात आले. त्यावेळी मंत्री सरनाईक बोलत होते. बैठकीस परिवहन आयुक्त विवेक भीमनवार, सहसचिव राजेंद्र होळकर, अपर परिवहन आयुक्त भरत कळसकार, सह परिवहन आयुक्त जयंत पाटील आदी उपस्थित होते. सेवानिवृत्त अतिरिक्त परिवहन आयुक्त जितेंद्र पाटील यांनी सादरीकरण केले.

यावेळी मंत्री सरनाईक म्हणाले की, अत्याधुनिक सुरक्षा व सुविधांनी युक्त अधिकृत




स्कूल व्हॅन विद्यार्थ्यांना उपलब्ध होण्यासाठी आधीच्या नियमात बदल करण्यात येऊन नियमावली सुटसुटीत करावी. स्कूल व्हॅनचे भाडे मासिक तत्वावर आणि वर्षाच्या १० महिने कालावधीपर्यंतच घेण्याबाबत बंधन असावे. नियमावलीमध्ये परिवहन समित्यांचे सक्षमीकरण, महिन्यातून एकदा समितीची बैठक होणे, प्रत्येक शाळेने विद्यार्थ्यांच्या सुरक्षिततेसाठी नोडल अधिकारी नेमणे अंतर्भूत असावे.

देशात सुरक्षित विद्यार्थी वाहतूकीसाठी केंद्र सरकारने स्कूल बस नियमावलीचा (ऑटोमोटिव्ह इंडस्ट्री स्टँडर्ड्स अर्थात एआयएस-०६३) आधार घेऊन अद्यावत मानके अर्थात स्कूल व्हॅन नियमावली (एआयएस-२०४ ) तयार केली आहे. चारचाकी १२+१ आसनापर्यंत विद्यार्थी वाहतूक करण्यासाठी वाहनाला शालेय व्हॅनचा दर्जा देण्यात येणार आहे. वाहने इड-तख या श्रेणीतील असतील. यात चालक ओळखपत्र, आपत्कालीन निर्गमन, वाहन प्रवेश, स्टोरेज रॅक यांच्या स्पष्टतेसह आसन रचना, अग्निशमन अलार्म यंत्रणा, वाहन ट्रॅकिंग अशा आधुनिक सुरक्षा तंत्रज्ञानाचा ही समावेश आहे, असेही मंत्री सरनाईक यांनी सांगितले. मंत्री सरनाईक म्हणाले, स्कूल बस भाडे परवडत नसलेले पालक विद्यार्थ्यांसाठी अनेकदा अवैध रिक्षाचा पर्याय अवलंबतात. रिक्षाच्या तुलनेत व्हॅनमध्ये अधिक सुरक्षेची तरतूद आहे. व्हॅनचे दरवाजे बंद असतात. व्हॅनमध्ये शाळेची बॅग, पाण्याची बाटली आणि अन्य साहित्य ठेवण्यासाठी पुरेशी जागा असते.

**अशी असेल स्कूल व्हॅन**

**जीपीएस, सीसीटीव्ही आणि डॅशबोर्डवर स्क्रीन, अग्निशमन अलार्म प्रणाली, दरवाजा उघडा राहिल्यास अलार्म यंत्रणा, ताशी ४० वेगमर्यादेसह स्पीड गव्हर्नर, पॅनिक बटण, आपत्कालीन दरवाजे, स्कूल व्हॅनमध्ये लहान विद्यार्थ्यांना प्रवेशासाठी पायरी, गाडीच्या छतावर शाळेचे नाव.**

## ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली पैसे लावायला भाग पाडणाऱ्या आणि मोठे आमिष दाखवणाऱ्या गेम्सवर बंदी ?

नवी दिल्ली : केंद्र सरकारने संसदेत 'द प्रमोशन अँड रेग्युलेशन ऑफ ऑनलाईन गेमिंग बिल २०२५' नावाचे विधेयक सादर केले आहे. या विधेयकामुळे ऑनलाईन गेमिंगच्या नावाखाली पैसे लावायला भाग पाडणाऱ्या आणि मोठे आमिष दाखवणाऱ्या गेम्सवर लवकरच बंदी येण्याची शक्यता आहे. तसेच या गेम्सशी संबंधित यंत्रणेवर कारवाई होण्याचीही शक्यता आहे.

लोकसभेत केंद्र सरकारने बुधवारी सादर केलेल्या ऑनलाईन रियल-मनी गेमिंग प्लॅटफॉर्मवर बंदी घालणाऱ्या विधेयकामुळे तपास अधिकाऱ्यांना कोणत्याही ठिकाणाची छापा टाकण्याचा आणि बेकायदा गेमिंग सुरू असल्याची शंका आल्यास संबंधित यंत्रणा चालवणाऱ्यांना अटक करण्याचा अधिकार प्राप्त होणार आहे. सरकारचा प्रयत्न विधेयकाद्वारे कौशल्यावर आधारित असलेल्या ई-स्पोर्ट्स आणि सोशल गेमिंगला प्रोत्साहन देणे हा आहे. त्याचवेळी पैसे लावायला भाग पाडणाऱ्या आणि मोठे आमिष दाखवणाऱ्या गेम्सवर बंदी घालणे हा पण सरकारचा हेतू दिसत आहे.

परिसर, इमारत, वाहन, संगणक संसाधन, व्हर्च्युअल डिजिटल स्पेस, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड किंवा इलेक्ट्रॉनिक स्टोरेज डिव्हाइस अशा कोणत्याही ठिकाणी जर प्रवेश नियंत्रण किंवा सुरक्षा कोड उपलब्ध नसेल, तर अधिकाऱ्याला संगणक संसाधने, वर्चुअल डिजिटल स्पेस, इलेक्ट्रॉनिक रेकॉर्ड किंवा स्टोरेज डिव्हाइसवर प्रवेश मिळवण्यासाठी ओव्हरराइड करण्याचा अधिकार तपास पथकातील अधिकाऱ्यांना विधेयकाद्वारे देण्यात आला आहे. सरकारने पैसे लावायला भाग पाडणाऱ्या आणि मोठे आमिष दाखवणाऱ्या गेम्सशी संबंधित सेवा देणाऱ्यास तीन वर्षांची कैद आणि १ कोटी रुपयांचा दंड अशा स्वरुपाची कठोर शिक्षा देण्याची तरतूद विधेयकात केली आहे. यासोबतच, अशा खेळांची जाहिरात, प्रोत्साहन किंवा प्रायोजन करणाऱ्यांसाठी दोन वर्षांची कैद किंवा ५० लाख रुपयांच्या दंडाची तरतूद आहे.

## विभागीय आयुक्त जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते महसूल प्रबोधिनी, येथे मुर्गा लघुपटाचे उदघाटन

### पोलीस कॉन्स्टेबल च्या भूमिकेत पत्रकार आनंद अंभोरे दिसणार

छत्रपती संभाजीनगर (प्रतिनिधी) - उपजिल्हाधिकारी . जोशी यांच्या मार्गदर्शनाखाली व त्यांच्या भारत सासणे ( विभागीय आयुक्त, भारतीय प्रशासन सेवा) लिखित मुर्गा या लघुपटाचे भव्य उदघाटन विभागीय आयुक्त

. जितेंद्र पापळकर यांच्या हस्ते मोठ्या उत्साहात करण्यात आले. यावेळी सुप्रसिद्ध कवी प्रा. डॉ. दासू वैद्य (डॉ. बाबासाहेब आंबेडकर मराठवाडा विद्यापीठ), महानगरपालिकेचे सांस्कृतिक प्रमुख शंभू विश्वास, ज्येष्ठ पत्रकार




छबुराव ताके , पोलीस कॉन्स्टेबल च्या भूमिकेत पत्रकार आनंद तेजराव अंभोरे उपस्थित होते.

लघुपटाच्या निर्मितीत एडिटर व दिग्दर्शक के. चंद्रशेखर यांनी उत्कृष्ट योगदान दिले असून, बॅकग्राऊंड म्युझिक व डबिंग प्रा. जगदीश वेदपाठक (स्टुडिओ मॅजिक, छत्रपती संभाजीनगर) यांचे कार्य विशेष कौतुकास्पद ठरले.या प्रसंगी उपस्थित मान्यवरांनी लघुपटाच्या माध्यमातून दिलेल्या संदेशाचे कौतुक करत दिग्दर्शक व लेखकांचे अभिनंदन केले.

## संयम, संपर्क, समन्वयाने गणेशोत्सव साजरा करावा - जिल्हाधिकारी दिलीप स्वामी

छत्रपती संभाजीनगर, दि.२० - गणेश उत्सव साजरा करतांना कायदा व सुव्यवस्था अबाधित ठेऊन पोलीस प्रशासन व गणेश मंडळ, नागरिकांत संपर्क, संयम आणि समन्वयाने उत्साहात गणेश उत्सव साजरा करावा, असे आवाहन जिल्हाधिकारी दिलीप स्वामी यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयात गणेश उत्सावाच्या पार्श्वभूमीवर आढावा बैठकीचे आयोजन करण्यात आले होते.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी संभाजी अडकुणे, निवासी उपजिल्हाधिकारी जनार्दन विधाते, उपजिल्हाधिकारी संगिता राठोड, उपजिल्हा निवडणूक अधिकारी



देवेंद्र कटके, ग्रामीण पोलीस उपअधीक्षक अन्नपूर्णा सिंह, सर्व उपविभागीय अधिकारी व तहसिलदार उपस्थित होते.

आगामी सण, उत्सवाच्या अनुषंगाने गणेशोत्सव शांततेत पार पाडण्यासाठी सार्वजनिक सुरक्षेची काळजी, वाहतूक व्यवस्था, स्वच्छता, आरोग्य सुविधा तसेच विसर्जनासाठी करण्यात आलेल्या विशेष नियोजनाबाबत संबंधित विभागांना सूचना जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी दिल्या.

गणेश मूर्तींच्या आगमनावेळी तसेच विसर्जनावेळी कायदा व सुव्यवस्था अबधित राखण्यासाठी पोलीस विभागाकडून पुरेशा संख्येने बंदोबस्त ठेवण्यात यावा. विसर्जन मिरवणूकी वेळी वाहतुकीची कोंडी टाळण्यासाठी महत्त्वाच्या मार्गांवर वाहतूक नियमन करण्याचे विसर्जनासाठी नद्या, तलाव तसेच कृत्रिम तलावांवर पुरेशा सुरक्षेच्या उपाययोजना करण्यात याव्यात. तसेच उत्सावाचा काळात कोणाच्याही धार्मिक भावना दुखावणार याची विशेष काळजी घेण्यात यावी. स्वच्छता मोहिम राबवून पाण्याचे प्रदूषण टाळण्यासाठी जनजागृती करावी. पर्यावरणपूरक मूर्ती व नैसर्गिक साहित्याचा वापर करण्याचे आवाहन करण्यात आले. आरोग्य विभागाने आपत्कालीन वैद्यकीय सुविधा व रुग्णवाहिका उपलब्ध ठेवाव्यात. उत्सवाचा काळात जिल्ह्यातील संपूर्ण सार्वजनिक गणेश मंडळाची संपर्क यादी अद्यावत करुन पोलीस प्रशासनाने मंडळाच्या संपर्कात राहावे तसेच अन्न व औषध प्रशासन यांच्याकडून विशेष तपासणी मोहिम राबविण्यात यावी, यात मिठाई, मोदक, नैवद्य, भेसळयुक्त पदार्थ तसेच दुकानावर विशेष लक्ष ठेवण्याचे निर्देशही यावेळी जिल्हाधिकारी श्री. स्वामी यांनी दिले.

## लोक संस्कृतीच्या जतनासाठी विद्यार्थ्यांना व्यासपीठ उपलब्ध करा - राज्यपाल हरिभाऊ बागडे

तभा वृत्तसेवा

छत्रपती संभाजीनगर, दि.२० - लोकसंस्कृतीचे जतन आणि संवर्धन करण्यासाठी शालेय व महाविद्यालयीन विद्यार्थ्यांवर कला आणि संस्कृतीचे संस्कार करण्यासाठी शाळा ,महाविद्यालये आणि विद्यापीठाच्या माध्यमातून व्यासपीठ उपलब्ध करा, असे आवाहन राजस्थानचे राज्यपाल हरीभाऊ बागडे यांनी केले.

केंद्रीय संस्कृती मंत्रालयांतर्गत पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर आणि सांस्कृतिक कार्य संचालनालय, मुंबई यांच्या संयुक्त विद्यमाने एमआयटी महाविद्यालयाच्या मंथन सभागृहात आयोजित दोन दिवसीय 'वारसा सह्याद्रीचा' कार्यक्रमाच्या समारोप समारंभात सांगितले.

राज्यपाल बागडे म्हणाले की, शालेय व महाविद्यालयीन जीवनामध्ये आपल्या कलेचा वारसा विद्यार्थ्यांना माहिती होणे आवश्यक आहे.यामुळे





लोककलांना प्रोत्साहन मिळेल. तसेच नवीन लोककलाकार तयार होतील. हे व्यासपीठ म्हणजे आपल्या प्राचीन लोककलांना जिवंत ठेवणारे माध्यम ठरू शकते. त्यामुळे याकडे लक्ष देण्याचे त्यांनी यावेळी सांगितले.

लोककलांमधून संस्कृती दर्शनही घडते.परस्पर संस्कृतीचा परस्पर कलांची माहिती होते. त्यातून एकतेची संस्कृती तयार होते.भारताचे वैविध्य व त्यातून एकता हे वैशिष्ट्य आहे. ते म्हणाले ,भारताला कोणीही गुलाम बनवू शकत नाही, कारण येथे एकतेची संस्कृती आहे. ही संस्कृती अखंड राहिली तर कोणीही भारताकडे वाईट नजरेने पाहू शकणार नाही. शिक्षण घेत असताना काही बदल स्वीकारण्याची गरज व्यक्त करत भारतीय गुरुकुल शिक्षण पद्धती मधील काही गोष्टीचा समावेश केल्याने त्याचे फायदे आहेत.

कार्यक्रमाच्या यशस्वीतेबद्दल आणि पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूर यांनी अशा महोत्सवांचे आयोजन केल्याबद्दल केंद्राचे संचालक फुरकान खान आणि त्यांच्या टीमचे कौतुक केले.

सांस्कृतिक कार्य संचालनालय, महाराष्ट्र राज्य, मुंबईचे सहसंचालक श्रीराम पांडे, पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्राचे संचालक फुरकान खान, एमआयटीचे संचालक मुनिश शर्मा यांच्यासह विद्यार्थी, नागरिक या कार्यक्रमास उपस्थित होते.

कार्यक्रमाची सुरुवात राष्ट्रगीत आणि महाराष्ट्राच्या राज्यगीताने झाली. मोहिता दीक्षित आणि मिलिंद रमेश कुलकर्णी कार्यक्रमाचे सूत्रसंचालन केले. 'वारसा सह्याद्रीचा' मध्ये ७ राज्यांच्या लोकनृत्यावर थिरकले संभाजीनगरकर ७ राज्यातील २३५ कलाकारांचा सहभाग, सात राज्यांच्या लोककला आणि संस्कृतीचा अनोखा संगम विविध राज्यांतील वाद्यांची संगीतमय सिम्फनी व लोकनृत्यांवर छत्रपती संभाजीनगरचे रसिक थिकरले.

तर विख्यात नृत्यांगणा शमा भाटे यांचे 'कृष्णा द लिबरेटर' हे कथ्थक आणि प्रमिला सूर्यवंशी यांच्या लावणीने प्रेक्षकांच्या मनाला भुरळ घातली.

कार्यक्रमात महाराष्ट्रासह गोवा, गुजरात, राजस्थान, मणिपूर, पंजाब आणि पश्चिम बंगाल या ७ राज्यातील २३५ कलाकारांनी लोककला सादर केली. दोन्ही दिवस महोत्सवाला प्रेक्षकांचा उत्स्फुर्त प्रतिसाद मिळाला.

नृत्यांगना शमा भाटे आणि संचाने 'कृष्णा द लिबरेटर' हे कथ्थक बॅले सादर केले. यात श्रीकृष्णाच्या संकटमुक्तीच्या प्रसंगांना बारकाईने उलगडण्यात आले. भाटे यांच्या दिग्दर्शनाखाली आणि अमीरा पाटणकर व अवनी गद्रे यांच्या नेतृत्वात १४ नृत्यांगनांनी मनमोहक भावमुद्रा आणि आनंदित तालबद्धतेने सादरीकरणाला वेगळ्या उंचीवर नेले. कालियामर्दन, गोवर्धन पर्वत उचलणे, कंस वध, माखन चोरी, गोपी वस्त्रहरण यांसारखे प्रसंग दाखवत गोप-गोपिकांसह सर्वांना संकटातून मुक्त करून निर्भयपणे जगण्याचा संदेश दिला. त्यांनी श्रीकृष्णाचे पर्यावरण प्रेम आणि रूढीवादविरोधी स्वरूपही बारकाईने व्यक्त केले. प्रमिला सूर्यवंशी यांच्या लावणीने महोत्सवात रंग भरले. वेगवान संगीत आणि तालावर थिरकणाऱ्या प्रमिला यांच्या भावमुद्रांनी अस्सल मराठमोळ्या अदाकारीने रसिक मनाला स्पर्श केला. यावर प्रेक्षकांनी अनेकदा हॉल टाळ्यानी दाद दिली.

'डेझर्ट सिम्फनी' या लोकनृत्याच्या सादरीकरणात राजस्थानचे लोकवाद्य खरताल, पुंगी (बीन), चौतारा, कामायचा, सारंगी, मटका, बाजा, ढोलक, मोरचंग यांच्यासह कच्छची वीणा, जोडिया पावा, गमेलू, मंजीरा आणि महाराष्ट्राची नाळ आणि तुतारी यांच्या अनोख्या संगीतमय मिश्रणाने श्रोते थक्क झाले. यानंतर, संतोष नायर यांच्या दिग्दर्शनात तयार करण्यात आलेल्या नृत्य सादरीकरणात गोंधळ, गोव्याचे समई नृत्य, लावणी, राजस्थानचे चरी व कालबेलिया, गुजरातचे राठवा आणि सिद्दी धमाल, मणिपूरचे पुंग ढोल चोलम, पश्चिम बंगालचे पुरूलियाचे नटुआ आणि पंजाबच्या भांगडाच्या सादरीकरणाने प्रेक्षकांची वाहवा मिळवली. सादरीकरणादरम्यान हॉल अनेकदा टाळ्यांच्या कडकडाटाने दणाणून गेला.

विविध राज्यांमध्ये अशा प्रकारचे महोत्सव आयोजित करून एका राज्याची लोकसंस्कृती दुसऱ्या राज्यापर्यंत पोहोचवण्यास मदत होते असे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे संचालक फुरकान खान म्हणाले. तर छत्रपती संभाजीनगरातील प्रेक्षकांना ७ राज्यातील सांस्कृतिक वैविध्य एकाच व्यासपीठावर अनुभवण्याची संधी देणारा हा अविस्मरणीय असा सांस्कृतिक सोहळा ठरल्याचे पश्चिम क्षेत्र सांस्कृतिक केंद्र, उदयपूरचे सहायक संचालक (वित्त एवं लेखा) दुर्गेश चांदवानी आणि कार्यक्रम अधिकारी हेमंत मेहता म्हणाले.

# एमजीएमच्या विद्यार्थ्यांनी सर केला दौलताबाद किल्ला



छत्रपती संभाजीनगर, दि.२० : महात्मा गांधी मिशन विद्यापीठाच्या डिपार्टमेंट ऑफ स्पोर्ट्स, फिजिकल एज्युकेशन अँड योग सायन्स आणि एमजीएम अडव्हेंचर्स स्पोर्ट्स यांच्या वतीने जवाहरलाल नेहरू अभियांत्रिकी महाविद्यालयाच्या राष्ट्रीय छात्र सेनेच्या कॅडेट्स साठी गोगा बाबा टेकडी ते देवगिरी किल्ला अशा एकदिवसीय ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते. यामध्ये ५० पेक्षा अधिक विद्यार्थी सहभागी झाले होते. एमजीएम विद्यापीठाचे कुलपती अंकुशराव कदम, कुलगुरू डॉ. विलास सपकाळ, कुलसचिव डॉ.आशिष गाडेकर, अधिष्ठाता डॉ.जॉन चेल्लादुराई, प्राचार्या डॉ.विजया मुसांडे, क्रीडा संचालक नितीन घोरपडे, विभागप्रमुख डॉ.दिनेश वंजारे यांनी हा ट्रेक यशस्वीपणे पूर्ण केल्याबद्दल सर्व कडेट्स यांचे अभिनंदन केले आहे. यावेळी, विद्यार्थ्यांसमवेत प्रा.रोहित मुडबे हे उपस्थित होते. विद्यापीठाचे अडव्हेंचर इंचार्ज डॉ.शशिकांत सिंह यांच्या मार्गदर्शनाखाली या ट्रेकचे आयोजन करण्यात आले होते.

## छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर अवैध वाहतूक; गाडीसह साडे चार लाख रूपयांचा मुद्देमालासह जप्त



फर्दापूर दि २० छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर सोयगाव फाट्यावर दारू वाहतूक करणारी गाडीसह माल जप्त

फर्दापूर. छत्रपती संभाजीनगर जळगाव महामार्गावर सोयगाव फाट्यावर दारू वाहतूक करणारी गाडी मालासह साडे चार लाख रूपयांचा ऐवज जप्त मंगळवारी सकाळी ४.३०वाजता वैध रित्या दारू घेऊन येणाऱ्या गाडी क्रमांक स्कार्पिओ एम एच १८ डब्लू २७२८ या गाडीला फर्दापूर पोलिस यांनी थांबले असता या गाडी मध्ये ब्रॅण्डेड दारू वेगवेगळ्या प्रकारच्या बाटल्या आढळून आले असता यात दोन जण ताब्यात घेण्यात आले शाहरुख शब्बीर पठाण वय ३२ रा नालापूरा ओल्ड जालना किरण सुरेश जाधव वय ३७ रा सुंदर नगर जिल्हा जालना या दोन्ही आरोपी ताब्यात घेतले असून त्यांच्या वर फर्दापूर पोलिस स्टेशन मध्ये गुन्हा दाखल करण्यात आला यामध्ये दारू आणि गाडी यासह साडे चार लाख रूपयांचा आरोपी कडून मुद्देमाल जप्त करण्यात आला यावेळी फर्दापूर पोलिस स्टेशन चे सहायक पोलिस निरीक्षक प्रफुल्ल साबळे व पोलीस कर्मचारी यांच्या सह गाडी मुद्देमालासह जप्त करण्यात आली

## संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात अकरावीच्या विद्यार्थ्यांसाठी स्वागत समारोह संपन्न



सोयगाव,दि.२० ऑगस्ट - येथील अजिंठा शिक्षण संस्थेच्या संत ज्ञानेश्वर महाविद्यालयात नव्याने ऑनलाईन प्रवेश प्रक्रिया पार पाडून आकरावीच्या वर्गात प्रवेशित झालेल्या विद्यार्थ्यांचा स्वागत समारोह साजरा करण्यात आला. यावेळी प्रमुख पाहुणे म्हणून कमलेश काळे,कार्यक्रमाचे अध्यक्ष प्राचार्य डॉ.शिरीष पवार व कनिष्ठ विभाग प्रमुख डॉ. उल्हास पाटील आदी मान्यवरांची उपस्थिती होती. कार्यक्रमाची सुरुवात सरस्वती पूजनाने करण्यात आली. त्यानंतर विद्यार्थ्यांनी आपले मनोगत व्यक्त केले.प्रमुख मान्यवरांनी विद्यार्थ्यांना महाविद्यालयात कोणकोणते अभ्यासक्रम आहेत याची माहिती दिली.प्राचार्य डॉ. शिरीष पवार यांनी विद्यार्थ्यांना मार्गदर्शन केले व महाविद्यालयात शिक्षणासाठी ग्रंथालय व इतर उपलब्ध सोयी सुविधांबाबत माहिती दिली. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन अल्फिया पठाण व राठोड यांनी केले.कार्यक्रमाचा समारोप राष्ट्रगीताने करण्यात आला. या कार्यक्रमासाठी महाविद्यालयातील शिक्षक वृंद डॉ.एस. एल.पाटील,प्रा.रवींद्र जाधव,प्रा.दिपक लिंबे,बुटुले,प्रा. शंकर कानडे,प्रा.शेख तोफिक,प्रा.ए.ए.सय्यद,प्रा.विनोद चव्हाण, प्रा.स्वाती देशमुख, प्रा.बी.ए.पाटील,प्रा.अनिल मानकर, निकम,योगेश काळे,अश्विनी काळे व शिक्षक शिक्षकेत्तर कर्मचारी यांची उपस्थिती होती या कार्यक्रमाचे आभार अल्फिया पठाण यांनी मानले.

# पोळ्यासाठी मातीचे बैल बनवण्याच्या कामाला वेग

तभा.वृत्तसेवा
सोयगाव,दि.२० ऑगस्ट

श्रावण महिन्याच्या अमावास्येला ग्रामीण भागात साजऱ्या होणाऱ्या पोळा सणाला अवघे चार दिवस उरले आहेत. गावोगाव बैल तयार करण्याची लगबग सुरू झाली आहे. शेतकऱ्याचा साथी मानल्या जाणाऱ्या सर्जा-राजाविषयी कृतज्ञता व्यक्त करण्याचा हा सण ग्रामीण भागात आजही मोठ्या श्रद्धेने साजरा केला जातो.या दिवशी बैलांचे पूजन केले जातेच; पण घरोघरी मातीच्या बैलांचेही पूजन करण्याची परंपरा आजही कायम आहे. कुंभार बांधव मातीतून विविध आकार व डिझाईनचे बैल घडवतात आणि रंगरंगोटी करून सजवतात.

पोळ्याच्या दिवशी बैलांना अंघोळ घालून,शिंगांना रंग लावून,अंगावर झूल चढवून त्यांचा सन्मान केला जातो. त्याचबरोबर मातीच्या बैलांची पूजा करून घराघरात हा सण साजरा होतो.पीओपी व चिनी मातीचे बैल बाजारात विक्रीस येत असले तरी मातीच्या बैलांनाच मागणी असते. दरम्यान नुकत्याच झालेल्या जोरदार पावसाने नदी नाले तुडुंब भरली आहे त्यामुळे बैलांना या नदी नाल्यात अंघोळ घातली जाते अशी ग्रामीण भागात परंपरा आहे.

# कृषी अधिकारी, ग्राम महसूल अधिकारी शेतकऱ्यांच्या बांधावर; गुडघाभर चिखलातून तर कुठे बैलगाडीतून जाऊन नुकसान पाहणी

**तभा वृतसेवा**
**माहूर, दि. २० ऑगस्ट -**

तालुक्यात दि. १५ व १६ ऑगस्ट रोजी अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांच्या हजारो हेक्टर वरील पिकांचे मोठे नुकसान झाले.अतिवृष्टीमुळे पैनगंगा नदीसह नाल्यांना आलेल्या पूरामुळे नदी-नाल्याच्या काठावरील शेतजमिनी खरडून उभे पीक वाहून गेले.माहूर तालुक्यात जवळपास १६,३२७ शेतकरी बाधित, १७,२८३ हे.आर. जमीन खरडून पिके नष्ट, ७६ घरे बाधित, एक दुधाळ जनावर वाहून गेल्याचा प्राथमिक अंदाज वर्तविण्यात आला आहे.मुख्यमंत्री यांनी याबाबत तातडीने नुकसानीचे पंचनामे करण्याचे आदेश दिले असून,

जिल्हाधिकारी यांच्या आदेशानुसार तथा आमदार भीमराव केराम यांच्या निर्देशानुसार



तहसीलदार व तालुका कृषी अधिकारी यांच्या मार्गदर्शनाखाली महसूल व कृषी विभागाच्या वतीने आज बुधवारी तालुक्यातील चारही मंडळात शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन नुकसान पाहणी (क्रॉप डॅमेज सेसमेट/सर्वे) करण्याचे काम ग्राम महसूल अधिकारी, कृषी सहायक यांच्या वतीने युद्ध स्तरावर हाती घेण्यात आले आहे.

दिनांक १५ ,१६ व १७ ऑगस्ट रोजी झालेल्या मुसळधार पावसामुळे माहूर तालुक्यातील चार महसुली मंडळापैकी वानोळा या महसूल मंडळात अतिवृष्टी झाल्याची प्रशासकीय नोंद करण्यात आली आहे. पैनगंगा नदीसह नाल्यांना आलेल्या पुरामुळे शेतजमिनी खरडून गेल्या असून शेतकऱ्यांचे १००% टक्के पीकांचे नुकसान झाले आहे.

या नुकसानीचे पाहणी करण्यासाठी चारही मंडळातील शेत शिवारात शेतकऱ्यांच्या प्रत्यक्ष बांधावर जाऊन या नुकसानीची पाहणी करण्याचे काम युद्धस्तावर हाती घेण्यात आले आहे.ग्राम महसूल अधिकारी व कृषी सहायक हे संबंधित गावचे सरपंच , पोलिस पाटील व शेतकऱ्यांसह त्यांच्या बांधावर पोहचले आहेत.

आज २० ऑगस्ट रोजी माहूर महसूल मंडळातील लांजी सज्जा अंतर्गत ग्राम महसूल अधिकारी चंद्रकांत बाबर व कृषी सहायक सुधीर राजुरकर हे अतिवृष्टी व पैनगंगा नदीला आलेल्या पूरामुळे झालेल्या नुकसानीची पाहणी करण्यासाठी लांजी शेत शिवारात अक्षरशः गुडघाभर चिखलातून,वेळी बैलगाडीतून जात नुकसान ग्रस्त शेतकऱ्यांच्या बांधावर जाऊन पोहोचले आहेत. हे ही नसे थोडके. अतिवृष्टी झालेल्या वानोळा मंडळात पिक नुकसानीचे सर्व सुरू करण्यात आला आहे. तर रुई,बोंडगव्हाण, चौफुली,लोकरवाडी याठिकाणी देखील नुकसानीचे सर्वे करण्याचे काम सुरू झाले आहे.

तालुक्यातील चोरड व भोरड या दोन गावांमधुन कालपासुन जवळपास १०० च्या वर अर्ज आलेले असुन पावसामुळे जमीन खरडुन गेली आहे असे त्यांचे म्हणणे आहे.हीच सारखी परिस्थिती नदीनाल्या काठच्या शेताची या अतिवृष्टी व पैनगंगा नदीला आलेल्या पूरामुळे झालेली आहे.सर्व तलाठी सज्जा हे कृषी विभागाच्या सहकार्याने पाहणी करुन नुकसानीचे अहवाल सादर करण्याच्या कामाला कसून लागले असल्याचे दिसून येत आहेत.

# अर्धापूर तालुक्यात रास्तभाव धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचे धान्य वितरित

**तभा वृतसेवा**
**अर्धापूर, दि. २० ऑगस्ट -**

अर्धापूर : प्रतिनिधी, तालुक्यातील दाभड येथील शासन मान्य रास्तभाव धान्य दुकानातून निकृष्ट दर्जाचे धान्य वितरित केले जात आहे. या दुकानातून दिल्या जाणाऱ्या तांदुळात चक्क किटकांच्या जाळ्या, किडे आणि आळ्या आढळून आल्या आहेत. अशा प्रकारचे निकृष्ट धान्य गोरगरीब कुटुंबांना खाण्यासाठी दिल्या जात असल्यामुळे लाभार्थी आणि नागरिकांमधून तीव्र संताप व्यक्त होत आहे.

मागील दोन दिवसांपुर्वी एका कार्यक्रमात एक तहसीलदार शासकीय कार्यालयात खुर्चीवर बसून गाणे गात असल्याचा व्हिडिओ व्हॉयरल झाल्यानंतर त्यांच्यावर योग्य ती कारवाई करण्यासाठी येथील कर्तव्यदक्ष जिल्हाधिकारी महोदयांनी तात्काळ विभागीय आयुक्तांना अहवाल सादर केला आणि विभागीय आयुक्तांनी तेवढ्याच तत्परतेने



त्या तहसीलदाराविरूध्द निलंबनाची कारवाई केली. अशीच तत्परता दाखवून अर्धापूर तालुक्यातील पुरवठा विभागाअंतर्गत गोरगरीब कुटुंबांना अळ्या आणि किडे मिश्रित निकृष्ट तांदूळ वाटप करुन त्यांच्या आरोग्याशी खेळण्याचा गंभीर प्रकार थांबवून संबंधित यंत्रणा आणि अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्यावर निलंबनाची कारवाई कोण करणार ? असा प्रश्न जिल्हाधिकाऱ्यांना नागरिकांमधुन विचारला जात आहे.

तालुक्यातील अनेक गावात स्वस्त धान्य दुकानांतर्गत निकृष्ट धान्य वाटप करण्यात आल्याची चर्चा सर्वत्र होत असतानाच दाभड येथील जागरुक नागरिकांनी येथील स्वस्त धान्य दुकानातून वाटप करण्यात आलेल्या तांदूळाची पाहणी केली असता यात अळ्या, किडे आणि किटकांच्या जाळ्या आढळून आल्या. या प्रकारामुळे येथील अन्नसुरक्षा योजनेच्या लाभार्थ्यांसह नागरिकांनी संताप व्यक्त केला आहे. तर अशा प्रकारचे निकृष्ट दर्जाचे तांदूळ शासनाकडून पुरविल्या जात असल्यामुळे येथील स्वस्त धान्य दुकानदार आलेले धान्य ग्राहकांच्या माथी मारत आहेत. यात स्वस्त धान्य दुकानदारांना मात्र ग्राहकांच्या रोषाला समोरे जावे लागत आहे. या निकृष्ट धान्य वाटप प्रकरणी संबंधित गुत्तेदार आणि अधिकाऱ्यांची चौकशी करून त्यांच्याविरुद्ध योग्य ती कार्यवाही करावी, अशी जनतेतून मागणी केली जात आहे.

## शहरात पादचारी पुलासाठी खा. रविंद्र चव्हाण यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**मुदखेड, दि. २० ऑगस्ट -**

मुदखेड शहर हे रेल्वे जंक्शन चे ठिकाण असून या या मार्गावरुन अनेक रेल्वे धावतात. मुदखेड शहर हा दोन भागात विभागले असून उत्तर व दक्षिण भागाला जोडण्यासाठी भुयारी मार्ग तयार करण्यात आला पण या भुयारी मार्गातून ये जा करण्यासाठी पायी चालणाऱ्या नागरिकांना कोणतीही व्यवस्था करण्यात आली नाही.



भुयारी मार्गात लाखो रुपये खर्च करून सुद्धा पायी चालणाऱ्या नागरिकांना याचा मात्र उपयोग होताना दिसत नाही भुयारी मार्ग अरुंदअसून या मार्गात पादचाऱ्यांसाठी पथ मार्ग उपलब्ध नाही. त्यामुळे मुदखेड शहरातील नागरिक हे आपला जीव धोक्यात घालून रेल्वे रूळ ओलांडून ये-जा करत असतात पण रेल्वे प्रशासनाने आपल्या हद्दीमध्ये संरक्षण भिंत बांधकामाचे प्रस्तावित केल्यामुळे शहरातील व ग्रामीण भागातील नागरीकांना विद्यार्थ्यांना ये-जा करण्यासाठीसाठी अडचण निर्माण होणार आहे.

त्यामुळे मुदखेड येथील रेल्वेच्या मार्गावरून पादचारी पुल किंवा पादचारी भुयारी मार्ग करण्याची मागणी समस्त मुदखेड वासीयांच्या वतीने खासदार रविंद्र चव्हाण यांना निवेदनाद्वारे मागणी केली आहे.

खासदार रवींद्र चव्हाण यांनी सदरील प्रकरणी लक्ष घालून मुदखेड वासियांना या त्रासातून मुक्त करावे अशी मागणी (उबाठा) शिवसेना पक्षाचे शहर संघटक बाळू चंद्रे, विलास मेड, माजी शहर प्रमुख अंकूश मामीडवार, सचिन चंद्रे, महम्मद बुराण, बालाजी गुडमलवार, संजय सोनटक्के, राम हमंद, नारायण शहाणे, ब्रिजराज ठाकूर, संतोष गायकवाड, यासह आदिंच्या स्वाक्षऱ्या आहेत.

# खेळाडू म्हणून सदैव क्रीडा क्षेत्रासाठी कार्य करू - आ.आंनद बोंढारकर

**तभा वृतसेवा**
**नवीन नांदेड, दि. २० ऑगस्ट -**

कवठा येथील शारीरिक शिक्षण महाविद्यालय मैदानावर मुली व मुले राज्यस्तरीय रस्सीखेच स्पर्धेत राज्यभरातून खेळाडू व प्रशिक्षक असे ५०० जण सहभागी झाले होते.याप्रसंगी खेळाडूंना संबोधित करताना आ.बोंढारकर यांनी सांगितले की मी खेळाडू म्हणून सदैव क्रीडा क्षेत्रासाठी कार्यकरू आसे मत व्यक्त केले.

भारतीय स्वातंत्र्य दिनाचे औचित्य साधून टग ऑफ वार फेडरेशन ऑफ इंडिया यांच्या मार्गदर्शनाखाली महाराष्ट्र टग ऑफ वार असोसिएशनच्या मान्यतेने तसेच नांदेड जिल्हा टग ऑफ वार (रस्सीखेच) असोसिएशन आयोजित २६ व्या सबज्युनिअर मुले मुली व ज्युनिअर मुली व



महिला मिक्स राज्य अजिंक्यपद स्पर्धा १७ ऑगस्ट रोजी सकाळी ११ वाजता शारीरिक शिक्षण महाविद्यालय कौठा येथे पार पडल्या. या स्पर्धेत राज्यभरातून जवळपास ५०० खेळाडू सहभागी झाले होते. या रस्सीखेच स्पर्धेत राजधानी मुंबई यांनी जेतेपद पटकावले तर द्वितीय स्थानावर उपराजधानी नागपूर आणि तिसरे स्थान यजमान नांदेडला मिळाले . या स्पर्धेसाठी मोठ्या प्रमाणात नांदेड येथील खेळाडू मंडळी सहभागी होऊन स्पर्धेचा आनंद घेतला.रस्सीखेच स्पर्धेचे उद्घाटन आमदार आनंदराव पाटील तिडके बोंढारकर, अध्यक्षस्थानी माधवी पाटील तर या कार्यक्रमाला जिल्हा क्रीडा अधिकारी जयकुमार ठोंबरे ,गोकुळ तांदळे, जनार्दन गुपिले, रस्सीखेच संघटनेचे नांदेड अध्यक्ष बालाजी शेळके, डॉ. जगदीश गादेवार ,संयोजक डॉ. राहुल वाघमारे , तुलजेस यादव, सुहास खराणे, दीपक बच्चेवार ,एड. सुहास आहेर, बाबा गायकवाड, प्रा डॉ दिलीप भडके, बालाजी पा. ब्राह्मणवाडेकरप्रा, डॉ बालाजी जाधव, आरती रामांबणवाडं, ज्योती गायकवाड, बालाजी शिरसीकर, छाया कोठे, विनोद जमदाडे , कुलदीप सिंग जट, स्पर्धाचे आयोजक समिती अध्यक्ष दिगंबर शिंदे , आदींची मंचावर उपस्थिती होती. यावेळी आपल्या भाषणामध्ये बोलताना आमदार बोंढारकर यांनी मी स्वतः खेळाडू असल्याने क्रीडा क्षेत्रात माझी रुची आहे, त्याकरिता निश्चितपणे क्रीडा क्षेत्रासाठी भरीव असे योगदान आपण देऊ असा विश्वास यावेळी उपस्थित खेळाडू आयोजक यांना त्यांनी दिला.कार्यक्रमाचे संचलन दिगंबर शिंदे तर आभार डॉ. राहुल वाघमारे यांनी मानले.

## मार्शल आर्ट्स मधील ब्लॅक बेल्ट डिग्री २० विद्यार्थी प्रदान करून सन्मानित



बिडकीन दि २० ऑगस्ट ७९ व्या. स्वातंत्र्यदिनानिमित्त औचित्य साधून चित्तथरारक उत्कृष्ट प्रात्यक्षिके सादर करीत मार्शल आर्टस च्या विद्यार्थ्यांनी मिळवायला ब्लॅक बेल्ट २० विद्यार्थ्यांना मार्शल आर्ट्स मधील महत्त्वाची जगप्रसिद्ध मानली जाणारी ब्लॅक बेल्ट डिग्री विद्यार्थ्यांना प्रमुख पाहुण्यांच्या हस्ते प्रदान करण्यात आली. कार्यक्रमाचे आयोजन मिशन मार्शल आर्ट्स अँड वुशु कुंग- फु स्पोर्ट्स कराटे असोसिएशन (इंडिया) छत्रपती संभाजीनगर स्पोर्ट्स अकॅडमी ने केले होते.

प्रमुख पाहुणे दत्ता भांगे, सचिन क्षीरसागर (विभाग नियंत्रक,महाराष्ट्र राज्य मार्ग परिवहन महामंडळ छत्रपती संभाजी नगर )मिशन मार्शल आर्ट अकॅडमी चे संस्थापक अध्यक्ष मास्टर पवन घुगे, सचिव व मुख्य कराटे प्रशिक्षक प्रविन घुगे,मनोज पेरे ,अजय घुगे बारगजे वाघमारे (स. नि. वरिष्ठ पोलीस निरीक्षक ) पंकज यादव श्रीधर मस्के, कापकर साहेब, विजय आघाव, पाथरकर, सिस्टर जिना चॅको ( मुख्याध्यापिका डीव्हाईन चाइल्ड स्कूल, बिडकीन) फिलोमीना सिस्टर (डीव्हाईन चाइल्ड स्कूल, बिडकीन) यांच्या हस्ते विद्यार्थ्यांना ग्रेड बेल्ट, ब्लॅक बेल्ट डिग्री व प्रमाणपत्र वितरण करण्यात आले.मार्शल आर्टस मधील, कराटे, कुंग फु, तायक्कांदो, व वूशू, हाप -किडो, मधील सश बेल्ट ग्रेडिंग ब्लॅक बेल्ट डिग्री खालील विद्यार्थ्यांना वितरण करण्यात आली विद्यार्थ्यांची नावे-: मुली :- कु. मानसी क्षीरसागर,इस्मिता गाडगे, आश्लेषा रीडलॉन, सान्वी कबले, दिव्या वडगावकर,सान्वी बिंगले, रुजुला वडगावकर, अनुप्रिया सुपेकर, प्राची घोरपडे, रोशनी टोकटे, तेजस्विनी कराळे,राजश्री मेढे.मुले:- अर्णव रीडलॉन, गजराज चावरिया, विहान शरद, श्लोक करमाळकर, श्रेयश पेरे, भव्य बगडिया.कार्यक्रमाचे संयोजक -: कराटे प्रशिक्षिका नंदा घुगे, राधा घुगे, अनुश्री घुगे, धनश्री तनुश्री घुगे, धनश्री शिदवाळकर,कोमल राठोड, ऋतुजा रणवळकर , प्रशिक्षक श्याम बुधवंत राम चौरे. गौरव टोकटे, यशोधन घुगे. कार्यक्रमाचे सूत्रसंचालन प्रवीण घुगे यांनी केले व उपस्थित पालक वर्ग यांनी विद्यार्थ्यांचे कौतुक केले व शुभेच्छा दिल्या.

# महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळास स्वायत दर्जा द्या

## संजय कौडगे यांच्या नेतृत्वाखाली पालकमंत्र्यांना निवेदन

**तभा वृतसेवा**
**नांदेड, दि. २० ऑगस्ट -**

राज्य शासनाने २०२३ मध्ये जगज्योती महात्मा बसवेश्वर आर्थिक विकास महामंडळाची स्थापना करून यावेळी ५० कोटी रुपयांचे अनुदान दिले होते. या अनुदानाचा लाभ केवळ ओबीसी प्रमाणपत्र असणाऱ्या लाभार्थ्यांनाच मिळाला होता. पण विरशैव लिंगायत समाजातील ८० टक्के नागरीकांकडे आजही ओबीसीचे प्रमाणपत्र नाहीत. यामुळे समाजातील सर्व घटकांना याचा लाभ मिळाला पाहिजे. याचबरोबर या महामंडळास स्वायत दर्जा देण्यात यावा अशी मागणी राज्याचे इतर मागास बहुजन कल्याण मंत्री तथा पालकमंत्री यांच्याकडे भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या नेतृत्वाखाली निवेदन देण्यात आले आहे.



राज्य शासनाने ९ ऑगस्ट २०२३० रोजी शासन निर्णय क्रमांक २०२३/प्र.क्र. २७ महामंडळ असे निर्माण केल. यावेळी ५० कोटी रुपयांचा निधी राज्य शासनाने या महामंडळास उपलब्ध करून दिला होता. यावेळी महामंडळ स्थापन करतांना उपकंपनी असा शब्दही जोडला आहे. यामुळे समाजातील ज्या लाभार्थ्याकडे ओबीसी जातीचे प्रमाणपत्र आहे अशांनाच याचा लाभ मिळत आहे. आज राज्यातील जवळपास ८५ विधानसभा मतदार संघात विरशैव लिंगायत समाज मोठ्या संख्येने असूनही त्यांच्याकडे ओबीसीची जातीचे प्रमाणपत्र असणाऱ्यांची संख्या केवळ २० टक्केच्या जवळ आहे. उर्वरीत ८० टक्के लाभार्थ्यांना याचा लाभ मिळत नाही. यामुळे महाराष्ट्रातील विरशैव लिंगायत समाजातील विद्यार्थ्यांना उच्च शिक्षणासाठी, महिलांना गृहउद्योगासाठी तसेच युवकांना उद्योग करण्यासाठी मोठी आर्थिक अडचण निर्माण होत आहे. याचबरोबर राज्य शासनाने महामंडळ स्थापन करतांना हे महामंडळ इतर मागासवर्गीय वित्त आणि विकास महामंडळाअंतर्गत उपकंपनी असल्याचे घोषित केले आहे. यामुळे या महामंडळाला उपकंपनीतून वगळून स्वायत करण्यात याव व या महामंडळासाठी मोठ्या प्रमाणात निधी उपलब्ध करून देण्यात यावा. जेणे करून या समाजातील तरुण, महिला, युवक यांना स्वतः चा व्यवसाय करण्यासाठी ही आर्थिक मदत होणार असल्याचे सांगून आपण राज्य शासनाकडे याचा पाठपुरावा करावा अशा स्वरुपाचे निवेदन दि. १५ ऑगस्ट रोजी पालकमंत्री अतुल सावे या रंना नांदेड येथे भाजपा संघटनमंत्री संजय कौडगे यांच्या नेतृत्वाखाली देण्यात आले. यावेळी विद्यापिठ व्यवस्थापन परिषदेचे सदस्य डॉ. हनमंत खंदारकर, संगमेश्वर बाचे, प्रा. गजानन भवनकर, महेश होकर्णे यांच्या स्वाक्षऱ्या आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

## सणासुदीच्या काळासाठी खास आकर्षक अँटिक संग्रह

पुणे: गणेशोत्सव जवळ येत असताना, कुशाल्स फॅशन आणि सिल्व्हर ज्वेलरीने भारतीय कारागिरी आणि आधुनिक आकृत्या यांचा सुंदर संगम साधणारी खास अँटिक फिनिश दागिन्यांची उत्सवी संग्रहिका सादर केली आहे । ही संग्रहिका भक्तिभावाचा उत्सव साजरा करताना आजच्या स्त्रीसाठी बहुपयोगी आणि स्टाइलिश दागिन्यांचा पर्याय देते ।गणेशोत्सव हा महाराष्ट्रातील सर्वांत प्रिय सणांपैकी एक असून, तो रंग, संगीत, विधी आणि एकोप्याने भरलेला असतो। कुटुंबे मोठ्या उत्साहाने बाप्पांना घरी आणतात, आणि सणाचा लूक पूर्ण करण्यासाठी दागिन्यांची महत्त्वाची भूमिका असते। कुशाल्सचा नवाकोरा संग्रह या परंपरांना मान देत कुशल हातांनी घडवलेल्या आकृत्या आणि नाजूक कारागिरीद्वारे सादर केला आहे, जो परंपरेला साजेसा असूनही सहजपणे आधुनिक वॉर्डरोबमध्ये मिसळतो.

## सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सवाच्या लोगोचे अनावरण

छत्रपती संभाजीनगर : 'सोलापूर सोशल फाउंडेशन'तर्फे २७ सप्टेंबर हा जागतिक पर्यटन दिन ते २ ऑक्टोबर या महात्मा गांधी जयंतीदरम्यान 'सोलापूर जिल्हा पर्यटन महोत्सव २०२५' चे आयोजन करण्यात आले असून या महत्वाकांक्षी महोत्सवाच्या लक्षवेधी लोगोचे अनावरण सोलापुरात मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या हस्ते सोमवारी करण्यात आले. यावेळी पालकमंत्री जयकुमार गोरे, आ. सुभाष देशमुख आणि विविध क्षेत्रातील उपस्थित होते. आमदार आणि माजी वस्त्रोद्योगमंत्री सुभाष देशमुख यांच्या संकल्पनेतून साकारलेला हा महोत्सव सोलापूरच्या सर्वांगीण विकासाची पायाभरणी करणार आहे. सोलापूर जिल्ह्याच्या पर्यटनाचा सर्वांगीण विकास करणे आणि त्या माध्यमातून ऐतिहासिक, धार्मिक, सांस्कृतिक, निसर्ग व ग्रामीण पर्यटनाचा प्रचार व प्रसार करणे या उद्दिष्टाने या महोत्सवाचे आयोजन करण्यात आले आहे.

## ओव्हरअ‍ॅक्टिव्ह ब्लॅडरच्या रुग्णसंख्येत वाढ - डॉ. अतुल सोनी

छत्रपती संभाजीनगर - सोनई हॉस्पिटल, महेश नगर येथील युरॉलॉजिस्ट व अँड्रॉलॉजिस्ट डॉ. अतुल सोनी यांचे म्हणणे आहे की हा आजार केवळ मूत्रसंस्थेपुरता मर्यादित नाही, तर जीवनशैली आणि जीवनमानाशी थेट संबंधित आहे. अनेक रुग्ण लक्षणे झोपेत व्यत्यय आणू लागल्यावर किंवा प्रवास व कामकाजात अडथळा आणू लागल्यावरच डॉक्टरांकडे जातात. तोपर्यंत त्यांचे मानसिक स्वास्थ्य आणि आत्मविश्वास बिघडलेले असते.डॉ. सोनी यांच्या मते, या आजाराबद्दलची कलंकित भावना (ींळसार) हा मोठा अडथळा आहे. अनेकांना वाटते की वय वाढल्यावर मूत्रावरचे नियंत्रण कमी होणे साहजिक आहे. मात्र, योग्य जीवनशैलीत बदल - जसे की कॅफिनचे सेवन कमी करणे, पुरेसे पाणी पिणे, नियमित व्यायाम करणे आणि रात्री उशिरा द्रवपदार्थ टाळणे - यामुळे धोका कमी करता येतो. ते सांगतात की आज उपचार पद्धतीत मोठी प्रगती झाली आहे. न्यूरोमोड्युलेशन थेरपीसारखे नॉन-सर्जिकल पर्याय रुग्णांना लक्षणीय आराम देत आहेत. लवकर हस्तक्षेप केल्यास लक्षणे नियंत्रणात येतात आणि आजार बिघडण्यापासून रोखता येतो.

## दुर्मिळ बुरशीजन्य संसर्गावर उपचार

नाशिक : बाणेर येथील मणिपाल हॉस्पिटलमधील डॉक्टरांना स्वस्थ व्यक्तींमध्ये देखील फुफ्फुसातील बुरशीजन्य संसर्गामध्ये (लंग फंगल इन्फेक्शन) वाढ झाल्याचे निरीक्षण केले आहे. हॉस्पिटलमध्ये पूर्वी पूर्णतः स्वस्थ असलेल्या दोन रुग्णांवर पल्मोनरी अ‍ॅस्परजिलोसिस या आजारावर उपचार करण्यात आला. यामधून निदर्शनास येते की, हंगामी घटकांमुळे (जसे प्रदूषण व वाढलेली आर्द्रता) व्यक्ती असुरक्षित झाले आहेत आणि हे बदल अत्यंत चिंताजनक आहेत. पहिला रुग्ण, ४६ वर्षीय पुरुष, कोरडा व सततचा खोकला, अधूनमधून येणारा ताप आणि वजन कमी होणे या तक्रारींसह हॉस्पिटलमध्ये दाखल झाला होता. छातीच्या स्कॅनमध्ये डाव्या फुफ्फुसाच्या खालच्या भागात न्यूमोनियाचे निदान झाले, ज्यामुळे डॉक्टरांनी सुरुवातीला क्षयरोग (टीबी) किंवा कर्करोग असण्याची शक्यता व्यक्त केली. मात्र, ब्रॉन्कोस्कोपी व बीएएल (ब्रॉन्कोअ‍ॅल्व्हिओलर लावेज) तपासणीत अ‍ॅस्परजिलस फ्लॅव्हस ही कमी ज्ञात बुरशी प्रजाती आढळली. सध्या रुग्ण पूर्णपणे बरा झाला आहे.

## अर्था सेलेक्ट फंड ४३२ कोटी रुपयांवर बंद, १३१% ओव्हरसब्स्क्राइब

छत्रपती संभाजीनगर : अर्था इंडिया व्हेंचर्स (एआयव्ही) यांनी जाहीर केले की त्यांच्या फक्त विजेत्यांसाठी तयार केलेल्या फॉलो-ऑन फंड, अर्था सेलेक्ट फंड (एएसएफ) ने ४३२ कोटी रुपयांची उंची गाठली आहे, जी मूळ लक्ष्य ३३० कोटी रुपयांपेक्षा १३१% जास्त आहे. या कामगिरीमुळे अर्थाचे एकूण एसेट्स अंडर मॅनेजमेंट (एयूएम) १,२०० कोटी रुपयांवर गेले आहे, ज्यामुळे ते भारतातील पहिले आणि एकमेव फॅमिली ऑफिस समर्थित व्हेंचर कॅपिटल संस्थान बनले आहे. एएसएफ पुढील चार वर्षांत, अर्था व्हेंचर फंड १, अर्था कंटिन्युअम फंड आणि लवकरच लॉन्च होणाऱ्या एव्हीएफ २ च्या १३५+ कंपन्यांच्या पोर्टफोलिओमधून अव्वल १५% कामगिरी करणाऱ्या कंपन्यांमध्ये गुंतवणूक करेल. हा फंड १२-१४ विजेता कंपन्यांना सीरिज-बी आणि सी टप्प्यात सरासरी २० कोटी रुपयांचे चेक देईल.

## आम्ही तुमची कहाणी फक्त ऐकणार नाही, तर समजूनही घेऊ

प्रत्येक घरात एक कहाणी असते - काही साजऱ्या केल्या जातात तर काही अनेकदा ऐकल्याही जात नाहीत. आपल्या नवीन 'आपका अपना झी' या ओळखीसह झी टीव्ही सादर करत आहे 'कहानी हर घर की' - एक मन हेलावून टाकणारा नॉन-फिक्शन फॉरमॅट, जो भारतीय महिलांना त्यांच्या अनेकदा न बोलल्या गेलेल्या सत्यांना व्यक्त करण्यासाठी सुरक्षित, आधार देणारी जागा देतो. भावनिक दुर्लक्ष, सामाजिक दबाव, वैवाहिक आव्हाने किंवा करिअरमधील तडजोड - या सर्वांवर प्रामाणिक आणि निःपक्षपाती संवादाचे दार उघडते. प्रत्येक भागात एका शक्तिशाली वास्तविक कहाणीला तज्ज्ञ, मानसशास्त्रज्ञ आणि सेलिब्रिटी पाहुण्यांच्या दृष्टिकोनाची जोड दिली जाईल. आपल्याला आठवण करून दिली जाईल की काही कहाण्या फक्त सांगण्यासाठीच नव्हे, तर खर्या अर्थाने ऐकल्या जाण्यासाठीही पात्र असतात.

## पुष्पा इम्पॉसिबल मालिकेने पूर्ण केले 1000 एपिसोड

सोनी सबवरील 'पुष्पा इम्पॉसिबल' या अत्यंत लोकप्रिय मालिकेने एक मोठा टप्पा गाठला आहे. मालिकेने तब्बल १००० एपिसोड पूर्ण केले आहेत. या मालिकेत पुष्पाची कहाणी सांगितली आहे. करुणा पांडे या अभिनेत्रीने पुष्पाची भूमिका साकारली आहे. पुष्पा एक करारी सिंगल मदर आहे. आपली कर्तव्ये पार पाडतानाही आपल्या स्वप्नांवर पाणी न सोडता ती साकार करण्यासाठी प्रयत्नशील असलेल्या स्त्रीची ही कहाणी आहे.

## मीशो मॉल आणि मॅरिकोची भागीदारी

पुणे : मीशो मॉलने भारतातील पर्सनल केअर आणि वेलनेस ब्रँडचा संग्रह वाढवण्यासाठी मॅरिकोसोबत भागीदारी केली आहे. या भागीदारीमुळे मॅरिकोचे विश्वासार्ह ब्रँड, जसे की पॅराशूट अ‍ॅडव्हान्स्ड, पॅराशूट अ‍ॅडव्हान्स्ड बेबी, लिव्हॉन, काया, बायो ऑइल आणि सेट वेट, मीशो प्लॅटफॉर्मवर उपलब्ध झाले आहेत, ज्यामुळे टियर २ आणि त्यापलीकडे असलेल्या शहरांमधील ग्राहकांना मीशो प्लॅटफॉर्मवरून ही उत्पादने खरेदी करण्याची परवानगी मिळाली आहे.

## पिशोर, शफेपूर येथे गुरुवारी आरोग्य तपासणी शिबिर मेडिकव्हर हॉस्पिटलचा उपक्रम

पिशोर : छत्रपती संभाजीनगर येथील मेडिकव्हर हॉस्पिटल आणि जिल्हा युवा अधिकारी उमेश मोकासे यांच्या संयुक्त विद्यमाने पिशोर (शफेपूर) येथे मोफत आरोग्य तपासणी शिबिराचे आयोजन करण्यात आले आहे. मारुती मंदिर, शफेपूर येथे गुरुवार, २१ ऑगस्ट रोजी सकाळी ११ ते ३ यावेळेत हे शिबिर होणार आहे.यावेळी प्रसिद्ध हृदयरोगतज्ज्ञ डॉ. कुलदीप तोटावार, कान-नाक-घसा तज्ज्ञ डॉ. शरद शेळके आणि सांधेविकार तज्ज्ञ डॉ. कृष्णा आणेराव आदी विशेषज्ञ उपस्थित राहणार आहेत.

### गावातील गावातील स्त्री व पुरुषांची पुतळ्याच्या अनावराच्या दिवशी मोठ्या संख्येने गर्दी

# मंगरूळला शिवाजी महाराज, अहिल्यादेवींच्या पुतळ्यांचे अनावरण

### शिवभक्त मध्ये उत्साहाचे वातावरण, दोन महान महान पुरुषांच्या अनावरणासाठी सर्व समाज एकटला

**गजानन मरकड**

सिल्लोड प्रतिनिधी : तालुक्यातील मंगरुळ येथे शेवटच्या श्रावण सोमवाराचे औचित्य साधत छत्रपती शिवाजी महाराज, लोकमाता आहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांचे थाटात अनावरण करण्यात आले. यावेळी ग्रामस्थांमध्ये विशेषतः तरुणांमध्ये अमाप उत्साह पाहायला मिळाला.

सिल्लोड शहरातील छत्रपती संभाजी महाराज यांच्या चौकापासून ते गावापर्यंत छत्रपती शिवाजी महाराज यांच्या आश्वारुढ तर लोकमाता आहिल्यादेवी होळकर यांच्या पुतळ्यांची भव्य मिरवणूक काढण्यात आली. वाजत- गाजत व फटाक्यांच्या आतिषबाजीत निघालेल्या या मिरवणुकीने सर्वांचे लक्ष वेधून घेतले. तर छत्रपती शिवाजी महाराज, लोकमाता आहिल्यादेवी



होळकर यांच्या जयघोषाने तरुणांनी शहर दणाणून सोडले होते.

अनावरण प्रसंगी सरपंच निवृत्ती वरपे, उपसरपंच शिवाजी बर्डे राजू वडनेरे मधुकर बर्डे संजय बर्डे नागोराव बोर्डे कृष्ण आगळे अंबादास बर्डे, श्रावण हासे, सुखदेव मरकडे महादू इंगळे, सतीश वरपे, बाजीराव हासे, दिनेश बर्डे नितीन बर्डे तेजराव शेलार, सुभाष बोर्डे, भाऊसाहेब पालोदे, काशिनाथ जाधव, विष्णू विजय वर्पे. संपत वरपे ढोरमारे, विलास आगळे विठ्ठल कोरडे ज्ञानेश्वर ज्ञानेश्वर जाधव रामचंद्र हासे सुभाष खेळवणे नंदकिशोर मंगरुळकर, गणेश मिसाळ अमोल खेळवणे, रमेश खेळवणे, योगेश पवार अक्षय बोर्डे दादाराव बर्डे आदींसह ग्रामस्थ मोठ्या सुरेश बोर्डे. विष्णू वर्पे सुरेश बोरुडे व मोठ्या संख्येने ग्रामस्थउपस्थित होते.

चोख पोलिस बंदोबस्त

मिरवणूक व अनावरण कार्यक्रमा प्रसंगी उपविभागीय पोलिस अधिकारी डॉ. दिनेशकुमार कोल्हे, पोलिस निरीक्षक शेषराव उदार, सहायक पोलिस निरीक्षक रवींद्र ठाकरे, उपनिरीक्षक बाबू मुंढे, पोलिस हेडकॉन्स्टेबल सचिन काळे, वैजनाथ काळे, संजय आगे, यतीन कुलकर्णी, सतीश पाटील, राजेंद्र काकडे यांनी चोख बंदोबस्त बजावला.

## वेरूळ येथे २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर दरम्यान सोलह कारण व दशलक्षण महापर्वाचे आयोजन

छत्रपती सभाजीनगर

पार्श्वनाथ ब्रह्मचर्याश्रम जैन गुरुकुल व वेरूळ येथील सकल जैन समाज यांच्या वतीने दिनांक २३ ऑगस्ट ते ८ सप्टेंबर पर्यंत सोलह कारण व दशलक्षण महापर्वाचे आयोजन करण्यात आले आहे.

परमपूज्य १०८ आचार्य विद्यासागर महाराज यांचे परम शिष्य निर्यापक नियम सागर महाराज परमपूज्य ऋषभ सागर महाराज परमपूज्य अभिनंदन सागर महाराज व परमपूज्य सुपार्श्व सागर महाराज यांच्या सानिध्यामध्ये या कार्यक्रमाचे आयोजन करण्यात आले आहे.



दिनांक २३ ऑगस्ट पासून या कार्यक्रमाची सुरुवात होणार असून पहिल्या दिवशी घट यात्रा, मंडप शुद्धी व समोशर्ण मंदिरामध्ये भगवंताची स्थापना होणार आहे दिनांक २४. ८. २०२५ पासून दररोज अभिषेक पूजन शांतीधारा व परमपूज्य मुनीश्री १०८ नियम सागर महाराजांचे सोलहकारण भावना या विषयावर मांगलिक प्रवचन होणार आहे तर ३१ ऑगस्ट रोजी १००८पुष्पदंत भगवान यांचा निर्वाणकल्याणक महोत्सव साजरा करण्यात येणार आहे तसेच याच दरम्यान सुगंध दशमी हा पवित्र व मांगलिक उत्सव उपस्थित सर्व मुनी महाराजांच्या सानिध्यात हर्ष उल्हासात संपन्न करण्यात येणार आहे. या कार्यक्रमासाठी सांगली सोलापूर कोल्हापूर पुणे मुंबई संभाजीनगर कन्नड चापानेर लासुर इत्यादी ठिकाणावरून भाविकांची उपस्थिती राहणार आहे तरी सर्व श्रावक व श्राविकांनी या आत्मोन्नतीच्या महापर्वात व विधानात सामील होण्याचे आवाहन चातुर्मास कमिटीचे अध्यक्ष दिनेश गंगवाल संयोजक नवीन पाटणी महामंत्री प्रेमचंद पाटणी कोषाध्यक्ष सुमित ठोले सहसचिव गौतम ठोले शालेय समिती अध्यक्ष मदनलाल पांडे सदस्य निर्मलकुमार ठोले महेंद्र दगडफोडे गुलाबचद बोराळकर रानू जैन खुशाल जैन यांनी केले. या कार्यक्रमासाठी आवास व भोजन इत्यादींची व्यवस्था करण्यात आली आहे. अशी माहिती अतुल बादे पियुष कासलीवाल सूहास मिश्रीकोटकर नरेंद्र अजमेरा यानी दिली

# शेतकऱ्यांनी वर्षा दोन वर्षांतून एकदा माती-पाणी परीक्षण केलेच पाहिजे शेतकरी मेळाव्यात -संदीप वराले

तभा वृत्तसेवा

बिडकीन दि २० ऑगस्ट पैठण तालुक्यातील श्री स.भु. प्रशाला बालानगर येथे शेतकरी मेळाव्यात संदीप वराले कृषी अधिकारी पैठण यांनी वरील विधान केले.सामाजिकदायित्व या उद्देशाने श्री सरस्वती भुवन शिक्षणसंस्था छत्रपती संभाजीनगर यांच्या प्रेरणेने प्रत्येक शाखेवर शेतकरी मेळावा होतो. कार्यक्रमाचे अध्यक्ष संस्थेचे विश्वस्त अमोल भाले, प्रमुख मार्गदर्शक कृषी अधिकारी पैठणचे संदीप वराले, प्रशालेचे मुख्याध्यापक राजेंद्र गायकवाड, शालेय समितीचे सदस्य भास्कर गोर्डे, महेश सोमाणी,



दिगंबर गोर्डेतात्या या मान्यवरांच्या हस्ते सरस्वती पूजन करण्यात आले. मान्यवरांच्या स्वागत सत्कार करण्यात आला.कृषी अधिकारी पैठण संदीप वराले यांनी आपल्या मार्गदर्शनात शासनाच्या शेतीविषयक वेगवेगळ्या योजना यांची सखोल माहिती देऊन शेतकऱ्यांनी किमान वर्षा दोन वर्षांतून आपल्या शेतीचे माती-पाणी परीक्षण करावे असे आवाहन केले. त्यांनी शेतकऱ्यांच्या प्रश्नांना मनमोकळ्यापणाने उत्तरे देऊन सुसंवाद साधला. अध्यक्षीय समारोपात संस्थेचे विश्वस्त अमोल भाले यांनी शेतकऱ्यांनी स्वावलंबी बनलै पाहिजे, शेतीत आधुनिक तंत्रज्ञानाचा वापर केला पाहिजे. आंतरपिके घेतली पाहिजे. असे स्वानुभवाधारित मार्गदर्शन केले. अनेक शेतकऱ्यांनी या मेळाव्याचा लाभ घेतला.कार्यक्रमाचे प्रास्ताविक मुख्याध्यापक राजेंद्र गायकवाड, सूत्रसंचालन पद्माकर वाघरूळकर, आभारप्रदर्शन सुधाकर येवतीकर, फलकलेखन कलाशिक्षक प्रदीप ब्राह्मणकार यांनी केले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी पंचक्रोशीतील शेतकरी प्रविण गोर्डे, सुरेश गोर्डे व प्रशालेतील सर्वच शिक्षक व शिक्षकेतर सहकाऱ्यांनी सहकार्य केले.

## भाजपा पोलीस मित्र सेवा समितीची सातारा पोलीस स्टेशनला भेट

छत्रपती संभाजीनगर - शहर जिल्हा अध्यक्ष किशोर शितोळे यांच्या मार्गदर्शनाखाली भाजपा पोलीस मित्र समिती ची सातारा पोलीस ठाणे येथे भेट आणि चर्चा झाली.

त्याअनुषंगाने आज सातारा पोलीस ठाणे येथे सदर समिती सह भाजपा शहर जिल्हाध्यक्ष किशोर दादा शितोळे सह शहर जिल्हा सरचिटणीस हर्षवर्धन भैय्या कराड, आणि मंडळ अध्यक्ष ऋषिकेश भालेराव शहरजिल्हा सरचिटणीस ड. ताराचंद गायकवाड यांनी आज पोलीस उपायुक्त मा. प्रशांत स्वामी



सर, पोलीस निरीक्षक कृष्णा शिंदे सर यांच्याशी विविध विषयावर चर्चा केली

यावेळी अ‍ॅड.अरविंद डोणगावकर, आणि पोलीस मित्र सेवा समितीतील सविताताई कुलकर्णी,लक्ष्मण शिंदे, अ‍ॅड. गणेश म्हस्के मीराताई काळे, राहुल देशमुख आणि इतर पदाधिकारी उपस्थित होते

महानगर पालिका निवडणुकीच्या पाश्वभूमीवर भारतीय जनता पार्टीच्या माध्यमातून शहरातील विविध १७ पोलीस ठाण्या अंतर्गत १७ समित्या गठीत करण्यात आल्या आहेत.

जनतेची विविध तक्रारी समन्व्यच्या माध्यमातून सोडवण्यासाठी व नागरिकांना तत्पर न्याय मिळवून देण्यासाठी ही समित्या गठीत करण्यात आल्या आहेत. सदर समितीत ५ कार्यकर्ते असतील. ज्यात एक वकील, एक महिला, व इतर तीन पदाधिकारी आहेत.जे पोलीस आणि नागरिक यांच्यात समन्वय करतील आणि त्यांच्या तक्रारी पोलीस स्टेशन मध्येच सोडवण्याचा प्रयत्न करतील.


## जाहीर प्रगटन

**मा.दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोय प्रकियांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२६/२०२५.

१. बेबीजान रियाज तडवी, वय ७८ वर्षे, धंदा शेती, रा. पळासखेडा, ता.सोयगांव, जि. छ.संभाजीनगर. २. अकबर रियाज तडवी, वय ४५ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ३. नसिर रियाज तडवी, वय ४० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.४. बशीर रियाज तडवी, वय ३९ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रियाज जानखा तडवी यांचा दिनांक १५/१२/२००७ रोजी पळसखेडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ४ हे मयत रियाज जानखा तडवी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल

आजरोजी दिनांक १३/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. २०/९/२०२५

आदेशावरुन,

विभागीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायाधीश (क. स्तर) सोयगांव यांचे न्यायालयात, जि. औरंगाबाद**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रं. २२५/२०२५.

१. रमाबाई रब्बानी तडवी, वय ५० वर्ष धंदा शेती, रा. पळासखेडा, ता.सोयगांव, जि. छ. संभाजीनगर, २. रुबाब रब्बनी तडवी, वय ३० वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे ३. फारुक रब्बानी तडवी, वय २६ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ४. राजु रब्बानी तडवी, वय २३ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे. ५. रौफ रब्बानी तडवी, वय २१ वर्षे, धंदा शेती, रा. वरीलप्रमाणे.

विरुद्ध

निल

प्रकरण :- वारसप्रमाणपत्र मिळणे बाबत

सर्व संबंधितास जाहिर प्रकटनाद्वारे कळविण्यात येते की, उपरोक्त अर्जदाराने वारसप्रमाणपत्र मिळणेसाठी अ‍ॅड. शुभम अशोक आगे सोयगांव, ता. सोयगांव, जि. छत्रपती संभाजीनगर यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज दाखल केलेला आहे. मयत रब्बानी जानखा तडवी यांचा दिनांक १६/०२/२०११ रोजी पळसखेडा, ता. सोयगांव येथे मृत्यु झालेला असुन त्यांच्या पश्यात वरील अर्जदार वारस आहे, असा अर्ज मा. न्यायालयात दाखल केलेला आहे. अर्जदार क्रं. १ ते ५ हे मयत रब्बानी जानखा तडवी यांचे वारस असुन त्यांना शासकिय/निमशासकिय कामासाठी वारसप्रमाणपत्रासाठी आवश्यकता आहे.

तरी ज्या कोणाला अर्जदाराच्या वारस प्रमाणपत्र देण्याकरीता उजर अगर आक्षेप असेल त्यांनी हे जाहीर प्रकटनाद्वारे प्रसिद्ध केल्यापासुन ३० दिवसांच्या आत या न्यायालयात योग्य त्या कागदपत्रासह आपला आक्षेप नोंदवावा अन्यथा अर्जदार यांना कायदेशीररित्या योग्य ते प्रमाणपत्र देण्यात येईल आजरोजी दिनांक १३/०८/२०२५ रोजी सही व न्यायालयाच्या शिक्क्यासह दिले असे.

पु.ता. १९/९/२०२५

आदेशावरुन,

विभीगीय लिपीक — सहाय्यक अधिक्षक

(दिवाणी व फौजदारी न्यायालय सोयगांव.)


## मराठी चित्रपटसृष्टीत भव्यतेचं नवं पर्व घेऊन येणाऱ्या 'दशावतार' चित्रपटाचं ट्रेलर प्रदर्शित

मुंबई : 'दशावतार' चित्रपटाचं पोस्टर, त्याचा पहिला लूक आणि चित्रपटातील पहिलंच गाणं आवशीचो घो यांनी आधीच रसिकांच्या मनात तुफान उत्सुकता निर्माण केलीय. प्रेक्षकांची ही उत्कंठा शिगेला पोहोचली असतानाच 'दशावतार' या चित्रपटाचा भव्य ट्रेलर एका शानदार समारंभात नुकताच प्रदर्शित करण्यात आला. झी स्टुडिओजची प्रस्तुती, ओशन फिल्म कंपनी आणि ओशन आर्ट हाऊसची निर्मिती असलेला 'दशावतार' चित्रपट मराठी चित्रसृष्टीत एक नवी झळाळी घेऊन अवतरत आहे. महाराष्ट्रात आणि विशेषतः कोकणात गणेशोत्सवाचं महत्त्व सर्वाधिक आहे. या गणेशोत्सवाप्रमाणेच कोकणात दशावतार ही कलापरंपरा तितकीच महत्त्वाची आहे. म्हणूनच येत्या गणेशोत्सवाच्या पाठोपाठ अवघ्या महाराष्ट्रात 'दशावतार' चं मोठ्या दिमाखात आगमन होत आहे.


सोलापूर तरुण भारत — CHANGE IN NAME

I HAVE CHANGING MY NAME FROM

OLD NAME : SADIYA BEGUM SY.LAL SAYYED

TO

NEW NAME : SADIYA AASIF SHAIKH

As per my documents

ADDRESS:- HOUSE NO. 5/52, BUS STAND ROAD, NEAR MAROTI MANDIR, BHILPALTHAN, SHIVAJI NAGAR, KANNAD PO: KANNAD DIST :AURANGABAD, MAHARASHTRA 431103

सोलापूर तरुण भारत — CHANGE IN NAME

I HAVE CHANGING MY NAME FROM

OLD NAME : SHAIKH AASIF SK RAZZAK

TO

NEW NAME : ASIF RAZZAQ SHAIKH

As per my documents

ADDRESS:- HOUSE NO. 5/52, SANJAY GANDHI ROAD SHIVJI NAGAR, NEAR MAROTI MANDIR, BHILPALTHAN, KANNAD, DIST : AURANGABAD, MAHARASHTRA 431103

## जाहीर प्रगटन

**मा. दिवाणी न्यायधिश साहेब 'कनिष्ठ स्तर' न्यायालय गंगापूर जि.छ. संभाजीनगर**

सिव्हील एम.ए.नं. ५४३/२०२५

अर्जदारः- १. ललिता राजुसिंग राजपूत, वय. ५२ वर्ष धंदा. गृहिणी २. गणेश राजुसिंग राजपूत, वय. ३१ वर्ष धंदा. व्यापार ३. तुषार राजुसिंग राजपूत, वय. २६ वर्ष धंदा. शिक्षण १ ते ३ रा. जयसिंग नगर, लासूर रोड, गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर ४. पूजा पवनसिंग राजपूत, वय. ३४ वर्ष धंदा. गृहिणी रा. प्लॉट नं. ३, स्वराज नगर जवळ, मुकुंदवाडी, छ. संभाजीनगर ता.जि.छ. संभाजीनगर

-: विरूद्धः-

गैरअर्जदार :-निरंक

प्रकरण - कलम २ बॉम्बे रेगुलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे वारस प्रमाणपत्र मिळणे बाबत

ज्याअर्थी अर्जदार यांना त्यांचे वकील श्री.डि.ई. पानकडे यांचे मार्फत कलम २ बॉम्बे रेगयुलेशन अ‍ॅक्ट नुसार वारसाचे प्रमाणपत्र मिळणे कामी अर्ज सादर केला आहे व कथन केला आहे की, अर्जदार नं. १ यांचे पती व अर्जदार नं. २ ते ४ यांचे वडिल नामे राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत हे दि. १८/०३/२०२४ रोजी मौजे गंगापूर ता. गंगापूर जि.छ. संभाजीनगर येथे मयत झाले आहे. अर्जदार हे मयत राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत यांचे एकमेव कायदेशीर वारस आहेत.

मयत राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत यांच्या नावे मौजे गंगापूर येथील नगर परिषद हद्दीतील मिळकत ज्याचे न.प. मिळकत नं. ४५९, वार्ड नं. १२ असून त्याचे क्षेत्र ४१ बाय ३३ फुट म्हणजेच १३५३ चौ. फुट सहाण जागा आहे. सदरील जागा ही अर्जदार यांच्या नावे होण्याकामी नगर परिषद गंगापूर यांनी अर्जदार यांना मा.न्यायालयाने दिलेल्या वारस प्रमाणपत्राची मागणी केलेली आहे. करीता अर्जदारांना मयत राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत यांच्या वारस प्रमाणपत्र मिळणेकामी मा. न्यायालयात अर्ज दाखल केला आहे.

त्याअर्थी सर्व जनतेस सुचित करण्यात येते की, मयत राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत यांचे अर्जदार यांना वारसप्रमाणपत्र देण्यास कोणाचाही कुठल्याही प्रकारचा आक्षेप असल्यास त्यांनी सदरील आपला आक्षेप जाहिर प्रगटन प्रसिध्द झाल्या पासून ३० दिवसांच्या आत या न्यायालयात लेखी स्वरूपात दाखल करावा मुद्दीत आक्षेप न आल्यास अर्जदार यांना मयत राजू उर्फ राजुसिंग चंदनसिंग राजपूत यांचे वारस असल्याचे वारसप्रमाणपत्र देण्यात येईल व मुद्द्दी नंतर येणार अक्षेप ग्राहय धरला जाणार नाही करीता सदरील जाहिर प्रगटन कोर्टाच्या सही व शिक्क्या निशी दिले आहे.

आदेशावरून

कनिष्ठ लिपिक — सहायक अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय गंगापूर

## जाहीर प्रगटन

**मा. श्रीमती आर.एस. तापडीया सह-दिवाणी न्यायाधिश कनिष्ठ स्तर कन्नड यांचे न्यायालयातून**

दिवाणी किरकोळ अर्ज क्रमांकः ४०५/२०२५

पुढील तारीख १६/१०/२०२५

अर्जदार : १-अंजनाबाई भ्र. भिमराव राऊत, वय ५५ वर्षे, धंदा घरकाम, रा. करंजखेडा, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर २-विदया भ्र. सुनिल महाजन, वय ३० वर्षे, धंदा घरकाम, रा. वाघळी, ता. चाळीसगांव, जिल्हा जळगांव

- विरुध्द -

गैरअर्जदार - निरंक

अर्ज - बॉम्बे रेग्युलेशन अ‍ॅक्ट प्रमाणे कायदेशीर वारस प्रमाण पत्र मिळणे बाबत..

ज्या अर्थी अर्जदार यांचे वकील अ‍ॅड. डी. डी. जोशी, यांच्या मार्फत या न्यायालयात अर्ज सादर केला आहे की, अर्जदार हे वरील ठिकाणचे रहीवाशी असून अर्जदार यांनी सदरील अर्ज वारसाचे प्रमाण पत्र मिळावे म्हणून विदयमान न्यायालयात दाखल केले आहे. अर्जदार क्रमांक १ चा पती व अर्जदार २ चे पिता नामे भिमराव विठठल राऊत हे दिनांक ६.३.२०२५ रोजी मौजे करंजखेड, ता. कन्नड, जिल्हा छ. संभाजीनगर औरंगाबाद, येथे मयत झालेले आहे, व त्यांचा अंत्य संस्कार करंजखेडा ता. कन्नड येथे झालेला आहे. सोबत ग्राम पंचायत करंजखेडा यांचे कडील मृत्यु प्रमाण पत्र दाखल केले आहे. तसेच अर्जदार क्रमांक १ चे सासरे व मयत भिमराव विठठल राऊत यांचे वडील नामे विठठल म्हातारजी राऊत हे दिनांक १.६.१९९७ रोजी मयत झालेले आहे, तसेच मयत भिमराव राऊत यांची आई व अर्जदार क्रमांक १ यांची सासु तुळसाबाई विठठल राऊत या दिनांक ८.६.२०११ रोजी मयत झालेल्या आहे. सर्वांचे मृत्यु प्रमाण पत्र सोबत जोडले आहे. मयताच्या नावे भविष्यात शासकीय निमशासकीय मिळणारे फायदे तसेच मयताच्या नावाने असलेल्या नोंदी वारस कायदया प्रमाणे संबंधीत रेकॉर्डला नोंद घेणेसाठी वारस प्रमाणपत्राची आवश्यकता आहे. सबब सदरील अर्ज करणेस कारण दिनांक ०१.०८.२०२५ रोजी घडले आहे. अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्याने अर्जदारां शिवाय मयतांना कोणीही ईतर वारस नाही. तसेच अर्जदार यांना सदरील वारसाचे प्रमाण पत्र हे शासकीय व निमशासकीय योजनेसाठी तसेच महसुल दप्तरी नोंद करण्यासाठी आवश्यक असल्याने वारस प्रमाण पत्राची अर्जदार हे मागणी करीत आहे. अर्जदार सोबत स्वतःचे आधार कार्ड विदयमान न्यायालयाचे अवलोकनासाठी दाखल करीत आहे. अर्जदार हे मे. न्यायालयाचे कक्षेत राहत असल्याने सदरील अर्ज चालविण्याचा व वारसाचे प्रमाण पत्र देण्याचा अधिकार मे. न्यायालयास आहे. सबब वरील प्रमाणे वारस प्रमाण पत्र मिळण्याची अर्जदार हे या न्यायालयात मागणी करीत आहे.

त्या अर्थी सदरहू जाहीर प्रगटना व्दारे सर्व जनतेस कळविण्यात येत आहे की, अर्जदार हे मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबत त्यांनी प्रस्तुतचा अर्ज या न्यायालयात वारस प्रमाण पत्र मिळणेसाठी अर्ज केलेला आहे. सबब या जाहीर प्रगटना व्दारे वरील वारस प्रमाण पत्र देण्या पुर्वी ईतर कुणासही आक्षेप / उजर असल्यास सदर जाहीर प्रगटन वर्तमान पत्रात प्रकाशित झाल्याच्या तारखेपासून ३० दिवसाच्या आत या न्यायालयात व्यक्तीगत किंवा रितसर वकीला मार्फत हजर व्हावे तसे न केल्यास मुदतीत आक्षेप प्राप्त न झाल्यास अर्जदार यांना मयतांचे कायदेशीर वारस असल्या बाबतचे वारसा हक्क प्रमाण पत्र प्रदान करण्यात येईल.

सबब आज दिनांक १३/०८/२०२५ रोजी माझे सहीनिशी व मा. कोर्टाचे शिक्यानिशी दिले.

दिनांक : १३/०८/२०२५

आदेशावरुन

लिपीक — सहा. अधिक्षक

दिवाणी व फौजदारी न्यायालय कनिष्ठ स्तर, कन्नड

## अग्रलेख...

# ...असाच आक्रोश करीत राहणार काय?

पावसाळ्यात काय खावे आणि काय-काय करावे, याबद्दलचा रोमँटिसिज्म बराच प्रसिद्ध असला, तरी आताशः पाऊस तितका रोमँटिक राहिलेला नाही, हेच परवा पुन्हा एकदा सिद्ध झाले. पावसात गरम भजी खावीत, वाफाळलेला चहा घ्यावा किंवा आपल्या प्रियजनांसोबत लाँग ड्राईव्हला जावे वगैरे कविकल्पनेत ठिकाय. पण, असा मुसळधार पाऊस येतो तेव्हा तो सारेच वाहून नेतो आणि मागे उरतात दुःखाचे कढ. विदर्भ, मराठवाडा, कोकण, मुंबईसह अर्ध्याअधिक महाराष्ट्राला परवा पावसाने प्रचंड झोडपले. इतका प्रचंड पाऊस आला की, अनेक ठिकाणी लष्कराची मदत घ्यावी लागली. माणसं-प्राणी वाहून गेले. घरे-झाडे पडली. बरेच लोक बेपत्ता झाले. शेतीचे नुकसान झाले. अद्याप पावसाळा संपलेला नाही. तसाही आजकाल पाऊस कधीही येतो. त्याला पावसाळ्याचाच मोसम हवा असे नाही. माणसाने निसर्गाची लय तोडली. आता जणू निसर्ग माणसांचे कंबरडे मोडायला निघालेला आहे. त्यामुळे पाऊस हा पावसाळ्यातच पडेल, असे आता राहिलेले नाही. उन्हाळा लांबत चालला आहे, थंडीतली गुलाबी रंगत आणि उबदारपणा हरपत चालला आहे आणि पावसाशी पिढ्यान्‌पिढ्यांनी केलेला रोमांस हळूहळू काळाच्या पडद्याआड जाऊ लागला आहे. पाऊस नसेल तर उकाडा, दमट वातावरण आणि आला तर असे प्रचंड नुकसान. मुंबई, पुणे, नागपूर, ठाणे, नाशिक, औरंगाबाद अशा सर्व शहरांनी ताल सोडला. अनधिकृत बांधकामे वाढली. पाण्याचा निचरा होण्याचे मार्ग बंद झाले. गाव-खेड्यांतही फारशी वेगळी परिस्थिती नाही. प्लॅस्टिकसारख्या पदार्थांनी, कचऱ्याने अनेक ओढ्यांचा, नाल्यांचा गळा घोटला आहे. जमिनीचा कस संपलेला आहे. त्यामुळे पाऊस आला तरी पाणी थांबत नाही, जमिनीत मुरत नाही. असा पाऊस थैमान माजवणारच आणि तसे झाले की नुकसान ठरलेले.

महाराष्ट्राच्या उत्पन्नात शेतीचा वाटा १०-१२ टक्केच असला, तरी अर्धी लोकसंख्या शेतीवर अवलंबून आहे. यावेळी चार-पाच लाख हेक्टरवरील पिकांची नासाडी झाली, असा प्राथमिक अंदाज असेल तर ग्रामीण भागातील किमान दोन ते अडीच लाख कुटुंबांना पावसाचा फटका बसला असणार. त्यांची सर्वेक्षणे होतील आणि भरपाईही मिळेल. पण, भरपाई देणे हा पावसाच्या अशा तडाख्यांवरचा कायमस्वरूपी ईलाज नाही. महाराष्ट्रातील किमान अर्धे शेतकरी अल्पभूधारक आहेत, हे वास्तव ध्यानात घेतले तर अशा पावसाने किंवा पाणीटंचाईने अल्पभूधारक शेतकऱ्यांच्या संसाराचे काय होत असेल, याची कल्पना करता येते. एकीकडे सिंचनाची सोय फक्त १५ टक्के तर दुसरीकडे अशा मुसळधार पावसाने होणारे नुकसान! शेतकरी फक्त शासनाकडेच आशेने पाहू शकतात. पीक विमा वगैरेत तसाही दम नाही. परवाच्या पावसाने शेती, रस्ते, गल्लीबोळ, शाळा, रुग्णालये, सरकारी कार्यालये असे सगळीकडे पाणी शिरले. शेकडो गावांचा संपर्क तुटला. अनेक ठिकाणी पाणीपुरवठा खंडित झाला, विजेचे ट्रान्सफॉर्मर कोसळले तर काही ठिकाणी पूल वाहून गेले. शहरी भागांत चिखलाच्या घसरणी तयार झाल्या तर मुंबईच्या उपनगरांमध्ये रेल्वे ट्रॅकवरच पाण्याच्या नद्या वाहू लागल्या. यात सर्वांत जास्त फटका बसला शेतकऱ्यांना आणि गरिबांना. डोळ्यांदेखत लाखो शेतकऱ्यांच्या शेतीतले पीक वाहून गेले. अर्धवट विटांची घरे किंवा पत्र्याच्या छपराखाली जगणाऱ्या कुटुंबांना एका रात्रीत बेघर व्हावे लागले. कुणाची भांडी-कुंडी वाहून गेली, कुणाचे संसारोपयोगी सामान पाण्यात बुडाले. शेतकऱ्यांची अवस्था तर अधिकच बिकट झाली. ज्या शेतकऱ्यांनी कर्ज काढून पेरणी केली होती, त्यांचे मनोबलही पिकासकट वाहून गेले. अनेक ठिकाणी शेतकऱ्यांच्या शेतात पाण्याची डबकी साचली. शिल्लक राहिलेले पीक कुजून जाणार हे स्पष्ट आहे. एकीकडे ग्लोबल वॉर्मिंगसारखी समस्या आणि दुसरीकडे मानवी चुका आणि त्यातही मानवाचा निसर्गातील हस्तक्षेप ही अशा घटनांची प्रमुख कारणे आहेत. पृथ्वीचे तापमान सतत वाढत आहे. दरवर्षी तापमानातील सूक्ष्म वाढ पावसाच्या स्वरूपात प्रचंड बदल घडवून आणते. वायुमंडलात बाष्पीभवनाची तीव्रता वाढते. त्यामुळे एकाच वेळी ढग दाटतात आणि अचानक मुसळधार पाऊस कोसळतो. पारंपरिक 'पावसाळ्याची लय' मोडून गेली आहे की मानवाने मोडली आहे...? पूर्वी जूनमध्ये पावसाळा सुरू झाला की सप्टेंबर-ऑक्टोबरपर्यंत थोड्या-थोड्या अंतराने पाऊस पडत राहायचा. आता मात्र दोन-तीन दिवसांतच महिनाभराचा पाऊस कोसळतो आणि मग पुन्हा कोरडे दिवस येतात. हा बदल केवळ महाराष्ट्रापुरता मर्यादित नाही; तो सर्वत्र जाणवू लागला आहे. महाराष्ट्रासारख्या राज्यात त्याचे परिणाम अधिक तीव्रतेने दिसतात. कारण शेती आणि लोकसंख्या दोन्हींचे हवामानावरील अवलंबित्व मोठे आहे. गेल्या दोन दशकांत महाराष्ट्रातील लाखो एकर जंगल नष्ट झाले. पावसाचे पाणी मुरवण्यासाठी जंगले मदतीची ठरतात. जंगल नाहीसे झाले की पावसाचे पाणी सरळ पुरासारखे इतस्ततः वाहते. आपण नद्या अरुंद केल्या. नाल्यांवर बांधकामे केली. पाणी वाहून जाण्याचे नैसर्गिक मार्ग बंद झाले. शहरांमध्ये अनियंत्रित बांधकामे झाली. पावसाचे पाणी झिरपून जाण्यासाठी मोकळी जमीनच उरली नाही. त्यामुळे मुसळधार पाऊस झाला की रस्ते-गल्ल्यांची तळी बनतात. प्रत्येक वर्षी पावसाळा सुरू होण्यापूर्वी नदी-नाल्यांची सफाई झालीच पाहिजे, असे सरकार सांगते. पण नगरपालिका, महापालिका, ग्रामपंचायती याकडे दुर्लक्ष करतात. गटारे साफ होत नाहीत, नाले बुजलेले राहतात, कचरा साचतो. मुसळधार पाऊस आला की सगळ्या शहरांवर गटाराच्या पाण्याचे लोट. तिकडे ग्रामीण भागात जाऊन पाहाल तर कृषी खाते शेतकऱ्यांना वेळेवर मदत करत नाही. पंचनामे करण्यासाठी कित्येक महिने लागतात. भरपाई उशिरा मिळते. मग शेतकरी कर्जाच्या ओझ्याखाली दबून आत्महत्या करतो. एका बाजूला अन्नधान्याच्या सुरक्षेची जबाबदारी शेतकऱ्याच्या खांद्यावर टाकलेली आहे, तर दुसऱ्या बाजूला हवामानाच्या तडाख्याने तो पुन्हा-पुन्हा उद्ध्वस्त होतो. आणखी एक गंभीर मुद्दा म्हणजे पशुधनाचा प्रश्न. पूर आल्यावर गाई-म्हशी वाहून जातात, गोठ्यांमध्ये चिखल साचतो, चारा खराब होतो. शेतकऱ्यांसाठी जनावरे म्हणजे संपत्ती असते. त्याकडेही कुणाचे लक्ष नाही. नगरपालिका-महापालिका दरवर्षी कोट्यवधी रुपये खर्च करून 'नालेसफाई झाली' असा दावा करतात. पण पहिला पाऊस पडला की, संपूर्ण सत्य बाहेर येते. साचलेला कचरा, प्लॅस्टिक, बांधकामांच्या कचऱ्याचे ढिग यामुळे नदी-नाल्यांच्या प्रवाहाला अडथळे येतात. परिणामी पाणी रस्त्यावर येते किंवा घरात घुसते. पावसाचा जोर थोडासाही वाढला की पुलांना तडे जातात, रस्त्यांवर खड्डे पडतात. कित्येक ठिकाणी तर अख्खे पूल वाहून जातात. आपली बांधकामे किती निकृष्ट दर्जाची असतात, याची साक्ष पटविणाऱ्या घटना दरवर्षी पावसाळ्यात घडतात. परंतु, कधी तरी कुठल्या कंत्राटदारावर किंवा अधिकाऱ्यावर कारवाई झाल्याचे ऐकले आहे काय...? नाही. कारण अळीमिळी गुपचिळी असाच सारा प्रकार असतो. पावसाळा संपला की, पावसाळ्याच्या फायली बंद होतात आणि नव्या फायली सुरू होतात. नवे टेन्डर्स निघतात. इकडे पावसाळ्याने रोगराईचा प्रादुर्भाव मागे सोडलेला असतो. डेंग्यू, मलेरिया, चिकुनगुनिया यांसारख्या आजारांचा फैलाव सुरू होतो. दूषित पाण्यामुळे गॅस्ट्रो, अतिसार, टायफॉईड यांसारखे आजार डोके वर काढतात. आजारांची हाताळणीही पावसाळ्यासारखीच असते. कसाबसा हिवाळाही संपतो आणि मग उन्हाळ्यातील टंचाईवर मात करण्यासाठी नवे टेन्डर्स निघतात. पावसामुळे झालेले नुकसान आणि रोगराईचे वाईट परिणाम त्या-त्या घरांपुरते मर्यादित राहतात. समाज दोषी आहेच. लोक कचऱ्याची नीट विल्हेवाट लावत नाहीत. बांधकामाचे नियम पाळत नाहीत. पण, त्यांच्यावर नजर ठेवणारे सरकारी अधिकारी काय हस्तक्षेप करतात...? काहीही नाही. सारेच एका माळेचे मणी. त्यामुळे अतिवृष्टीच्या किंवा दुष्काळाच्या चक्रव्यूहात आपण सारे फसतो. तडाखा बसला की विव्हळतो, शासनाच्या नावाने गळे काढतो. पण, एकेक मोसम मागे पडत गेला की मागचे सारेच विस्मरणात जाते. आज महाराष्ट्रासमोरचा प्रश्न असा आहे की, आपण दरवर्षी पूर-दुष्काळाबद्दल असाच आक्रोश करत राहणार की आता तरी शाश्वत बदल घडवणार? शेतकरी पुन्हा-पुन्हा आत्महत्या करणार की त्याला त्या गर्तेतून बाहेर काढणार? शहरे दरवर्षी पाण्यात बुजणार की सुस्थितीतील व मजबूत पायाभूत सुविधा उभ्या राहणार?

## विशेष

# सेमीकंडक्टर उत्पादनांत आत्मनिर्भरता

**प्रा. सुखदेव बखळे**

पंतप्रधान नरेंद्र मोदी यांनी राष्ट्राला संबोधित करताना देश सेमीकंडक्टरच्या जगात पुढे जात आहे, असे सांगितले. देशात सहा सेमीकंडक्टर युनिट्स आधीच कार्यरत आहेत तर इतर चार मंजूर झाले आहेत. २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स बाजारात येतील. सेमीकंडक्टर चिप्ससाठी देशांमध्ये अनेकदा संघर्ष होतो. अशा परिस्थितीत सेमीकंडक्टर चिप म्हणजे काय हे जाणून घेणे महत्त्वाचे आहे. हा एक सिलिकॉन-आधारित इलेक्ट्रॉनिक घटक आहे, जो कोणत्याही उपकरणाच्या प्रक्रियेत आणि मेमरी स्टोरेजमध्ये वापरला जातो. सोप्या भाषेत सांगायचे तर फोनमध्ये स्थापित केलेली मेमरी चिप त्याचाच एक प्रकार आहे. तंत्रज्ञानाच्या क्षेत्रात सेमीकंडक्टर चिप्स लहान असूनही उपयुक्त आहेत. त्याशिवाय कोणतेही गॅझेट काम करू शकत नाही. ते मोबाईल, लॅपटॉपपासून वाहन, संरक्षण आणि उपग्रह क्षेत्रात वापरले जाते. तैवान जगात सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स बनवतो. मेमरी चिप्स बनवणारी दक्षिण कोरिया दुसऱ्या क्रमांकावर आहे. चीनदेखील हळूहळू या क्षेत्रात प्रगती करीत आहे. 'मीडिया रिपोर्टस'नुसार सेमीकंडक्टर चिप्सच्या एकूण उत्पादनात चीनचा वाटा सुमारे १५-२० टक्के आहे. चिपचा शोध अमेरिकेने लावला होता; परंतु आजकाल बहुतेक आशियाई देश त्याचे उत्पादन करीत आहेत. अशा परिस्थितीत अमेरिका या क्षेत्रात सतत गुंतवणूक करीत असून इंटेल, मायक्रोनसारख्या कंपन्या महत्त्वाची भूमिका बजावत आहेत.

सर्वाधिक सेमीकंडक्टर चिप्स खरेदी करणाऱ्या देशांच्या यादीत पहिले नाव चीनचे आहे. जे त्याच्या इलेक्ट्रॉनिक बाजारपेठेसाठी एकूण जागतिक खरेदीपैकी एक तृतीयांश खरेदी करते, तर अमेरिका दुसऱ्या क्रमांकावर आहे. भारत त्याच्या गरजेनुसार इतर देशांकडून लागणारे १०० टक्के सेमीकंडक्टर खरेदी करतो. एका अहवालानुसार भारत स्वतः सेमीकंडक्टर निर्यात करतो. २०२४-२५ दरम्यान भारत अमेरिकेला चिप्स निर्यात करणारा चौथा देश आहे.

सरकारने 'सेमीकॉन इंडिया प्रोग्राम' अंतर्गत या क्षेत्रात सुमारे ७६ हजार कोटी रुपये जारी केले आहेत. आतापर्यंत देशात १० प्रमुख अर्धवाहक प्रकल्पांना मान्यता देण्यात आली आहे, जिथे सहा प्लांटवर काम सुरू आहे. टाटा इलेक्ट्रॉनिक्स, एचसीएल-फॉक्सकॉन, मायक्रॉन, वेदांत-फॉक्सकॉन आणि अनेक जागतिक तंत्रज्ञान कंपन्या यात महत्त्वाची भूमिका बजावत आहेत. भारत २०२५ च्या अखेरीस 'मेड इन इंडिया' सेमीकंडक्टर चिप्स लाँच करण्याची तयारी करीत आहे. २०३२ पर्यंत 'व्हेरी लार्ज स्केल इंटिग्रेशन' (व्हीएलएसआय) चिप डिझाईन क्षेत्रात अंदाजे २ लाख ७५ हजार अतिरिक्त कर्मचाऱ्यांची आवश्यकता असेल. आवश्यकतेच्या तुलनेत, देशात कुशल कामगारांची



उपलब्धता आणि तयारीची गती खूपच कमी आहे. हे लक्षात घेता कौशल्य विकास आणि उद्योजकता मंत्रालयाने 'इंडिया सेमीकंडक्टर इकोसिस्टिम वर्कफोर्स डेव्हलपमेंट स्ट्रॅटेजी रिपोर्ट' तयार केला आहे. त्यात विविध शिफारशींसह एक रोडमॅप सुचवण्यात आला आहे, ज्याची अंमलबजावणी करण्यास सरकार तयार आहे. दरवर्षी १५ लाखांहून अधिक अभियंत्यांना प्रशिक्षण दिले जाते.

भारतीय अर्धवाहक उद्योगाची सद्यस्थिती आणि भविष्यातील शक्यतांवरील हा अहवाल अलिकडेच कौशल्य विकास आणि उद्योजकता राज्यमंत्री जयंत चौधरी यांनी लाँच केला. भारतात दरवर्षी १.५ दशलक्षाहून अधिक अभियंते प्रशिक्षित केले जातात. त्यापैकी तीन टक्क्यांपेक्षा कमी अर्धवाहक उद्योगासाठी कुशल मानले जातात. तथापि, गेल्या काही वर्षांमध्ये भारताने चिप डिझाईनमध्ये बरीच प्रगती केली आहे. परिणामी सव्वा लाखांहून अधिक अभियंते डिझाईन सेवांमध्ये गुंतले आहेत, तरीही फॅब ऑपरेटर, प्रक्रिया तंत्रज्ञ आणि एटीएमपी अभियंत्यांची मोठी कमतरता आहे. भारत सर्वात वेगाने वाढणाऱ्या डिजिटल अर्थव्यवस्थांपैकी एक आहे आणि अर्धवाहक उद्योग त्यात खूप मोठी भूमिका बजावू शकतो. इलेक्ट्रॉनिक्स आणि उदयोन्मुख तंत्रज्ञानाच्या वाढत्या मागणीमुळे भारतातील सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२१ मध्ये २७ अब्ज डॉलर्सवरून २०२६ पर्यंत ६४ अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. हे लक्षात घेता, सरकारने सेमीकंडक्टर डिझाईन, उत्पादन आणि संशोधनाला प्रोत्साहन देण्याच्या उद्देशाने ७६ हजार कोटी रुपयांच्या बजेटसह 'सेमीकॉन इंडिया' कार्यक्रम सुरू केला आहे. सेमीकंडक्टर उद्योगातील ही भरभराट आर्टिफिशियल इंटेलिजेंस (एआय), इंटरनेट ऑफ थिंग्ज (आयओटी), रोबोटिक्स आणि ५जी सारख्या प्रगत तंत्रज्ञानाचा व्यापक अवलंब आणि वाढीव डेटा प्रोसेसिंग, स्टोरेज आणि ट्रान्समिशन क्षमतेच्या मागणीमुळे झाली आहे.

भारतीय सेमीकंडक्टर बाजारपेठ २०२० मध्ये १५ अब्ज डॉलर्स होती. २०२५ पर्यंत ती ६४ अब्ज डॉलर्स तर २०३० पर्यंत ११० अब्ज डॉलर्सपर्यंत वाढण्याची अपेक्षा आहे. ती जागतिक मागणीच्या सुमारे १० टक्के आहे. कौशल्य विकास तज्ज्ञांनी अहवालात म्हटले आहे की, सेमीकंडक्टर उद्योगासाठी कोणालाही तयार करण्यासाठी विविध विषयांमध्ये मजबूत पाया आवश्यक आहे. या धोरण अहवालात, तज्ज्ञांनी शालेय स्तरावरूनच काही तांत्रिक अभ्यासक्रम सुरू करण्याचे सुचविले आहे. हे विविध मंत्रालयांशी संबंधित असल्याने कौशल्य विकास मंत्रालय या सर्व मंत्रालयांच्या सहकार्याने या धोरणावर आणि रोडमॅपवर पुढे जाण्यासाठी पुढाकार घेत आहे. आधुनिक तंत्रज्ञानाच्या केंद्रस्थानी सेमीकंडक्टर आहेत आणि चिप्सची जागतिक मागणी गगनाला भिडत आहे; परंतु काही मर्यादित भौगोलिक क्षेत्रांमध्ये उद्योगाचे केंद्रीकरण झाल्यामुळे पुरवठा साखळी खूपच नाजूक आहे. त्याच वेळी उत्पादनाच्या जागतिक विविधीकरणाची मोठी आवश्यकता आहे. भारत या संदर्भात एक प्रमुख खेळाडू म्हणून उदयास येत आहे. जागतिक सेमीकंडक्टर (सेमीकंडक्टर इनोव्हेशन इंडिया) बाजारपेठ २०३० पर्यंत एक ट्रिलियन अमेरिकन डॉलर्सपर्यंत पोहोचण्याची अपेक्षा आहे. त्यात भारताच्या बाजारपेठेचा मोठा वाटा असेल. नोएडा आणि बेंगळुरू येथे दोन अत्याधुनिक सेमीकंडक्टर डिझाईन सुविधा केंद्रांचे उद्‌घाटन झाले आहे. ही भारतातील पहिली केंद्रे प्रगत तीन नॅनोमीटर चिप डिझाईनवर लक्ष केंद्रित करतात. देशाच्या सेमीकंडक्टर इनोव्हेशन प्रवासात हा एक महत्त्वाचा टप्पा ठरेल. मंत्रालयाच्या 'डिझाईन लिंक्ड इन्सेंटिव्ह' (डीएलआय) योजनेंतर्गत समर्थित स्टार्टअप्स आणि त्यांच्या 'चिप्स टू स्टार्टअप्स' (सी २ एस) कार्यक्रमात लक्षणीय वाढ होत आहे. अलिकडेच 'स्मार्ट व्हिजन', सीसीटीव्ही कॅमेरे आणि 'इंटरनेट ऑफ थिंग्ज'सारख्या अनुप्रयोगांसाठी चिप्स बनवणाऱ्या नेत्रासेमी या स्टार्टअप कंपनीला सरकारच्या चिप डिझाईन योजनेंतर्गत १०७ कोटी रुपयांची व्हेंचर कॅपिटल गुंतवणूक मिळाली. मंत्रालयाच्या म्हणण्यानुसार २०२२ मध्ये 'डीएलआय' योजना सुरू झाल्यापासून सरकारने २२ कंपन्यांना चिप डिझाईन प्रकल्पांसाठी २३४ कोटी रुपयांची मदत देण्याचे वचन दिले होते. त्याचा एकूण प्रकल्प खर्च ६९० कोटी रुपये आहे. एकत्रितपणे या स्टार्टअप्सनी व्हेंचर कॅपिटल गुंतवणूकदारांकडून ३८० कोटी रुपयांपेक्षा जास्त निधी उभारला आहे. याव्यतिरिक्त पाच स्टार्टअप्सनी जागतिक चिप उत्पादकांसह त्यांचे चिप डिझाईन आधीच तयार केले असून त्यांची चाचणी केली आहे. केंद्र सरकारच्या म्हणण्यानुसार ७२ हून अधिक कंपन्यांना चिप्स डिझाईन करण्यास मदत करण्यासाठी प्रगत सॉफ्टवेअर साधनांची उपलब्धता प्रदान करण्यात आली.

(लेखक अर्थशास्त्राचे निवृत्त प्राध्यापक आहेत.)


## वेध

**विजय कुळकर्णी**

# पर्यावरण संवर्धनाकडे गांभीर्याने लक्ष द्या

पर्यावरणाचा समतोल ढासळला आहे. याचा अनुभव आपण दररोज घेत आहोत. काल बुलढाणा जिल्ह्यातील चिखली शहर व तालुक्यात आणि अकोला जिल्ह्यात मुसळधार ते अतिमुसळधार पाऊस झाला. तर, बुलढाणा आणि अकोला जिल्ह्यातील इतर भागात झालेल्या पावसाचे प्रमाण कमी होते. अकोला जिल्ह्यातील ६० हजार हेक्टर शेती पुराच्या पाण्याने खरडून गेली. पिकांचे अतोनात नुकसान झाले. असा पाऊस बुलढाणा जिल्ह्यातील चिखली, मेहकर, सिंदखेड राजा, लोणार या तालुक्यात गेल्या आठवडाभरापासून पडत आहे. तर, बुलढाणा जिल्ह्यातील इतर तालुक्यात मात्र अजूनही दमदार पावसाची प्रतीक्षा आहे. याला पर्यावरणाचा ढासळलेला समतोल हेच एकमेव कारण आहे.

पूर्वी पावसाळ्यात व विशेषतः श्रावणात दोन दोन-तीन तीन दिवसांची पावसाची झडी लागायची. तशी झडी गेल्या काही वर्षांपासून बघायला मिळतच नाही. पाऊस आला की, एकदाम रपरप नुसता कोसळतो. अर्धातास, एकतास पाऊस पडतो आणि सर्वत्र पाणीच पाणी होते. नदी-नाले एक होऊन पूर येतो. शेती, पिके वाहून जातात. घरात पुराचे पाणी शिरते. असा पावसाचा पॅटर्न आता बदललेला दिसून येत आहे. पूर्वी पोळा झाल्यावर पावसाचे प्रमाण कमी होत असे. भर पावसाळ्यात पाऊस कुठे धो धो कोसळतो तर कुठे एक थेंब पडत नाही. अशी परिस्थिती असते. मे महिन्यात कडक ऊन्ह तापण्याऐवजी धो धो पाऊस पडतो. याचा अनुभव या वर्षीच्या मे महिन्यात आपण अनुभवला. तर, जूनमध्ये कडक ऊन्ह तापले. हे सर्व पर्यावरणाचा समतोल ढासळल्यामुळे झाल्याचे तज्ज्ञांचे मत आहे. तेव्हा पर्यावरणाचा



समतोल राखण्यासाठी मानव म्हणजे आपण प्रयत्न करणे व तेही जोमाने करणे आवश्यक आहे. पर्यावरणाचा समतोल ढासळण्याला मानवच जबाबदार आहे. आज लोकसंख्या प्रचंड वाढली. त्यामुळे प्रत्येक कुटुंबातील सदस्यांची संख्या वाढली. त्यांना लागणाऱ्या अन्नधान्याची मागणी वाढली. ती पूर्ण करण्यासाठी कृषी उत्पादन वाढविण्याची गरज निर्माण झाली. म्हणून कृषी क्षेत्र वाढविण्यासाठी जंगल कटाई झाली. तसेच, गाव-शहरांचा आकार वाढला. घरांची मागणी पूर्ण करण्यासाठी शहर व गावाशेजारील शेती अकृषक करण्याचे प्रमाण वाढले. पिकावू जमीन कमी झाली. उपलब्ध शेतीतून जास्तीत जास्त उत्पादन काढण्याचे प्रयत्न सुरू झाले. संकरीत बियाणे, रासायनिक खते, कीटकनाशकांचा वापर वाढला. नगदी पिकांकडे शेतकऱ्यांचा ओढा असल्याने चारा टंचाई निर्माण झाली. त्यामुळे कोठ्यातील गायी, म्हशींची संख्या कमी झाली. परिणामी पर्यावरणाला पोषक शेणखताची निर्मिती घटली. पावसाच्या पाण्यावर अवलंबून राहू लागू नये म्हणून शेतात कूपनलिका खोदणे सुरू झाले. त्यामुळे भूगर्भातील पाण्याची पातळी खोल गेली. शहरात काँक्रीटची जंगले वाढली. फ्लॅट स्किममुळे घरासमोरील अंगण नाहीसे झाले. त्यामुळे घराच्या छतावर पडणारे पावसाचे पाणी जमिनीत न मुरता नालीतून वाहून जाऊ लागले. त्यामुळे पाणी टंचाई निर्माण होऊ लागली. गावातील विहिरी आटल्या. हे दुष्टचक्र गेल्या कित्येक वर्षांपासून सुरू आहे. याकडे आपण कधी फार गांभीर्याने लक्षच दिले नाही. त्यामुळे आज सध्या सुरू असलेल्या पावसाळ्यात आपल्याला पर्यावरणाचा समतोल राखणे का आवश्यक आहे, ते लक्षात येत आहे. कोणत्याही ठिकाणी घर, रस्ते किंवा कोणत्याही वास्तूचे बांधकाम करण्यासाठी त्या ठिकाणी असलेली झाडे तोडली जातात. तोडलेल्या झाडांच्या काही पट झाडे लावली पाहिजेत, असा शासनाचा नियम आहे. पण, त्याची अंमलबजावणी करण्याकडे कोणाचेच लक्ष नसल्याचे निदर्शनास येते. पर्यावरणाच्या दृष्टीने वृक्षारोपण व संवर्धन अत्यंत आवश्यक आहे. या सर्वांचा विचार करून यावर्षी रा. स्व. संघाने शताब्दी वर्षानिमित्त हाती घेतलेल्या पंचसूत्री कार्यक्रमांतर्गत पर्यावरण हा उपक्रम राबविण्यात येणार आहे. 'तरुण भारत'देखील शताब्दी वर्ष साजरे करीत असून पर्यावरण संवर्धन हा उपक्रम सध्या राबवित आहे. या उपक्रमांतर्गत तरुण भारतने 'बीज अंकुरे अंकुरे' हा उपक्रम राबविला. वटवृक्षाची रोपे वितरित केली. तर, आता मंदिर स्वच्छता व तुळस रोपण उपक्रम सुरू आहे. त्याला विदर्भातून चांगला प्रतिसाद मिळत आहे. तेव्हा, प्रत्येकाने आपल्या परसबागेत, शेतात किंवा आपल्या घराच्या परिसरातील मोकळ्या जागेत वृक्षारोपण व तुळस रोपण करून त्याचे संवर्धन करून पर्यावरण रक्षण व संवर्धनात आपला खारीचा वाटा उचलावा, असे आवाहन यानिमित्ताने करावेसे वाटते. पर्यावरणाचा समोतल राखणे किती आवश्यक व गंभीर बाब आहे, हे आपल्या लक्षात आलेच असावे. चला तर मग वेळ न दवडता आपल्या घरासमोर वृक्षारोपण करू या!

८८०६००६१४९

## धर्म-संस्कृती

# श्रीगीता : कर्मसंन्यास योग

**प्रा. दिलीप जोशी**

श्रीमद्‌भगवद्‌गीतेच्या पाचव्या अध्यायाला 'कर्मसंन्यास योग' म्हणून ओळखतात. श्रीगीतेचा चौथा अध्याय 'ज्ञानकर्मसंन्यास योग' सांगत असेल तर त्यातील ज्ञान शब्द काढून या पाचव्या अध्यायात केवळ कर्मसंन्यास योग भगवंतांनी वेगळा का सांगितला असेल? हा प्रश्न पडणे साहजिकच आहे. चौथ्या अध्यायात 'ज्ञानाग्नी सर्व कर्मानी' म्हणजे 'ज्ञानाच्या अग्नीत सर्व कर्म भस्म कर' हे सांगतानाच शेवटचा सल्ला तंनी 'कर्म कर' असे सांगितले. 'योगमातिष्ठोत्तिष्ठ भारत' म्हणजे कर्म अनुष्ठानानुसार कर्म योगात स्थिर होण्याचा आदेश भगवंतांनी देऊन अर्जुनाला कर्म प्रवृत्त केले. त्यावरच आजचे चिंतन आहे. आपण सामान्य माणसांचा विचार केला तर कर्मयोग आणि ज्ञानपूर्ण होऊन कर्मसंन्यास हे दोन टोकेच आहेत. कर्मयोग आणि त्याचवेळी कर्मसंन्यास हे आपल्याला एकाच वेळी साधणे केवळ अशक्य. हं! कर्मयोग करताना हळूहळू कर्मसंन्यास कदाचित हे तरी जमू शकेल, पण दोन्ही एकाच वेळी कसे साधता येईल? हाच प्रश्न अर्जुनाला पडला. कर्मसंन्यास हा ज्ञानी माणसासाठी नाहीच तर तो आपल्या सामान्य साधकांसाठी आहे. कारण आपल्या मागचा संसार सुटत नाही. अशा स्थितीत विषयामध्ये राहूनच कर्मयोगी वृत्ती ठेवायची. संसारात राहून कर्मयोग साधतो म्हणजे आपले नित्यकर्म ईमानदारीने करतो. असा मनुष्य संन्यास न घेताही नित्य संन्यासी आहे. म्हणून इथे ज्ञान शब्द काढून फक्त कर्मसंन्यास योग म्हटले आहे.

**'संन्यासं कर्मणाम् कृष्ण पुनर्योगं च शंससि ।**
**यच्श्रेय एतयोरेकं तन्मे ब्रूहि सुनिश्चितम् ॥'**

अर्जुन म्हणतात की, हे भगवंता एकीकडे तुम्ही सर्वकर्मसंन्यास सांगता आणि दुसरीकडे निष्काम कर्मयोग सांगता. या दोहोंमध्ये हितकारक असेल ते मला सांगा.

**'सांख्ययोगौ पृथग्बालाः प्रवदंति न पण्डिताः ।**
**एकमप्यास्थितः सम्यगुभयोर्विन्दते फलम् ॥'**

हे अर्जुना, कर्मसंन्यास आणि निष्काम कर्मयोग हे भिन्न आहेत, असे अज्ञानी लोकांना वाटते. पण जे ज्ञानी आहेत ते कोणत्याही एकाच मार्गावर चालत असले, तरी दोन्ही मार्गांची फळप्राप्ती म्हणजे परमात्म स्वरूपाची प्राप्ती समजतो आणि त्यानुसारच तो वागतो. जे फळ सर्वकर्म संन्यास्याला तेच फळ निष्काम कर्मयोग्याला आहे. अशा विद्वान पुरुषाविषयी भगवान सांगतात-

**'योगयुक्तो विशुद्धात्मा विजितात्मा जितेंद्रियः ।**
**सर्वभूतात्मभूतात्मा कुर्वन्नपि न लिप्यते ॥'**

ज्याने आपल्या शरीराला आपल्या अधीन करून इंद्रियांवर विजय मिळविला, ज्याचे मन शुद्ध आहे तो मनुष्य कर्म करीत असला, तरी तो कर्मापासून अलिप्त असतो. हे झाले ज्ञानिजनांसाठी; पण आपल्यासारख्या अज्ञान्यांना वाऱ्यावर सोडले का, असा प्रश्न उपस्थित होतो.

कर्मानुष्ठान आणि कर्मसंन्यास या बाबी तशा भिन्नच आहेत. आपल्या पातळीवर विचार केला तर कर्मानुष्ठान म्हणजे आपली संसारिक सर्व कर्मे अनुष्ठानासारखी करायची. कर्मसंन्यास म्हणजे संसारिक कर्माचा त्याग. आपल्या दृष्टीने ही दोन टोके आहेत. ज्ञानी लोक ज्ञानपूर्वक कर्म संन्यास स्थिती प्राप्त करू शकतात. आपण अज्ञानी पुरुषसुद्धा कर्म संन्यासी होऊ शकतो, पण त्यासाठी आपल्याला पहिले कर्मानुष्ठान मार्ग महत्त्वाचा आहे. म्हणजे केवळ कर्मयोगाचे आचरण केले पाहिजे. आपण अज्ञान्यांनी कर्मसंन्यासापेक्षा कर्मयोग अनुष्ठान आधी आचरावे. त्यानंतर अज्ञान आणि अज्ञानजन्य कर्म याचा लोप करीत अज्ञानाचा विध्वंस करीत निष्क्रिय भावाने आत्मस्वरूपाकडे जाण्याचा प्रयास म्हणजे कर्म संन्यासाकडे हळूहळू जाणे होय. हेच या अध्यायात भगवंत म्हणतात. अज्ञानी पुरुषाला समोर ठेवूनच कल्याणकारी मार्ग भगवान कृष्णाने इथे सांगितला आहे-

**'अज्ञानेनावृत्तं ज्ञानं तेन मुह्यंति जंतवः ।'**

अज्ञानामुळे जिवांच्या ज्ञानावर आवरण आल्यामुळे जीव मोहित होतात.

**'ज्ञानेन तु तद्‌ज्ञानं येषामब नाशितमात्मनः ।'**

अंतःकरणातील अज्ञान आवरण पुढे ज्ञानाने नष्ट करायचे. हे अज्ञान फक्त आणि फक्त ज्ञानानेच नाश पावते, हे भगवंत सांगतात. इथे आपल्यासारख्या सामान्य लोकांना कर्मसंन्यास सोपा व्हावा म्हणून ज्ञानाची विकसनशील उकल केली आहे. या अध्यायात कर्मयोग, कर्मसंन्यास, सर्वकर्मसंन्यास यांचे प्रतिपादन आहे. आपण सामान्य लोकांनी आपले विहित कार्य निष्काम भावाने केले तर आपले अज्ञान हळूहळू गळत जाते. त्याचवेळी आपण हळूहळू ज्ञानप्राप्तीकडे गेले पाहिजे, असा त्याचा मथितार्थ आहे. संसारी माणसांच्या जीवनात अनेक सुख-दुःखाचे प्रसंग असतात. ते आपण टाळू शकत नाही. सहनही होत नाही आणि सांगताही येत नाही. हेच ते प्रसंग आहेत, ज्यात आपण सुखाकडे आणि दुःखाकडेही समदृष्टीने, द्वंद्वरहित राहण्याचा प्रयत्न केला पाहिजे. कठीण आहे, पण अशक्य नाही. हाच कर्म योग आहे. सगुण साकाराकडून निर्गुण निराकाराकडे जाणे. बहिरंगाकडून अंतरंगाकडे जाणे. संसार सांभाळून संसारमुक्त होणे. आपल्या संसारासाठी बऱ्यापैकी सोपे आहे.

**'स्पर्शांकृत्वा बहिर्बाह्यांश्चक्षुश्चैवांतरे भ्रुवोः ।**
**प्राणापानौ समौ कृत्वा नासाभ्यंतरचारिणौ ॥'**

बाह्य विषय बाहेरच राहू द्यायचे. प्राण आणि अपानावर लक्ष केंद्रित करून हळूहळू इंद्रिये ताब्यात ठेवण्याचा आपला आपणच प्रयास करायचा.

**'न कर्तृत्वं न कर्माणि लोकस्य सृजति प्रभुः ।**
**न कर्मफलसंयोगं स्वभावस्तु प्रवर्तते ॥१४॥'**

परमेश्वर कोणाचा कर्तेपणा आणि कर्म उत्पन्न करीत नाही तसेच कर्माचे फळही कोणाला देत नाही. ही सर्व कर्मे प्रकृतीच्या गुणांद्वारेच केली जातात. हा भाव दृढ झाला की हाच कर्मसंन्यास आहे. थोडक्यात; या अध्यायात आपण अज्ञानांसाठी मार्ग सोपान सांगताना कर्म, कर्मयोग आणि कर्मसंन्यास यातील अंतर स्पष्ट केले आहे. कर्मयोग म्हणजे कर्म करीत करीत फलत्याग तर कर्मसंन्यास म्हणजे कर्मत्याग. इथे संन्यास म्हणजे पारमार्थिक संन्यास नसून तो नैष्कर्म होऊन कर्म त्याग अवस्था होय. आपण कर्मयोगाला प्राधान्य दिले पाहिजे, नव्हे तेच आपल्यासाठी सुकर आहे. असे अनेक कर्म आपण फलासक्ती न ठेवता करतो. जसे आजोबांनी आंब्याचे झाड लावताना फळासक्ती ठेवलीच नाही. हीच आजोबांची अनासक्ती सर्व बाबतीत ठेवण्याचा प्रयत्न करायचा. हाच कर्म संन्यास योग आहे.

९८२२२६२७३५

### डीजेचा दणदणाट थांबला पाहिजे

सध्या आपल्याकडे कोणताही उत्सव साजरा करण्यासाठी मोठ्या आवाजात केल्याशिवाय तो साजरा झाला आहे, असे वाटत नाही. वाढदिवस असो, लग्नाची वरात, गणेशोत्सव मिरवणुकीत किंवा दहीहंडीचा कार्यक्रम असो डीजेच का लावता? यावेळी आपले पारंपरिक ढोल-ताशे, लेझीम पथक तयार करावेत. नुकतेच मुंबईमध्ये केवळ सराव करताना एक गोविंदा मृत्यू पावला याला जबाबदार कोण? जर सरकार मदत करते, पण गेलेला जीव परत येतो काय? केवळ मुंबईला डीजे बंदी करण्यापेक्षा राज्यात बंदी केली पाहिजेत. साताऱ्यात काही वर्षांपूर्वी डीजेच्या आवाजाने भिंत कोसळली. त्यामुळे दोन जणांचा मृत्यू झाला. अशा घटना अनेक जिल्ह्यात घडल्या आहेत. ध्वनिप्रदूषणाच्या सर्व मर्यादा ओलांडल्या. प्रशासन केवळ बघ्याच्या भूमिकेत होते, असेच म्हणावे लागेल. विविध ठिकाणी डीजेच्या कर्णकर्कश आवाजाच्या भिंती, मोठमोठे ढोल-ताशे, लाऊड स्पीकरवर वाजणारी गाणी यामुळे अनेकांना त्रास सहन करावा लागतो. पारंपरिक वाद्यांचा विसर पडला आहे. आपल्या परिसरात शाळा, दवाखाने असतात, याचे भान कोणी राखायचे? नुकतीच जन्मलेली मुले असतात.



डीजे, ढोलच्या आवाजाने किती त्रास सहन करणार? गेल्या वर्षी मिरवणुकीत पुणे शहरामध्ये लक्ष्मी रस्ता आणि दहा प्रमुख चौकांतील सरासरी ९० डेसिबलपेक्षा जास्त नोंदवली गेली. राज्यातील विविध शहरातही डीजेच्या आवाजाने अनेकांना त्रास सहन करावा लागला आहे. सध्या आपल्याला कोणतेही नियम आणि अटी नको झाल्या आहेत तर त्याचे पालन करणेही अवघड वाटू लागले आहे. डीजे पुढे बेभान होऊन नाचून काही जणांना हृदयविकाराचा झटकाही आला आहे तसेच लेझरच्या लाईटमुळे कोल्हापूरमधील तरुणाला डोळ्याला मोठ्या प्रमाणात इजाही झाली आहे. आपले पारंपरिक वाद्याचा विसर पडला आहे. त्यामुळे पुन्हा एकदा आपले लेझिम, झांज पथक विविध खेळांच्या माध्यमातून मिरवणुकीत स्थान मिळायला हवे. वारंवार सांगूनही आपण त्याकडे का डोळेझाक करतो समजत नाही. गेल्या वर्षांत राज्यात या मिरवणुकीत घडलेल्या घटनात सुमारे २१ जणांना आपला जीव गमवावा लागला

## वाचक पत्रे

उत्सव असला तरी समाजातील दुर्बल आजारी, दवाखाना परिसर याचे भान कधी येणार?

**संतोष राऊत**/ ९९६०१०४३४५

### ज्येष्ठांचाही विचार व्हावा

'आईसारखे दैवत नाही' हे वाक्य आता खोटे वाटायला लागले. ज्या आईच्या वेदनेतून तुमचा जन्म झाला; जिच्या कष्टामुळे तुम्ही स्वतःच्या पायावर उभे आहात; ती आई आज तुम्हाला जड झाली. तुमच्या सुंदर घरात तिची अडगळ वाटते. तशी काही मुले स्वतःच्या पोटाला पीळ देऊन, स्वतःच्या भावना मारून आईला जपतात. काही मुलांना इच्छा असते, परंतु आर्थिक परिस्थिती नाजूक असते तर काही मुले आईने वाढविले, ती जगात आहे हे सुद्धा विसरतात. स्वतःच्या संसारात मग्न असतात. काही मुलांना पैसे पाठवून कर्तव्य निभावले असे वाटते. आज समाजात अगदी क्लास वन ऑफिसरच्या बायकोपासून सर्वसाधारण महिलांची स्थिती अत्यंत नाजूक आहे. ज्यांना पेन्शन आहे त्यांचे ठीक. पूर्वी व्याजाचे दर खूप होते म्हणून लोकांनी पेन्शन न घेता फंड घेतला.

आज व्याजाचे दर कमी झाले. व्याजाच्या पैशांत दोन वेळेचा चहा-ब्रेड मिळणे कठीण झाले तर औषधे कुठून आणणार! म्हातारपण म्हणजे रोगांचे माहेरघर! मोठ्या आजारासाठी पाच लाख मिळतात, परंतु रोजच्या औषधांचे काय? शुगर-बीपी वगैरे बहुतेकांना असतो. तेव्हा ज्येष्ठ नागरिकांना ही औषधे फुकट मिळावी. त्यात जेनेरिक औषधांचा समावेश असावा. पैसे नको औषधे द्या व म्हातारपण काही अंशी सुखकर करा. ज्येष्ठ नागरिक म्हणजे राष्ट्रीय संपत्ती व मार्गदर्शक वगैरे फुकटचे सन्मान नको. आमच्याजवळ आंदोलन करण्याची ताकद नाही. एकत्र येणे शक्य नाही. तेव्हा इच्छामरणाचा कायदा करून आमची सुटका करा किंवा औषधे द्या. आज बहुतेक माता वाऱ्यावर सोडल्याप्रमाणे जीवन जगत आहेत. त्यांना आधार द्या ही सरकारला विनंती.

**निर्मला गांधी**/ ९११२२७५२८४

### नासुप्रमध्ये हवी ज्येष्ठ नागरिकांना बसण्याची सुविधा

नागपूर सुधार प्रन्यासमध्ये कामानिमित्त बरेचशे नागरिक येतात. त्यामध्ये ज्येष्ठ नागरिकसुद्धा असतात. मला नेहमी माझ्या प्लॉटच्या कामाकरिता जावे लागते. ठरलेली भेटायची भेट झाल्यावर लोक आत जायला गर्दी करतात. पहिल्या मजल्यावर 'गुंठेवारी' विभागात सध्या बरीच गर्दी असते. तिथे ज्येष्ठ नागरिकांना बसायची मुळीच सोय नाही. पायऱ्यांवरही बसता येत नाही. तसे तिथे बसायला कुणालाच बसण्यात स्वारस्य नसते.

नाईलाज म्हणून बसावे लागते. बहुतेक 'नासुप्र'कडे याकरिता निधी नसावा म्हणून त्यांचाही सोय करण्यासाठी नाईलाज आहे. माझी धर्मादाय संस्थांना विनंती की, त्यांनी चार-पाच बेंच नासुप्रला दान करावेत; जेणेकरून ज्येष्ठ लोकांची तात्पुरती बसण्याची सोय होईल.

**गणेश हजारे**/ ८६९८८१५५५९

हे पत्र मुद्रक व प्रकाशक कुलभूषणराम रामकृष्ण तारे यांनी सोलापूर तरुण भारत मीडिया लिमिटेड करिता, सोलापूर तरुण भारत कार्यालय प्लॉट नं ए -३२,छत्रपती संभाजीनगर इंडस्ट्रियल को ऑफ सोसायटी रेल्वे स्टेशन रोड छत्रपती संभाजी नगर ४३१००५ (महाराष्ट्र) येथे छापून दैनिक सोलापूर तरुण भारत कार्यालय,छत्रपती संभाजीनगर येथे प्रकाशित करून छत्रपती संभाजीनगर, जालना,परभणी,नांदेड, हिंगोली ,बीड येथील सोलापूर तरुण भारतच्या विभागीय कार्यालयातून वितरीत केले.
प्रबंध संपादक :विवेक घळसासी. मुख्य समुह संपादक : दिलीप यशवंत पेठे. मुख्य संपादक: प्रशांत वसंतराव माने, दूरध्वनी -८८८८८४७२६८ RNI Reg.No 46878/87
stbaurangabad@gmail.com. www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com या अंकात प्रसिद्ध झालेल्या बातम्या व लेख यामधून व्यक्त झालेल्या मतांशी संपादक/संचालक सहमत असतीलच असे नाही. (पी. आर. बी. कायद्यानुसार जबाबदारी)

# पोळ्याचा उत्साह; सर्जा-राजाच्या शृंगारासाठी शेतकऱ्यांची खरेदी जोरात









बीड : पोळा सणानिमित्त बाजारात बैलांना सजविण्याचे साहित्य विक्रीसाठी आले असून, खरेदीसाठी शेतकरी गर्दी करत आहेत. (छाया : कृष्णा शिंदे)

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

बीड जिल्हा हा प्रामुख्याने शेतीवर अवलंबून आहे. येथे सहा लाखांहून अधिक शेतकरी शेतीवर आपला उदरनिर्वाह करतात. शेतकऱ्यांच्या जीवनात बैलांचे स्थान अतिशय महत्त्वाचे आहे. आधुनिक शेतीसाठी यंत्रसामग्री आली असली, तरी आजही ग्रामीण भागात बैल हे शेतकऱ्यांचे विश्वासू साथीदार मानले जातात. कष्टकऱ्याच्य या जिवाभावाच्या साथीदाराचा पोळा हा सण दोन दिवसांवर येऊन ठेपला आहे. पोळा सणाच्या पार्श्वभूमीवर बाजारपेठा गजबजून गेल्या आहेत.

बैल सजविण्यासाठी लागणाऱ्या साहित्याची बाजारात मोठी रेलचेल पाहायला मिळत आहे. रंगीबेरंगी झूल, नक्षीदार गोंडे, सोनसळी व घंटा, पितळेचे हार, मणी, काचांच्या माळा, काठीवरील झेंडे, डोक्यावरील तुरा अशा सजावटी वस्तूंनी दुकाने व बाजारपेठेतील

गल्ल्या सजल्या आहेत.

फक्त पारंपरिक साहित्य नव्हे, तर आधुनिक डिझाइनच्या वस्तूंनाही शेतकऱ्यांकडून मागणी आहे. विशेषतः झगमगाटी झूल, नक्षीकाम केलेली घंटा, आकर्षक रंगांचे तुरे व फॅन्सी मण्याच्या माळांची मागणी अधिक असल्याचे व्यापारी गोविंद यादव यांनी सांगितले.

बीडच्या बाजारात ग्रामीण भागातून शेतकऱ्यांची गर्दी दिसत आहे. प्रत्येक शेतकरी आपली बैलजोडी सर्वांत सुंदर दिसावी, यासाठी सजावटीचे साहित्य निवडताना उत्साहाने मोलभाव करताना दिसतो. दरम्यान, पोळ्याच्या दिवशी शुक्रवारी (ता. २२) गावागावांत बैलांच्या मिरवणुका निघतात. लहानांपासून मोठ्यांपर्यंत सर्व जण यात सहभागी होतात. काही ठिकाणी बैलांच्या शर्यतीही होतात. खरेदीसाठी बाजारात आलेले शेतकरी रामभाऊ जगताप म्हणाले, 'बैलाशिवाय आमच्या शेतीचे काहीच काम होत नाही. पेरणीपासून ते कापणीपर्यंत बैल आमचा वरुणराजाने वाढविला शेतकऱ्यांचा उत्साह


दरम्यान, १३ दिवसांपासून सतत पावसाची हजेरी सुरू आहे. या चार दिवसांत तर वरुणराजाने जोरदार हजेरी लावल्याने शेतकरीवर्गात आनंदी वातावरण आहे. याचा परिणाम पोळा सणाच्या बाजारात दिसत आहे. प्रत्येकवर्षी पोळ्याच्या आधी विक्रीत मोठी वाढ होते. यंदाही मागणी विक्रमी आहे. ग्रामीण भागातून मोठ्या संख्येने ग्राहक आल्याने बाजारात चांगली उलाढाल होत असल्याचे गणेश शिंदे म्हणाले. मागील वर्षांच्या तुलनेत विक्रीत जवळपास २० ते २५ टक्क्यांनी वाढ होण्याची शक्यता आहे.

## श्री रामाचे चरित्र मानवी जीवन सुखकारक करते-विजय लाड

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

भगवान श्रीरामांच्या चरित्रातील अनेक प्रसंगांचे चिंतन आणि मनन केल्यास मानवी जीवनातील सर्व दुःख सहन करण्याची शक्ती मिळते आणि आयुष्य सुखकारक करण्यास मदत होते असे विचार ज्येष्ठ समर्थ भक्त विजय लाड यांनी कल्याण येथील श्रीराम मंदिर येथे श्री राम कथा सप्ताह समारोप वेळी व्यक्त केले.

दिनांक सात ते तेरा ऑगस्ट या दरम्यान विजय लाड यांनी प्रभू श्रीरामचंद्रांच्या सगुणलीलांचे संकीर्तन श्रीराम कथेच्या माध्यमातून सादर केले . श्री रामजी मंदिर , पार नाका, कल्याण येथील विश्वस्त आणि दासबोध सखोल अभ्यास उपक्रमाने ही श्री रामकथा आयोजित केली होती.



या कथेसाठी सौ. रंजना पाटील , मंगल बोरसे, सुप्रिया जोग, अभय पुराणिक, डॉ. अमोल नेवे, अंजली कार्लेकर, अपर्णा आपटे, प्रतिभा पायगावकर ,प्राची भावे, रेवा देशपांडे, सोमनाथ पाटील, अशोक पाठक, सुनिता मोराणकर , सीमा पटवर्धन, सुरेखा गोखले , स्वाती मराठे, पुराणिक काका, प्रकाश लेले, प्रसाद चाफेकर , संदीप पळनिटकर, सौ. अमृता जोशी, रंजना पाठक, अपर्णा वांगीकर, शुभदा थिटे, सुचेता देशपांडे, नितीन निमकर यांनी परिश्रम घेतले.

या श्रीराम कथेसाठी खोपोली, पुणे, डोंबिवली, ठाणे, अंबरनाथ, येथून आलेल्या साधकांनी उपस्थिती लावली. महाप्रसादाने कथेच्या समारोपाची सांगता झाली. असे, समर्थ भक्त प्रा,दत्तात्रय कुलकर्णी यांनी कळविले आहे,९४२०६५५३१६

## डॉ.नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळीत निर्भय बनो मॉर्निंग वॉक संपन्न

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० ऑगस्ट**

महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळी च्या वतीने शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या स्मृतिदिनानिमित्त परळी शहरातील जिजामाता उद्यान ( गार्डन ) येथे दिनांक २० ऑगस्ट रोजी निर्भय बनो मॉर्निंग वॉकचे आयोजन करण्यात आले होते.



या मॉर्निंग वॉकला परळी येथील जिजामाता उद्यान ( गार्डन ) दिनांक २० ऑगस्ट बुधवार रोजी सकाळी ठीक ७ वाजता सुरुवात करण्यात आली. कार्यक्रमाच्या सुरुवातीला शहीद डॉ. नरेंद्र दाभोळकर यांच्या प्रतिमेस महाराष्ट्र अंधश्रद्धा निर्मूलन समिती शाखा परळीच्या सर्व पदाधिकारी व पुरोगामी विचारांच्या नागरिकांनी पुष्प अर्पण करून आदरांजली अर्पण केली. त्या नंतर निर्भय बनो मॉर्निंग वॉक करण्यात आले. यावेळी कार्यकर्त्यांनी जोरदार घोषणाबाजी ही केली.

याप्रसंगी जेष्ठ अंनिस सदस्य जी.एस.सौंदळे,प्रा. विलास रोडे,रानबा गायकवाड, अनिलराव मस्के , अशोक मुंडे,विकास वाघमारे,दिपक शिरसाट, नवनाथ दाने, पत्रकार संभाजी मुंडे, पत्रकार संजीब रॉय, विठ्ठलराव झिलमेवाड, बाळासाहेब किरवले,राहुल सुर्यवंशी, माधव अजले, भगवान राठोड, विनायक काळे, भानुदास उपाडे, आनंद तुपसमुद्रे, सुमित कलशेटे आदी उपस्थित होते.



## होळ येथे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे यांचा सेवापूर्तीनिमित्त गौरव

### जंगी मिरवणूक काढून नागरी सत्कार; माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे यांची विशेष उपस्थिती

**तभा वृत्तसेवा**
**केज दि.२० ऑगस्ट**

तालुक्यातील होळचे सुपुत्र, राज्याच्या व्हीआयपी सुरक्षा विभागाचे माजी विशेष पोलिस महानिरीक्षक अंकुशराव शिंदे हे नुकतेच सेवानिवृत्त झाले. त्यांच्या कार्याचा गौरव करण्यासाठी सेवापूर्ती सन्मान सोहळ्याचे आयोजन रविवारी (दि.१७) सकाळी ११ वाजता होळ येथील हनुमान मंदिरात करण्यात आले. या सोहळ्यापूर्वी ग्रामस्थांनी जंगी मिरवणूक काढून त्यांचे उस्फूर्त स्वागत केले.

कार्यक्रमाला राजस्थानचे माजी मुख्य न्यायमूर्ती संभाजीराव शिंदे विशेष अतिथी म्हणून उपस्थित होते. सोहळ्याचे अध्यक्षस्थान सरपंच अश्विनीताई शिंदे यांनी भूषविले. प्रमुख अतिथींमध्ये मांजरा कारखान्याचे माजी कार्यकारी संचालक दत्ता शिंदे, माजी सरकारी वकील ॲड.प्रकाश शिंदे, पुणे सीआयडीचे माजी पोलीस उपअधीक्षक दीपक शिंदे, केंद्रप्रमुख रमेश कांबळे, माजी प्राचार्य डॉ.ज्ञानोबा सरवदे, बारामती ॲग्रोचे प्रबंधक अंकुश ढवारे, मुख्याध्यापक धर्मराज शिंदे, हृदयरोगतज्ज्ञ डॉ.नवनाथ घुगे, डॉ.गणेश ढवारे यांचा समावेश होता.

यावेळी मान्यवरांचा होळ ग्रामस्थांच्यावतीने सपत्नीक सत्कार करण्यात आला. ग्रामस्थांच्या पुढाकाराने पार पडलेल्या या सोहळ्यास परिसरातील नागरिकांनी उत्स्फूर्त प्रतिसाद देत मोठ्या संख्येने हजेरी लावली. होळ गावातील दोन उच्चपदस्थ अधिकाऱ्यांचा झालेला हा गौरव सोहळा ग्रामस्थांसाठी अभिमानाचा क्षण ठरला. यावेळी जिल्ह्यातील राजकीय, सामाजिक व प्रशासकीय क्षेत्रातील अनेक मान्यवरही उपस्थित होते.

आठवणींना उजाळा

या सोहळ्यात संभाजीराव शिंदे व अंकुशराव शिंदे यांनी आपल्या मनोगतातून शालेय जीवनापासून ते आजवरच्या प्रवासातील अनेक आठवणींना उजाळा दिला. दोघेही बनेश्वर शिक्षण संस्थेचे माजी विद्यार्थी असल्याने शिक्षण संस्थेबद्दल व होळच्या मातीतून मिळालेल्या संस्कारांबद्दल त्यांनी कृतज्ञता व्यक्त केली. त्यांच्या भाषणातून गावाशी असलेली घट्ट नाळ प्रकर्षाने जाणवली.

## नीट-पीजी २०२५ मध्ये राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग यश
## डॉ.प्रज्वल उखळीकरची १०९५ रॅन्क मिळवत यशाला गवसणी

**तभा वृत्तसेवा**
**परळी वैद्यनाथ दि.२० ऑगस्ट**

वैद्यकीय उच्च शिक्षणात अत्यंत महत्त्वपूर्ण टप्पा मानल्या जाणाऱ्या वैद्यकीय राष्ट्रीय परीक्षेत (नीट- पीजी) चि.डॉ. प्रज्वल दिनकरराव उखळीकर (जोशी) याने देशातील पहिल्या अकराशे यशस्वितांमध्ये स्थान मिळवले आहे. नीट- पीजी २०२५ परीक्षेत त्याने राष्ट्रीय स्तरावर उत्तुंग यश संपादन केले असुन लाखोंच्या स्पर्धेत १०९५ वा रॅन्क मिळवत यशाला गवसणी घातली आहे.या उत्तुंग यशाबद्दल त्याचे सर्व स्तरातून अभिनंदन होत आहे.

नॅशनल बोर्ड ऑफ एक्झामिनेशन्स इन मेडिकल सायन्सेस (NBEMS) कडून वैद्यकीय राष्ट्रीय परीक्षा घेण्यात आली होती. देशभरातील वैद्यकीय पदव्युत्तर शिक्षण घेऊ इच्छिणार्या लाखो विद्यार्थ्यांसाठी महत्त्वाची असणार्या नीट-पीजी २०२५ परीक्षेचा निकाल नुकताच जाहीर झाला आहे. या परीक्षेसाठी २.४२ लाख उमेदवारांनी नोंदणी केली होती.ही परीक्षा ३ ऑगस्ट रोजी देशभरातील ३०१ शहरांमधील १०५२ परीक्षा केंद्रांवर घेण्यात आली होती.या परीक्षेत पात्र ठरलेल्या उमेदवारांसाठी एमडी, एमएस, पीजी डिप्लोमा, पोस्ट-एमबीबीएस डीएनबी, सहा वर्षांचा थेट डीआरएनबी तसेच एनबीईएमएस डिप्लोमा अशा पदव्युत्तर अभ्यासक्रमांची प्रवेश प्रक्रियेला लवकरच सुरुवात होणार आहे.



## बीडमधील शेतकरी संकटात; केंद्राकडून मदतीचा हात द्या

### खा.बजरंग सोनवणेंनी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची भेट घेवून केली मागणी

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

बीड जिल्ह्यात मागील चार दिवसांपासून पाऊस जोरदार हजेरी लावत असून जिल्ह्यामधील बहुतेक सर्वच महसुल मंडळामधे अतिवृष्टीची नोंद झालेली आहे. शेतातील पिके पाण्यात आहेत. दोन दिवसांपुर्वी खा.बजरंग सोनवणे यांनी थेट शेतात जावून नुकसानीची पाहणी केली होती. आज दि.१९ रोजी केंद्रीय मंत्री अमित शहा यांची दिल्ली येथे भेट घेवून अतिवृष्टीमुळे संकटात सापडलेल्या नुकसानग्रस्त शेतकऱ्यांना केंद्र सरकारकडून मदतीचा हा द्या, अशी मागणी खा.बजरंग सोनवणे यांनी केली.



## पोलिसांनी विद्यार्थ्यांमध्ये रुजवले 'नशामुक्त' जीवनाचे बीज

### किल्लेधारूर पोलीस स्टेशनचा अभिनव उपक्रम: श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलमध्ये नशामुक्तीवर एकांकिका शिबिर



**तभा वृत्तसेवा**
**किल्लेधारूर दि.२० ऑगस्ट**

आजची युवा पिढी व्यसनाच्या विळख्यात अडकण्यापासून वाचवण्यासाठी धारूर पोलिसांनी एक स्तुत्य उपक्रम राबवला. १८ ऑगस्ट रोजी धारूर पोलीस स्टेशनच्या वतीने श्रीकृष्ण इंग्लिश स्कूल येथे विद्यार्थ्यांसाठी 'नशामुक्ती' विषयावर एकांकिका शिबिराचे आयोजन करण्यात आले होते. या शिबिरामुळे विद्यार्थ्यांना व्यसनाचे दुष्परिणाम प्रत्यक्ष अनुभवातून समजून घेता आले, ज्यामुळे या उपक्रमाला मोठा प्रतिसाद मिळाला.

या शिबिरात विद्यार्थ्यांना व्यसनामुळे होणारे शारीरिक, मानसिक आणि सामाजिक दुष्परिणाम एकांकिकेच्या माध्यमातून प्रभावीपणे दाखवण्यात आले. या नाट्यमय सादरीकरणाने विद्यार्थ्यांच्या मनावर सखोल परिणाम केला. शिबिरानंतर, पोलीस निरीक्षक देविदास वाघमोडे यांनी सर्व विद्यार्थ्यांना नशामुक्तीची प्रतिज्ञा दिली.

यावेळी बोलताना पोलीस निरीक्षक वाघमोडे यांनी सांगितले की, युवा पिढीला व्यसनापासून दूर ठेवणे ही काळाची गरज आहे. केवळ कायद्याची अंमलबजावणी करून हे शक्य नाही, तर जागृती आणि शिक्षणाच्या माध्यमातूनच हे शक्य आहे. त्यामुळेच, विद्यार्थ्यांच्या कोवळ्या मनावर सकारात्मक प्रभाव पाडण्यासाठी अशा कार्यक्रमांची गरज आहे.

या कार्यक्रमाला धारूर पोलीस स्टेशनचे कर्मचारी, श्रीकृष्ण इंग्लिश स्कूलचे शिक्षक आणि मोठ्या संख्येने विद्यार्थी उपस्थित होते. हा अभिनव उपक्रम विद्यार्थ्यांच्या जीवनाला योग्य दिशा देणारा ठरला, असे मत अनेक पालकांनी व्यक्त केले. या कार्यक्रमाचे यशस्वी आयोजन पोलीस आणि शाळा प्रशासनाच्या सहकार्याने शक्य झाले.

## न्यायालयातच सरकारी वकिलाने घेतली फाशी

### वडवणीच्या न्यायालयातील घटना

**तभा वृत्तसेवा**
**बीड दि.२० ऑगस्ट**

वडवणी न्यायालयातील कार्यरत असणारे सहाय्यक सरकारी अभियोक्ता ॲड. व्हि.एल. चंदेल (वय अंदाजे ४७ वर्षे) यांनी कार्यालयातच आज सकाळी दहा वाजता गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पोलीस आले असता त्यांना मयत्याच्या खिशात लिखित चिठ्ठी मिळून आली असल्याची चर्चा देखील घटनास्थळावर होती मात्र याबाबत पोलिस अधिकार्यांनी याबाबत दुजोरा दिला नाही. अशी घटना राज्यात प्रथमच घडली आहे.या घटनेने न्यायालयीन क्षेत्रासह बीड जिल्ह्यात खळबळ उडाली आहे.



वडवणी न्यायालयाचे सहाय्यक सरकारी अभियोगता ॲड. व्हि. एल. चंदेल हे रा. पालम तालुक्यातील असल्याचे सांगण्यात आले आहे. तर ॲड.चंदेल ही सकाळी १० वा. न्यायालयात कामकाजासाठी स्वतःच्या कार्यालयात हजर झाले व त्या ठिकाणी असलेल्या खिडकीला सत्कार शालिनी गळफास घेऊन आत्महत्या केली आहे. ही वार्ता न्यायालयासह परिसरात वेगाने पसरली तेव्हा न्यायालयासमोर व न्यायालयात बघणार्यांची संख्या दिसून आली.

घडलेल्या घटनेचा घटनास्थळाचा पंचनामा करण्यासाठी पोलीस हजर झाले तेव्हा पंचनामे दरम्यान मयत सरकारी वकिलाच्या खिशात मजकूर असलेली लिखित चिठ्ठी मिळून आली. त्याच बरोबर इतर तेथील वस्तू देखील पोलिसांनी ताब्यात घेतल्या आहेत. अशी माहिती सांगण्यात येत आहे. लिखित चिठ्ठी काय लिहिले आहे हा मजकूर समजलेला नाही व याबाबत पोलिसांनी दुजोरा अधिकृतपणे दिला नाही. घटनास्थळाचा पंचनामा केला असून घटनास्थळी अंबाजोगाईच्या अप्पर पोलीस अधीक्षक चेतना तिडके यांनी भेट घेत घडलेल्या घटनेचा क्रम समजून घेत पाहणी केली आहे. मयताचा मृतदेह हा वडवणी येथील प्राथमिक आरोग्य केंद्रात शवविच्छेदन करण्यासाठी पाठवला आहे.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# झोपडपट्टी धारकांना पी. आर. कार्ड, फुलेमार्केट, व समृद्धीच्या शेतकऱ्यांचा प्रश्न मार्गी लागल्याने हनुमानघाट येथे जल्लोष यशस्वी पाठपुराव्याबद्दल आ. अर्जुनराव खोतकर यांचे मानले आभार

## आ. खोतकर हे खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील लोकनेते–विष्णू पाचफुले

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले म्हणाले की, जालना शहरातील फुले मार्केटची उभारणी, नांदेड – समृद्धी मार्ग बाधित शेतकरी आणि झोपडपट्टीवाशीयांना पी. आर. कार्ड या प्रश्नांची प्रतीक्षा पूर्ण झाली आहे. आ. अर्जुनराव खोतकर यांनी या विषयासाठी रात्रंदिवस सातत्याने केलेला पाठपुरावा यशस्वी ठरला आहे. पी. आर. कार्डच्या निर्णयामुळे हजारो कुटुंबांना केवळ कायदेशीर मान्यता नव्हे, तर सुरक्षिततेची नवी हमी मिळाली आहे. झोपडपट्टीवासी आता निर्धास्तपणे आपल्या भविष्यासाठी योजना आखू शकतील. फुले मार्केट उभारणीमुळे मूळ गाळेधारकांना दिलासा मिळणार असून, नांदेड समृद्धी बाधित शेतकऱ्यांनाही न्याय मिळण्याचा मार्ग मोकळा झाला आहे. आ. खोतकर हे खऱ्या अर्थाने जनतेच्या मनातील लोकनेते आहेत, ज्यांच्या प्रयत्नामुळे वरील प्रश्न मार्गी लागल्याचे त्यांनी सांगितले.

जालना/प्रतिनिधी : गेल्या साडेतीन महिन्यापासून नांदेड समृद्धी बाधित शेतकऱ्यांचा प्रश्न, फुले मार्केटची उभारणी तसेच जालना शहरातील २५ वर्षांपासून अस्तित्वात असलेल्या झोपडपट्टीधारकांना पी. आर. कार्ड मिळवून देण्याचा प्रश्न अखेर मार्गी लागला आहे. माजी मंत्री तथा आमदार अर्जुनराव खोतकर यांनी सातत्याने केलेल्या पाठपुराव्यामुळे उपमुख्यमंत्री व नगरविकास मंत्री एकनाथराव शिंदे यांच्या हस्तक्षेपाने हा ऐतिहासिक निर्णय झाला. या निर्णयाची घोषणा होताच हनुमान घाट येथे शहर शिवसेनेच्यावतीने आज बुधवार दि. २० ऑगस्ट रोजी शिवसेनेचे शहर प्रमुख विष्णू पाचफुले यांच्या उपस्थितीत फटाके फोडून, पेढे वाटून जल्लोष करत आ. खोतकर यांचे



मन:पूर्वक आभार व्यक्त करण्यात आले. झोपडपट्टीवाशीयांच्या आयुष्याशी निगडित असलेल्या या जिव्हाळ्याच्या प्रश्नावर आ. खोतकर अनेक वर्षांपासून सातत्याने प्रयत्नशील होते. अगर त्यांनी हा प्रश्न मार्गी लावल्याने हनुमान घाट या झोपडपट्टी भागातील नागरिकांनी जल्लोष केला. यावेळी उपस्थित नागरिकांनी या निर्णयाचे स्वागत करत आ. खोतकर हेच आपले खरे हितचिंतक अशा भावना व्यक्त करून त्यांचे आभार मानले. यावेळी माजी नगरसेवक संजय गायकवाड, श्री. चोपडे, मनोज गुळवे, संजय कानडे, पांडुरंग वैघ, राजु घोडे, मुकुंदा साळुंके, गणेश राऊत, गणेश नन्नवरे, अंकित काळे, विनोद जाधव, लखन गायकवाड, मंगेश बोंडे, आकाश मोरे, गौरव जाधव, कार्तिक काळे, राहुल डुरे, दिलिप गुळवे, सतिश कटक, अशोक कांयदे,शुभम शिंदे,दत्ता इंगळे, सोमनाथ औरंगे, आजुदामावशी हिवाळे, चंद्रकला घोडे,निलाबाई इंगळे, सखुबाई धनकुरे, राधाबाई वैद्य, विमलबाई दुधाने, कुसुमबाई मोरे, गंगाबाई जाधव, यमुनाबाई नवले, शोभा सवडे, सुरेखा कानडे, मंदाबाई सोनार, कमलबाई भालेराव, मंदा मिसाळ, मथुराबाई शेळके, सुशिला काळे, कुसुम नन्नवरे, कुसुम शेळके, कौशलाबाई गाढे, यशोदा कटक, अनिताबाई कटक, निलाबाई इंगळे, राधाबाई वैद्य, चंद्रकलाबाई घोडे, गंगाबाई जाधव, श्रीमती शेळके निला धोंडगे आजोदाबाई, छायाबाई घोडे, चंद्रकलाबाई मोरे, श्रीमती गाढे, विमलबाई गंगावणे, श्रीमती कांयदे यांच्यासह नागरिकांची मोठ्या संख्येने उपस्थिती होती.

## संक्षिप्त

### माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी



तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

जालना (जिमाका) :– माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांच्या जयंतीनिमित्त त्यांच्या प्रतिमेस जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी पुष्पहार अर्पण करून अभिवादन केले. माजी प्रधानमंत्री राजीव गांधी यांची जयंती 'सद्भावना दिन' म्हणून साजरी करण्यात येते. यानिमित्ताने जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी जिल्हाधिकारी कार्यालयातील अधिकारी–कर्मचाऱ्यांना सद्भावना दिनाची सामुहिक प्रतिज्ञा दिली. यावेळी अपर जिल्हाधिकारी रिता मैत्रेवार, निवासी उपजिल्हाधिकारी गणेश महाडिक, उपजिल्हाधिकारी नम्रता चाटे, उपजिल्हाधिकारी शशिकांत हदगल, उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, तहसीलदार अनिल नव्हाते व रंगराव मेंडके, नायब तहसीलदार तुषार निकम, सतिश तायडे, विक्रांत मोंढे, किशोर तायडे, रविंद्र हेलगर, अतुल केदार, संपदा कुलकर्णी, कुंता पठाडे यांच्यासह अधिकारी – कर्मचारी उपस्थित होते.

### अतिवृष्टीमुळे शेतकऱ्याचे पिकाची प्राथमिक पाहणी करताना अंबड उपविभागीय अधिकारी उमाकांत पारधी



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील वडीगोद्री मंडळातील सततच्या पावसामुळे व मागील दोन दिवसांमध्ये अतिवृष्टीमुळे झालेल्या पिकांच्या प्राथमिक पाहणी करण्यात आली आज रोजी मौजे नालेवाडी रेनापुरी वडीगोद्री धाकलगाव या शिवारामध्ये उपविभागीय अधिकारी अंबड उमाकांत पारधी यांच्याकडून प्राथमिक पाहणी करण्यात आली यावेळी उपस्थित वडीगोद्री मंडळ अधिकारी संदीप नरोटे कृषी सहाय्यक कड शेतकरी उपस्थित होते.

### घाणेवाडी धरणाची जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी केली पाहणी



तभा वृत्तसेवा
जालनाा / प्रतिनीधी

घाणेवाडी धरण क्षेत्रात मागील काही दिवसापासून झालेल्या सततधार पावसामुळे धरण पुर्ण क्षमतेने भरले आहे. घाणेवाडी धरणाला प्रामुख्याने जालना शहराला पाणी पुरवठा करणारे प्रमुख धरण म्हणुन ओळखले जाते. जिल्हाधिकारी आशिमा मित्तल यांनी भेट देऊन पाहणी केली. यावेळी त्यांनी संबंधित यंत्रणेच्या अधिकाऱ्यांना सांडव्यावर पाण्याचा थेट प्रवाह सोडू नये तसेच उजव्या व डाव्या सांडव्यावरील आवश्यक ती देखभाल दुरुस्तीची कामे तातडीने करण्याचे निर्देश दिले. यावेळी उपजिल्हाधिकारी मनिषा दांडगे, उपविभागीय अधिकारी रामदास दौंड, तहसीलदार छाया पवार, महापालिका उपायुक्त नंदा गायकवाड, अभियंता सय्यद सईद यांच्यासह संबंधित विभागाचे अधिकारी उपस्थित होते.

## बसस्थानक रस्त्यावर मुरुम टाकणयास सुरुवात

### परतूरकरांना मोठा दिलासा – महेश नळगे यांचा पुढाकार

तभा वृत्तसेवा
परतूर / प्रतिनिधी

परतूर शहरातील पोलीस स्टेशन ते बसस्थानक आणि पुढे अग्निशमन दलापर्यंतचा रस्ता मोठ्या खड्डेमय अवस्थेत असल्याने नागरिकांना प्रचंड हालअपेष्टा सहन कराव्या लागत होत्या. पावसाळ्यात तर या रस्त्यावर मोठमोठी पाण्याची डबकी तयार होऊन वाहतूकदार, रुग्णवाहिका तसेच शालेय वाहनांना मोठ्या अडचणींचा सामना करावा लागत होता.

या गंभीर समस्येची दखल घेत जिल्हाप्रमुख उबाठा महेश नळगे यांनी पुढाकार घेत नागरिकांना दिलासा दिला आहे. त्यांनी स्वत:च्या स्वखर्चाने या रस्त्यावर मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले. आज सकाळीच या कामाला सुरुवात करण्यात आली असून नागरिकांनी मोठ्या उत्साहाने या उपक्रमाचे स्वागत केले.



मागील अनेक वर्षापासून या रस्त्याची दुरवस्था झाली होती याठिकाणी शाळा असल्याने विद्यार्थ्यांना तसेच नागरिकांना साधे चालणे देखील कठीण झाले होते. ही बाब लक्षात घेत छोटासा पुढाकार घेत याठिकाणी मुरूम टाकण्याचे काम हाती घेतले आहे. – महेश नळगे, जिल्हाप्रमुख उबाठा–जालना

रस्त्याची अवस्था पाहता प्रशासनाकडून योग्य ती दुरुस्ती होण्याची अपेक्षा होती; मात्र अनेक वर्षांपासून हा प्रश्न रखडत असल्याने लोकांमध्ये नाराजी निर्माण झाली होती. त्यातूनच महेश नळगे यांनी स्वखर्चातून हा रस्ता काही प्रमाणात वापरायोग्य करण्याचा निर्णय घेतला.

यावेळी स्थानिक नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते. नळगे यांच्या या उपक्रमामुळे परतूरकरांना मोठा दिलासा मिळाल्याचे नागरिकांनी सांगितले. नेहमी तक्रारींवर चर्चा होते, पण प्रत्यक्षात रस्ता सुधारण्याचे काम केले, यासाठी आम्ही त्यांचे आभारी आहोत, अशा प्रतिक्रिया नागरिकांकडून व्यक्त झाल्या.

## बाराव्या शतकातील खडकेश्वर महादेव मंदिर संरक्षित स्मारकाच्या यादीत



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील जामखेड येथील खडकेश्वर महादेव मंदिरास राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाला असुन मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस आज राज्यातील पाच मंदिरांना राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा बहाल केला असुन त्या यादीत जामखेड येथील खडकेश्वर महादेव मंदिराचा समावेश आहे. दि. १३ रोजी महाराष्ट्र शासनाने खडकेश्वर महादेव मंदिर, जामखेड हे राज्य संरक्षित स्मारक म्हणून घोषित करण्याबाबतचा प्राथमिक अधिसूचनेचा प्रस्ताव जारी केला होता. बाराव्या शतकातील खडकेश्वर महादेव मंदिर पश्चिमाभिमुख असुन मंदिराचा तलविन्यास, अर्ध मंडप, तारकाकृती सभामंडप, बाजूला दोन गर्भगृह वजा देवकोष्टे, अंतराळ व तारकाकृती विधान असलेला मुख्य गाभारा असा आहे. मत्स्येंद्रनाथ, सरस्वती, कुबेर, भैरव, चामुंडा, शक्ती देवतांची विशिष्ट जागेवरील शिल्पे, नाग, हंस व घुबडासारख्या प्राण्यांचे वैशिष्ट्यपूर्ण अंकन असलेल्या या मंदिरात उपास्य देवतेची कला साधना व तंत्र मंत्र साधना होत असावी असे मंदिर अभ्यासकांचे मत आहे. भगवान श्रीकृष्ण आणि जांबुवंत यांच्या युध्दामुळे प्रसिद्ध असलेल्या जामखेड परिसरातील खडकेश्वर महादेव मंदिर लोककथेसाठी प्रसिद्ध आहे. राज्य संरक्षित स्मारकाचा दर्जा मिळाल्यामुळे ते जतन करण्यात येवून तेथे अत्यावश्यक सुविधा दिल्या जातील जालना जिल्ह्याच्या पर्यटनात वाढ होईल. पुरातत्त्व विभागाच्या सहाय्यक संचालक जया वाहने यांनी यासाठी प्रयत्न केले आहे.

बाराव्या शतकातील खडकेश्वर महादेव मंदिर हे मुर्तीशिल्प लाभलेले विशेष मंदिर असुन सतराव्या शतकात या मंदिराच्या छताची दुरुस्ती अहिल्यादेवी होळकर यांच्या कारकिर्दीत झालेली असुन गावकऱ्यांनी देखील मंदिराची दुरुस्ती केलेली आहे. राज्य संरक्षित स्मारक झाल्यानंतर पर्यटकांच्या संख्येत वाढ होईल. – रामभाऊ लांडे, अशासकीय सदस्य महावारसा समिती, जालना

## भोकरदन येथील गट शिक्षणाधिकाऱ्याच्या केबिन समोरील व्हरांड्यात आम आदमी पार्टीचे कार्यकर्ते उद्या करणार झोपा काढाआंदोलन!

तभा वृत्तसेवा
भोकरदन / प्रतिनिधी

आम आदमी पार्टीच्या वतीने भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषदेच्या शाळांचा एक ऑगस्ट ते सात ऑगस्ट दरम्यान सर्वे करण्यात आला. त्यावरून असे निदर्शनात आले आहे की, शाळांची अतिशय दुरावस्था असून विद्यार्थ्यांची शैक्षणिक गुणवत्ता खालावत आहे याला शासन आणि प्रशासन पूर्णपणे जबाबदार असून फक्त झोपा काढण्याचे काम करत आहे. झोपलेल्या शासन व प्रशासनाला जागे करण्यासाठी आम आदमी पार्टी मार्फत भोकरदन येथील गटशिक्षणाधिकारी यांच्या केबीन समोर कार्यालयातील व्हरांड्यात दिनांक २१ ऑगस्ट बुधवार रोजी शासन, प्रशासनाला जागी करण्यासाठी प्रतिकात्मक रित्या झोपा काढा आंदोलन करण्यात येणार येणार असल्याचे आम आदमी पार्टीच्या वतीने मुख्यमंत्री, जिल्हाधिकारी, मुख्य कार्यकारी अधिकारी जिल्हा परिषद जालना, शिक्षणाधिकारी (प्राथमिक व माध्यमिक) जि. प. जालना यांना गटशिक्षणाधिकारी यांच्या मार्फत निवेदन देण्यात आले असल्याचे आम आदमी पार्टीचे जिल्हा उपाध्यक्ष कडूबा बोरसे गुरुजींनी यांनी सांगितलं.



यावेळी जनार्दन पा. सोळंके, महजाद खान, इब्राहिम कुरेशी, फारुक भाई व पार्टिचे कार्यकर्ते उपस्थित होते.

✻ काय आहे मागण्या ✻

भोकरदन तालुक्यातील जिल्हा परिषद शाळांच्या पडायला आलेल्या शाळा खोल्या त्वरित पाडून नवीन खोल्या बांधकाम करण्यात यावे. शिक्षकांच्या जागा रिक्त ठेवु नयेत. प्रत्येक विषयासाठी तज्ञ शिक्षकाची नेमणुक करण्यात यावी. कोणत्याही शिक्षकाला अशैक्षणिक काम देण्यात येऊ नये. प्रतिनियुक्तीवर इतरत्र पाठवू नये किंवा ऑफिसमध्ये बोलावून घेऊ नये. प्रत्येक शाळेला संरक्षण भिंतीची, खेळाच्या मैदानाची व्यवस्था करण्यात यावी. प्रत्येक शाळेमध्ये शुद्ध पिण्याच्या पाण्याची व्यवस्था करण्यात यावी. प्रत्येक शाळेमध्ये मुला मुलींसाठी स्वतंत्र उत्तम दर्जाचे स्वच्छता गृह बनवण्यात यावेत. वर्ग खोलीमध्ये लाईट पंखे व्यवस्था करण्यात यावी तसेच प्रत्येक शाळेला स्वतंत्र मीटर देऊन लाईट बिल भरणा करण्याची व्यवस्था शासनाने करावी. शिक्षकांना नेमणूक दिलेल्या गांवात राहणे बंधनकारक करावे. विद्यार्थ्यांना बसण्यासाठी आरामदायी डेक्सबेंच ची व्यवस्था करावी. प्रत्येक शाळेला एक सेवक व एक लिपीक नेमावा आम आदमी पार्टीच्या श्री केजरीवाल यांनी जे दर्जेदार शिक्षण व्यवस्था दिल्लीमध्ये निर्माण केली होती त्याच दिल्ली मॉडलचा पॅटर्न संपूर्ण महाराष्ट्रामध्ये राबविण्यात यावा. जिल्हा परिषदेच्या सरकारी शाळा गुणवत्ता पूर्ण उत्तम दर्जाच्या बनवण्यात याव्यात.

## वारंवार वादळामुळे सोलर प्लेटची मोठ्या प्रमाणात नुकसान शेतकरी त्रस्त



तभा वृत्तसेवा
अंबड प्रतिनिधी

अंबड तालुक्यातील झिरपी तांडा येथील श्री मच्छिंद्र कनीराम राठोड यांच्या शेतामध्ये शक्ती पंप इंडिया प्रायव्हेट लिमिटेड या कंपनीचा शेतात सोलर पॅनल बसविलेले आहे काल परवा मुसळधार पावसामुळे वाऱ्यामुळे सोलर प्लेटवर झाड पडल्यामुळे त्यांचे सोलर पॅनल खूप मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे

# रोटरी क्लब सेंट्रल आयोजित कार्यक्रमात देशभक्तीचा अनोखा सांस्कृतिक अविष्कार

तभा वृत्तसेवा
जालना / प्रतिनिधी

स्वातंत्र्यदिनाचे औचित्य साधून रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रलतर्फे आयोजित ये जो देश है मेरा या कार्यक्रमाने सांस्कृतिक व देशभक्तीपर अविष्कार घडविला.

दि. १५ ऑगस्ट रोजी सायंकाळी सेंटमेरी हायस्कूलच्या सभागृहात पार पडलेल्या या कार्यक्रमात पुणे येथील निच इंटरटेन्मेंटच्या कलावंतांनी भारताच्या ७८ वर्षांच्या स्वातंत्र्य प्रवासाचा गौरवशाली इतिहास अत्यंत प्रभावी व भावपूर्ण रीतीने सादर केला. सांस्कृतिक, सामाजिक, औद्योगिक आणि राजकीय क्षेत्रातील भारताचा प्रवास, ऐतिहासिक तैलचित्रे, देशभक्तीपर गीते, नृत्याविष्कार, उत्कृष्ट सूत्रसंचालन व नेपथ्याद्वारे प्रेक्षकांसमोर जिवंत करण्यात आला.

या कार्यक्रमाला रोटरीचे प्रांतपाल सुधीरजी लातूरे, सौ. संगीतताई लातूरे, माजी प्रांतपाल डॉ. सुरेश साबू यांची प्रमुख उपस्थिती होती. जालना रोटरी परिवारातील सदस्य आणि नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.



या कार्यक्रमासाठी एसआरजे गुप, जयलक्ष्मी कास्टींग अँड अलॉयज, नथुमल वासुदेव, कृष्णा मॉल, अंकुश सर इंस्टीट्युट, व ओम स्विट मार्ट, छ. संभाजीनगर येथील रोटरी क्लब ऑफ औरंगाबादचे सतीष लोणीकर यांचे आर्थिक सहकार्य लाभले. कार्यक्रमाच्या यशस्वीतेसाठी रोटरी क्लब ऑफ जालना सेंट्रलचे अध्यक्ष डॉ. आशुतोष सोनी, सचीव सचिन लोहिया, कोषाध्यक्ष डॉ. जितेंद्र मत्सावार, प्रकल्प प्रमुख भरत जैन, अभय करवा, परेश रायठ्ठा, सीए सागर कावना व सर्व सदस्य यांनी विशेष परीश्रम घेतले.

सोलापूर तरुण भारत
www.dainiktarunbharat.com, epaper.dainiktarunbharat.com

# अतिवृष्टी बाधित भागाच्या पाहणीसाठी जिल्हाधिकारी थेट शेतीच्या बांधावर

## नुकसानीचे तत्काळ पंचनामे करण्याचे दिले आदेश



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**
जिल्ह्यात गेल्या तीन दिवसांत झालेल्या मुसळधार पावसामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे मोठ्या प्रमाणावर नुकसान झाले आहे. विशेषतः सोयाबीन, उडीद, कापूस आदी पिकांवर कीडरोग आणि पावसामुळे झालेल्या पाणी साचल्याने पिके आडवी होऊन शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी आज बुधवारी (दि. २०) वसमत तालुक्यातील हट्टा येथे थेट शेतीच्या बांधावर प्रत्यक्ष जावून बाधित पिकांची पाहणी केली.

यावेळी जिल्हा अधीक्षक कृषी अधिकारी राजेंद्र कदम, स्मार्ट प्रकल्पाचे नोडल अधिकारी जी. बी. बंटेवाड, तालुका कृषी अधिकारी, महसूल विभागाचे अधिकारी तसेच शेतकरी उपस्थित होते.

जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शेतशिवारात जाऊन सोयाबीन पिकावर पडलेल्या कीडरोगाचा प्रत्यक्ष पाहणी करत शेतकरी बांधवांशी संवाद साधून त्यांनी अतिवृष्टी व रोगराईमुळे निर्माण झालेल्या अडचणी जाणून घेतल्या. शेतकऱ्यांनी जिल्हाधिकाऱ्यांसमोर सोयाबीन पिकाचे कोमेजलेले रोपे, पाने गळणे, काडांवर कीड लागणे, तसेच मुसळधार पावसामुळे पिके जमिनीत पडल्याची उदाहरणे मांडली.

या सर्व परिस्थितीचा आढावा घेताना जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शेतकऱ्यांचे नुकसान तात्काळ नोंदवून पंचनामे करून अहवाल तयार करावा. कोणत्याही शेतकऱ्याला यासाठी त्रास होणार नाही याची दक्षता घेण्याच्या सूचना महसूल व कृषी विभागाच्या अधिकाऱ्यांना स्पष्ट सूचना दिल्या. तर पंचनाम्यांच्या आधारे शेतकऱ्यांना शासनाच्या आपत्ती व्यवस्थापन निधीतून व विविध शेतकरीहिताच्या योजनांमधून मदत मिळवून देण्यासाठी जिल्हा प्रशासन प्रयत्नशील राहील, असे त्यांनी शेतकऱ्यांना सांगितले. शेतकरी हा आपल्या देशाचा कणा आहे. त्याच्या अडचणी सोडवणे हे शासनाचे कर्तव्य आहे. कुठल्याही शेतकऱ्याला मदतीपासून वंचित ठेवले जाणार नाही. पंचनामे पूर्ण झाल्यानंतर शासनाच्या मार्गदर्शक सूचनांनुसार योग्य ती मदत तातडीने दिली जाईल, अशा शब्दांमध्ये जिल्हाधिकारी गुप्ता यांनी शेतकऱ्यांना दिलासा दिला.

यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी औंढा नागनाथ तालुक्यातील रुपूर तांडा येथे भेट देऊन गौण खनिज साठे येथे भेट देत पाहणी केली.

# सण, उत्सव शांततेत साजरे करा- पोलिस अधीक्षक कोकाटे



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**
गणेशोत्सव, ईद-ए-मिलाद, वाई गोरक्षनाथ यात्रा व दसरा महोत्सव हे सण येत्या काळात एकत्रित येत आहेत. जिल्ह्यात हे सण साजरे करतांना सर्व धर्मियांनी एकमेकात परस्पर सौहार्द व शांतता ठेवून साजरे करावेत, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी केले. जिल्हाधिकारी कार्यालयातील नियोजन भवन येथे आज शांतता समितीची बैठक संपन्न झाली. त्यावेळी ते बोलत होते.

बैठकीस अपर जिल्हाधिकारी महेंद्रकुमार कांबळे, अपर पोलीस अधिक्षक कमलेश मीना, जिल्हा ग्रामीण विकास यंत्रणेचे प्रकल्प संचालक नामदेव केंद्रे, निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यु बोधवड, उपविभागीय अधिकारी समाधान घुटुकडे, तहसीलदार श्रीकांत भुजबळ तसेच विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी यासह शांतता समितीचे सदस्य व इतर सदस्यांची उपस्थिती होती.

यावेळी बोलताना श्री. कोकाटे म्हणाले, डिजेचा आवाजामुळे उत्सव काळात ध्वनी प्रदूषण मोठे होते. नागरिकांनी डीजे न लावता व विविध सामाजिक उपक्रम राबवून सण उत्सव साजरा करण्यावर भर द्यावा, असे आवाहन पोलीस अधीक्षक श्री. कोकाटे यांनी केले. नागरिकांनी प्रशासनाला सहकार्य करावे. उत्सव काळात येणाऱ्या अडचणी सोडविण्यासाठी नागरिकांनी पोलीस प्रशासनास सहकार्य करावे. पोलीस प्रशासन नेहमी दक्ष असून नागरिकांनी योग्य माहिती द्यावी. कोणत्याही नागरिकांनी कायदा हातात घेऊ नये. उत्सव काळात गुन्हेगारीला आळा बसविण्यासाठी प्रशासनाच्यावतीने प्रतिबंधात्मक कार्यवाही करण्यात येत आहे. यासाठी चांगले नियोजन केले असून नागरिकांना कोणतीही अडचण होणार नाही याची काळजी प्रशासनाकडून घेण्यात येत असल्याचे जिल्हा पोलीस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे यांनी सांगितले.

सर्व गणेश मंडळांनी ऑनलाईन परवानगी घ्यावी. सोशल मिडियावर कोणतीही पोस्ट करताना त्याची खातरजमा करावी. चुकीच्या पोस्टची माहिती दिल्यास संबंधितावर कारवाई करण्यात येईल. तसेच शासनाच्या निर्देशानुसार आवश्यक त्या उपाययोजना कराव्यात. सर्वांनी मिळून शांततेत व एकतेने सण साजरे करुन हिंगोली परंपरा कायम ठेवावी, अशा सूचना अपर पोलीस अधीक्षक कमलेश मीना यांनी दिल्या.

सामाजिक एकात्मता व अखंडता राखण्यासाठी प्रयत्न करावा. उत्सव साजरे करताना एकोप्याने, शांततेने व समोपचाराने साजरे करावेत. शासनाने दिलेल्या सूचनांचे पालन करुन सण, उत्सव आदर्श पद्धतीने साजरे करावेत, अशा सूचना निवासी उपजिल्हाधिकारी अभिमन्यू बोधवड यांनी दिल्या.

शांतता समितीच्या सदस्यांनी गणेशोत्सव, ईद ए मिलाद व दसरा महोत्सव या सणामध्ये येणाऱ्या अडचणी मांडल्या. त्या निवारण्यासाठी योग्य नियोजन करण्यात येईल, असे जिल्हा प्रशासनाच्यावतीने सांगितले. सण उत्सवाच्या काळात शांतता समितीचे सदस्य, सर्व सामाजिक नेत्यांनी आपापल्या गावात, नगरात शांतता राहील यासाठी स्वतः प्रयत्न करावे. तसेच प्रशासनाला सहकार्य करण्याचे आवाहनही यावेळी करण्यात आले.

# कृती संगमबाबत आवश्यक ते सहकार्य करणार- जिल्हाधिकारी

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**
नवतेजस्विनी प्रकल्पांतर्गत राबविण्यात येणारे उप प्रकल्प तसेच माविममार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजना तसेच महिला बचत गट कर्ज, वैयक्तीक उद्योग व्यवसायाचे कर्ज गावपातळीवर विविध यंत्रणाच्या माध्यमातून राबविण्यासाठी कृतीसंगमबाबत आवश्यक ते सहकार्य करण्यात येईल, असे जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी सांगितले.

महिला आर्थिक विकास महामंडळाच्या जिल्हा कार्यालयामार्फत आज नवतेजस्विनी महाराष्ट्र ग्रामीण महिला उद्यम विकास प्रकल्पांतर्गत जिल्हास्तरीय सल्लागार समितीची बैठक जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांच्या अध्यक्षतेखाली



घेण्यात आली. या बैठकीमध्ये, आरोग्य तपासणी, जाणीव जागृती कार्यक्रम, जिल्हा उद्योग केंद्रा, खादी ग्रामोद्योग, पशुसंवर्धन विभाग, कृषि विभाग, महिला बाल कल्याण विभाग तसेच इतर यंत्रणामार्फत राबविण्यात येणाऱ्या विविध योजनांचा लाभ महिलांना देण्याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. माविम मित्रमंडळ, कायदा साथी, संयुक्त मालकी हक्क उप प्रकल्पासाठी कृती संगम याबाबत सविस्तर चर्चा करण्यात आली. लाडकी बहीण योजनेंतर्गत महिला सहकारी संस्था स्थापनेबाबत चर्चा करण्यात आली. यावेळी सल्लागार समितीचे विविध विभागाचे विभाग प्रमुख उपस्थित होते. विविध विभाग प्रमुखांनी आवश्यक ते सहकार्य करण्याचे आश्वासन दिले.

मुख्यमंत्री रोजगार निर्मिती कार्यक्रम व प्रधानमंत्री सूक्ष्म अन्न प्रक्रिया उद्योग तसेच विविध योजनेतील प्रलंबित प्रकरणे बँकानी तात्काळ निकाली काढावेत, अशा सूचना संबंधित बँकेच्या अधिकाऱ्यांना यावेळी जिल्हाधिकारी राहुल गुप्ता यांनी दिले. यावेळी जिल्हा अग्रणी बँकेचे अधिकारी व विविध विभागाचे अधिकारी, कर्मचारी उपस्थित होते.



**हिंगोली- येथील जिल्हा परिषद कार्यालयासमोर राष्ट्रीय आरोग्य अभियानांतर्गत काम करणाऱ्या कंत्राटी अधिकारी व कर्मचाऱ्यांना शासकीय सेवेत कायम समावेशन करा या मागणीसाठी काम बंद आंदोलन सुरू असून या आंदोलनात मोठ्या संख्येने महिला कर्मचारीही सहभागी झाल्या आहेत. छाया- विजय गुंडेकर**

## संक्षिप्त वृत्त

### मनोहर जोशी नांदापूरकर यांचे निधन



हिंगोली- शहरातील सरस्वती नगर भागांमधील रहिवासी तसेच कळमनुरी महात्मा ज्योतिबा फुले माध्यमिक विद्यालयातील सेवानिवृत्त शिक्षक मनोहर दत्तात्रय जोशी नांदापूरकर (वय ६५) यांचे १९ ऑगस्ट रोजी दुपारी २.१५ वाजता दुःखद निधन झाले. मागील काही दिवसापासून ते आजारी असल्याने त्यांच्यावर उपचार केला जात होता. २० ऑगस्ट रोजी सकाळी नऊ वाजता हिंगोली शहरातील पावर हाऊस जवळील स्मशानभूमीत अंत्यसंस्कार करण्यात आले. त्यांच्या पश्चात पत्नी, तीन मुले, सुना, नातवंड असा परिवार आहे पंकज जोशी (नांदापूरकर) यांचे ते वडील होत.

### राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत बालाजी विद्यालयातील विद्यार्थ्यांचे यश



हिंगोली- महाराष्ट्र योगासन स्पोर्ट्स असोसिएशन द्वारा संगमनेर या ठिकाणी आयोजित सहाव्या राज्यस्तरीय योगासन स्पर्धेत श्री बालाजी विद्यालय वाई या शाळेचा इयत्ता दहावीतील विद्यार्थी मारोती तुकाराम पोटे हा लेग बॅलेन्स या प्रकारात राज्यस्तरावर निवडला गेला आहे. या निवडीबद्दल त्याचे सर्वत्र कौतुक व अभिनंदन होत आहे. जिल्हा योगासन असोसिएशनचे सचिव रंगराव साळुंखे, अध्यक्ष माधुरी शास्त्री यांच्यासह पतंजली योग समितीचे कुंडलिकराव निर्मले, राजकुमार टिळे, बालासाहेब हरण, राणी खिल्लारी, गजानन खंदारे, दत्तात्रय पोफळे, संजय नाईक यांच्यासह पालक व ग्रामस्थांनी त्याचे अभिनंदन केले आहे. १६ ते १८ ऑगस्ट दरम्यान झालेल्या या योगासन स्पर्धेत हिंगोली जिल्ह्यातून वेगवेगळ्या प्रकारात शहाजी देशमुख, संजीवनी गुहाडे,ईश्वरी पोटे, नितेश कपाटे, ज्ञानेश्वर लाखाडे, पूजा जाधव, प्रीती जाधव, वेदिका पवार, प्रतीक्षा जाधव, वैष्णवी बेले, अंजली वानोळे, आरती बोडखे आदी तेरा विद्यार्थी योग मार्गदर्शक विठ्ठल सोळंके, कैलास शैव, द्वारका डुकरे रामकिशन मोरे, डॉ. संतोष कल्याणकर, प्रतापराव देशमुख यांच्या मार्गदर्शनात सहभागी झाले होते.

# मस्तानशहा नगरात बापाने गळफास घेतला, मुलगी मृतावस्थेत आढळली

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली २० ऑगस्ट**
शहरातील मस्तानशहा नगरात बुधवार दि २० ऑगस्ट रोजी पहाटे राहत्या घरात बापाने गळफास घेवून आत्महत्या केल्याची तर शेजारीच मुलीचा मृतदेह आढळल्यामुळे एकच खळबळ उडाली. या घटनेची माहीती पोलिसांना मिळाल्यानंतर पोलिसांनी घटनास्थळी धाव घेतली असून दोघांचे मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या सामान्य रूग्णालयात दाखल करण्यात आले.

पोलिसांनी दिलेल्या माहीतीनुसार शहरातील मस्तानशहा नगर भागात सय्यद शाकेर वय ४८ यांचे घर आहे. घरी पत्नी, एक मुलगी, दोन मुले असा परिवार आहे. सय्यद शाकेर हे खाजगी वाहनावर चालक म्हणून काम करतात. नेहमीप्रमाणे सय्यद शाकेर व त्यांचे कुटुंब मंगळवारी रात्री जेवण करून झोपले होते.

दरम्यान बुधवारी पहाटे चार वाजण्याच्या सुमारास सय्यद शाकेर यांच्या पत्नीला जाग आल्यानंतर त्यांना सय्यद शाकेर यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला. तर मुलगी मन्तशा परवीन यांचाही मृतदेह आढळून आला. पती व मुलीचा मृतदेह पाहून त्या घाबरून गेल्या. त्यांनी घटनेची माहीती नातेवाईकांना दिली. त्यानंतर पहाटे चार वाजता पोलिस अधीक्षक श्रीकृष्ण कोकाटे, शहर पोलिस ठाण्याचे पोलिस निरीक्षक संदीप मोदे, सहाय्यक पोलिस निरीक्षक आनंद बनसोडे, जमादार अशोक धामणे, संजय मार्के, शेख अमजद, शेख मुजीब, संतोष करे, गणेश लेकुळे, गणेश वाबळे यांच्या पथकाने घटनास्थळी धाव घेतली.

पोलिसांनी घटनास्थळी पाहणी केली असता सय्यद शाकेर यांचा मृतदेह गळफास घेतलेल्या स्थितीत आढळून आला तर घटनास्थळी रक्त सांडलेले असल्यामुळे त्यांनी हात कापूर घेतल्याचे दिसून आले. तर बाजूलाच मुलगी मन्तशा परवीन यांचाही मृतदेह आढळून आला. पोलिसांनी दोघांचेही मृतदेह उत्तरीय तपासणीसाठी हिंगोलीच्या शासकीय रूग्णालयात दाखल केले. उत्तरीय तपासणीनंतर दोघांचेही मृतदेह ताब्यात देण्यात आले असून त्यांच्यावर अंतिम संस्कार करण्यात आले. उत्तरीय तपासणीनंतरच मुलगी मन्तशा परवीन हिचा मृत्यू कसा झाला हे स्पष्ट होणार असून याप्रकरणी अद्याप शहर पोलिसात गुन्हा दाखल झालेला नव्हता. या घटनेमुळे परिसरात एकच खळबळ उडाली आहे.


# तेलगाव, आरळ, कोनाथा येथे पुराचे पाणी शिरल्यामुळे नुकसान



**तभा वृत्तसेवा**
**तभा वृत्तसेवा**
**वसमत, २० ऑगस्ट**
तालुक्यातील तेलगाव, आरळ, कोनाथा रिधोरा या भागात तीन दिवसांपासून अतिवृष्टीमुळे पुराचे पाणी शेतात शिरल्यामुळे पिकांचे मोठे नुकसान झाले असून तत्काळ पंचनामे करून आर्थिक मदत देण्याची मागणी शेतकऱ्यांमधून होत आहे.

मागील तीन दिवसांपासून तेलगाव, आरळ, कोनाथा, रिधोरा या भागात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाली. त्यामुळे या भागातील नाले, ओढे तसेच नद्यांना पूर आला. पूराचे पाणी शेतात शिरल्यामुळे सोयाबीन, हळद, मुग आदी पिकांचे आतोनात नुकसान झाले आहे. त्यामुळे शेतकरी चिंतेत सापडला असून आर्थिक संकटात आहे. प्रशासनाने तत्काळ या भागातील शेतकऱ्यांच्या पिकांच्या नुकसानीचे पंचनामे करून आर्थिक मदत करण्याची मागणी शेतकरी करीत आहेत. भाजपच्या नेत्या प्रिती जैस्वाल यांनी या भागात पिकांच्या नुकसानीची पाहणी केली.

# सोडेगाव येथे अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान, मदतीची मागणी



**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**
सततच्या अतिवृष्टीमुळे सोडेगाव परिसरातील शेतकऱ्यांचे मोठे नुकसान झाले आहे. पिके पाण्याखाली गेली असून अनेक शेतजमिनींचे उत्पन्न धोक्यात आले आहे. गावकऱ्यांनी सामूहिक निवेदनाद्वारे शासनाकडे मदतीची मागणी केली आहे.

दि १८ ऑगस्ट रोजी हे निवेदन जिल्हाधिकारी, उपविभागीय अधिकारी, तहसीलदार, पंचायत समिती जिल्हा परिषद आदी प्रशासनाकडे सादर करण्यात आले. यात तात्काळ पंचनामा करून नुकसानभरपाई देण्यात यावी, तसेच पूरस्थिती टाळण्यासाठी ओढ्याचे खोलीकरण व सरळीकरण करावे, यासह गावाच्या सुरक्षिततेसाठी नवीन पूल मंजूर करण्यात यावा अशी मागणी करण्यात आली आहे.

या निवेदनावर गावकऱ्यांच्या वतीने वैभव निळकंठे, निलेश नीलकंठे, गणपत निळकंठे आणि शिवाजी निळकंठे यांची दिले असून सर्व ग्रामस्थांनी एकत्रितपणे शासनाचे लक्ष वेधले आहे. गावकऱ्यांचा आरोप आहे की, गेल्या काही वर्षांपासून अतिवृष्टीमुळे शेतकऱ्यांचे मोठे नुकसान होत असले तरी शासन दरबारी योग्य ती मदत पोहचत नाही. त्यामुळे शेतकरी आर्थिक संकटात सापडले आहेत. शासनाने तात्काळ मदत जाहीर करून शेतकऱ्यांना दिलासा द्यावा, अशी मागणी या निवेदनातून स्पष्ट करण्यात आली आहे

# पेडगाव येथे ग्रामसभा होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्या समस्या जैसे थे

**तभा वृत्तसेवा**
**हिंगोली, २० ऑगस्ट**
तालुक्यातील पेडगाव येथे मागील चार ते पाच वर्षापासून ग्रामसभा होत नसल्यामुळे ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण होत नाही. दि २० ऑगस्ट रोजी ग्रामसभा होती परंतु ग्रामसेवक व सरपंच यांनी कोरम अभावी सभा पुढे ढकलली.



वास्तविक जलजीवनचे काम निकृष्ट दर्जाचे झाले असून ग्रामस्थांच्या समस्यांचे निराकरण होत नाही. तत्काळ संबंधितांची चौकशी करून ग्रामसभा घेण्यात यावी अशी मागणी येथील ग्रामस्थांनी मुख्य कार्यकारी अधिकारी यांचेकडे निवेदनाक्षारे केली आहे.

पेडगाव येथे कंत्राटदार डी डी जयस्वाल यांनी जलजीवनचे काम केले आहे. परंतु सदरील काम निकृष्ट दर्जाचे झाले आहे. याबाबत ग्रामस्थांनी मंत्रालयाचे पत्र, कार्यकारी अभियंता यांचे चौकशी अहवाल आदी असूनही अद्याप संबंधितांवर कोणतीही कार्यवाही प्रशासनाकडून करण्यात आली नाही.

दि २० ऑगस्ट रोजी पेडगाव येथे ग्रामसभेचे आयोजन करण्यात आले होते. या ग्रामसभेला गावातील लोक जमा झाले परंतु ग्रामसेवक व सरपंच यांनी कोरम पूर्ण नाही असे म्हणून ग्रामसभा पुढे ढकलली. त्यामुळे संतप्त गावकऱ्यांनी जिल्हा परिषद कार्यालय गाठून मुख्य कार्यकारी अधिकारी यांना निवेदन सादर केले आहे. तसेच संबंधित कंत्राटदाराची चौकशी करून दोषींवर कार्यवाही करावी अन्यथा आमरण उपोषण करण्याचा इशारा दिला आहे. निवेदनावर उमेश राठोड यांच्यासह ग्रामस्थांच्या स्वाक्षऱ्या आहेत.

सोलापूर तरुण भारत
न मे कर्मफले स्पृहा
https://epaper.dainiktarunbharat.com

# पूर ओसरला; आता उरला लोकांचा आक्रोश अन् मातीचे ढिगारे





**साईनाथ कोटगीरे**
**बाऱ्हाळी, दि. २० ऑगस्ट -**

मुखेड तालुक्यातील बा-हाळी, मूक्रमाबाद, लातूर जिल्ह्यातील उदगीर व कर्नाटक सीमा भागात ढगफुटीमुळे लेंडी नदीला आलेल्या महापुराचे पाणी सहा गावात शिरल्याने मोठी वित्तहानी झाली होती .हसनाळ येथे काल तीन व आज दोन असे पाच मृतदेह सापडले असून मृत्यूची संख्या आता पाचवर गेली आहे हसनाळ येथे भारतीय सैन्य दल युद्धपातळीवर बचाव कार्यात गुंतले आहे पूर ओसरला आता गावाचे विदारक चित्र दिसत आहे तेथे फक्त आता मातीचे ढिगारे ,व लोकांचा आक्रोश उरला आहे.

दि.१८ च्या रात्री बा-हाळी येते तब्बल ३५४.८ मी. मी. व मुक्रमाबाद येथे २०६ .८ मी.मी. असा विक्रमी पाऊस पडला तर लेंडी प्रकल्पाच्या पाणलोट क्षेत्रात ढगफुटी झाली असल्याने भेंडेगाव भिंगोली हसणाळ रावणगाव ,भासवाडी हे गाव लेंडी नदीच्या पाण्यात बुडाले लेंडी नदीवर रावणगाव येथे आंतरराज्य प्रकल्पाची घळभरणी झाली आहे व प्रकल्पग्रस्त गावकऱ्यांनी पुनर्वसनाच्या ठिकाणी मूलभूत सुविधा प्रशासनाने पुरविली नसल्याने मूळ गावातच होते अचानक पाणी वाढत असल्याने बरेचसे गावकरी हे सुरक्षित ठिकाणी आपले सर्व काही सोडून आश्रयास गेले पण पुरात ३०० च्या जवळपास नागरिक अडकले होते त्यांना राज्य आपत्ती निवारण दलाच्या जवानांनी सुरक्षितरीत्या बाहेर काढले पण हसणाळ येथे बेपत्ता पाच नागरिकांपैकी काल तीन व आज दोन असे पाच जणांचे मृतदेह सापडले आहेत. घटनास्थळी भारतीय लष्कराचे जवान वैद्यकीय पथकासह बचाव कार्यात उतरले आहेत. त्यांनी गावकऱ्यांना स्वतः जेवनाची व्यवस्था केली. काल हसनाळ येथे जिल्हाधिकारी राहूल कर्डीले,अतिरिक्त पोलीस अधीक्षक सूरज गूरव , आ.डॉ. तुषार राठोड उपविभागीय पोलीस अधिकारी तहसीलदार ,आरोग्य अधिकारी यांच्यासह अनेक वरिष्ठ शासकीय अधिकारी मदत कार्यावर लक्ष ठेवून होते .यात मोठ्या प्रमाणावर वित्तहानी झाली ,संसार उपयोगी साहित्य ,तसेच पाळीव गुरेढोरे मृत्युमुखी पडले तर शेकडो एकर जमिनीवरील पिके ही खरडून गेली आहेत . आता पूर ओसरला असून गावाचे विदारक चित्र दिसत आहे. गावात फक्त मातीचे ढिगारे व चिखल उरले आहे.उपाशीपोटी प्रत्येक जण आपापल्या घरी कांही सापडते काय याची पाहणी करीत आहेत.

**घळभरणीच्या घाईमुळेच मृत्यूतांडव**

लेंडी प्रकल्पाच्या अभियंत्यावर कारवाई करण्याची मागणी. प्रकल्प बाधित गावातील जनतेचा हा रोष प्रामुख्याने लेंडी प्रकल्पाचे अभियंता तिडके यांच्यावर आहे पुनर्वसनाचे काम पूर्ण झाले नसतानाही पोलीस बंदोबस्तात घळभरणीची त्यांनी घाई केली. लेंडी नदीचे पाणी गावात मोठ्या प्रमाणावर येणार नसल्याचे गावकऱ्यांना सांगितले होते पण पूर्ण गावच पाण्यात बुडाल्याने आम्हाला अधिकाऱ्यांनी फसवल्याचे गावकऱ्यांचे म्हणणे आहे तरी त्यांच्यावर कडक कार्यवाही करण्याची मागणी त्यांनी प्रशासनाकडे केली आहे.

# जवळा गावात नागरी समस्यांचा डोंगर



**तभा वृत्तसेवा**
**सोनखेड, दि. २० ऑगस्ट -**

लोहा तालुक्यातील सोनखेड सर्कल मधील जवळा या गावामध्ये पिण्याचे पाणी, वीज नाही यासह अनेक समस्या निर्माण झाल्या असून शालेय विद्यार्थी तसेच गावकऱ्यांना नागरी सुविधांअभावी अनेक संकटांना सामोरे लागत आहे त्यामुळे जिल्हा प्रशासनाने याकडे लक्ष देऊन गावकऱ्यांना मूलभूत सुविधा उपलब्ध करून द्याव्यात अशी गावकऱ्यांकडून मागणी होत आहे.

जवळा या गावातील जिल्हा परिषद शाळेच्या मैदानामध्ये शेतातील पाणी येत असून या शाळेच्या मैदानाला तळ्याचे स्वरूप आले आहे त्यामुळे विद्यार्थ्यांना शाळेमध्ये जाने अवघड झाले आहे. स्वातंत्र्य दिनी शुक्रवार १५ ऑगस्ट रोजी शालेय विद्यार्थी, शिक्षक, गावकरी यांनी शाळा परिसराला वेढा घालून ध्वजारोहण केला तरी सरपंच, ग्रामसेवक याकडे दुर्लक्ष करत आहेत. शाळेतील शौचालय दुरुस्तीच्या नावाखाली मागील चार महिन्यापासून तोडफोड करून ठेवले आहे त्यामुळे शालेय विद्यार्थ्यांची शौचालयाअभावी मोठी गैरसोय होत आहे.

जिल्हा परिषदेच्या सांगण्यावरून पाणी आडवा पाणी जिरवा योजनेचा शोष खड्डा शाळा परिसरामध्ये खोदण्यात आला असून त्या खड्ड्यामध्ये गावातील दुर्गंधीयुक्त सांडपाणी जमा झाले आहे. खड्ड्यावर झाकण नसल्यामुळे या खड्ड्यामध्ये एखादा शालेय विद्यार्थी पडण्याचा धोका निर्माण झाला आहे. तसेच या दूषित पाण्यातील डास, मच्छर, जीव जंतू याच खड्ड्याच्या बाजूला असलेल्या किचन शेड मधील अन्नामध्ये जाऊन विद्यार्थ्यांना उलटी, जुलाब होण्याची शक्यता न करता येत नाही.

शाळेच्या परिसरामध्ये असलेल्या हातपंपातुन पिवळ्या रंगाचे दूषित पाणी येत आहे तसेच या हातपंपामध्ये गावातील सांडपाणी पाझरत आहे आणि हेच पाणी ग्रामपंचायत कडून शुद्ध करून शालेय विद्यार्थी आणि गावकऱ्यांना पिण्यास दिले जात आहे. त्यामुळे सर्व गावकऱ्यांना रोगराई होण्याची शक्यता आहे. गावामध्ये एकच डीपी असून तो नादुरुस्त झाला आहे. त्यामुळे पावसाळ्यात गावकऱ्यांना अंधारात राहावे लागत आहे. एवढ्या मोठ्या समस्यांचा सामना गावकरी गेल्या अनेक दिवसांपासून करत आहेत मात्र गावचे सरपंच आणि ग्रामसेवक या समस्या सोडवण्याला प्राधान्य देत नाहीत तरी जिल्हा प्रशासनाने गांभीर्याने या समस्या सोडाव्यात अशी मागणी गावकऱ्यांकडून होत आहे

**दोन सरपंचाची जबाबदारी स्वीकारण्यास टाळाटाळ**

जवळा ग्रामपंचायतीचा कारभार दोन सरपंचांनी वाटून घेतला असून सुरुवातीची अडीच वर्षे कमलबाई साहेब शिखरे यांनी सरपंच म्हणून काम पाहिले आणि त्यानंतरचे उर्वरित अडीच वर्षे इंदूबाई माधव पावडे या कारभार बघत आहेत परंतु हे दोन्ही सरपंच गावाच्या समस्या सोडवण्याची जबाबदारी स्वीकारताना दिसून येत नाहीत.

**ग्रामसेवक तालुक्यावरून चालवतात गावाचे प्रशासन**

जवळा ग्रामपंचायतचे ग्रामसेवक म्हणून गजानन कोंडमंगले कार्यरत असून ते लोहा येथे वास्तव्यास आहेत. ग्रामपंचायतमध्ये एकही दिवस न येता काही काम असले तर लोह्यामध्ये या असे गावकऱ्यांना ते म्हणतात. १५ ऑगस्ट रोजी स्वातंत्र्य दिनाच्या ध्वजारोहणाला सुद्धा ते अनुपस्थित होते.

## संक्षिप्त वृत्त

### शेतकऱ्यांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये नुकसान भरपाई जाहीर करा: मनसे



**माहूर** -माहूर,किनवट या तालुक्यांसह नांदेड जिल्ह्यात दिनांक १४ ऑगस्ट रोजी च्या मध्यरात्रीपासून पावसाचा जोर जिल्ह्यातील सर्व सोळाही तालुक्यांमध्ये सारखा कायम असल्याकारणाने अतिवृष्टी व नदी-नाल्याला आलेल्या पूरामुळे शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान झाले शासनाने ओला दुष्काळ जाहीर करुन नुकसानग्रस्त सर्व बाधीतांना सरसकट हेक्टरी ५० हजार रुपये मंजूर करून शेतकऱ्यांच्या सातबाऱ्यास संलग्न असलेल्या बँक खात्यामध्ये तातडीने रक्कम जमा करावी, अशी मागणी महाराष्ट्र नवनिर्माण सेनेच्या शिष्टमंडळाकडून जिल्हाधिकारी मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांचेकडे निवेदनाद्वारे करण्यात आली आहे. मनसेचे जिल्हाध्यक्ष रवि राठोड, मनवीसे राज्य उपाध्यक्ष दीपक स्वामी,मनविसे जिल्हाध्यक्ष, पवन पाटील,मनवीसे शहराध्यक्ष शुभम पाटील, मनवीसे जिल्हाध्यक्ष शक्ती परमार,मनविसे जिल्हाध्यक्ष संतोष सुनेवाड,जिल्हा उपाध्यक्ष योगेश मोरे,उत्तर विधानसभा अध्यक्ष विशाल पावडे,भोकर माजी शहर अध्यक्ष आकाश घंटेवाड, मनविसे शहर सचिव अमर कोंडराज,मनसैनिक धम्मपाल आढाव,विठ्ठल राठोड,संजय खराडे यांच्यावतीने जिल्हाधिकारी मार्फत राज्याचे मुख्यमंत्री यांना निवेदनाद्वारे करण्यात आली आहे.

### शेतकऱ्यांना सरसकट १ लाखाची मदत जाहीर करा : महाविकास आघाडी



**हिमायतनगर**-हिमायतनगर तालुक्यात मागील चार पाच दिवसांपासून सतत झालेल्या अतिवृष्टीमुळे तालुक्यातील विशेषता नदी काठावरील शेतकऱ्यांच्या पिकांचे अतोनात नुकसान होऊन अनेक ठिकाणी पशुहानी व मोठ्या प्रमाणात घरांची पडझड झाली आहे. त्यामुळे हिमायतनगर तालुक्यासह शहरातील जनजीवन विस्कळीत झाल्यामुळे तालुक्यातील नुकसानग्रस्त भागातील शेतकऱ्यांना हेक्टरी एक लाख रुपयाची तात्काळ मदत जाहीर असे निवेदन महाविकास आघाडीकडून देण्यात आले. तालुक्यातील महापुरामुळे पीक व जमीन पूर्णतः बाधित झाली असून त्या नुकसानग्रस्त भागाचे तात्काळ सर्वे करून त्यांचे पंचनामे करा व घरांच्या पडझडीचा सर्वे करून त्यांना तात्काळ मदत जाहीर करा अशा अनेक मागणीसाठी हिमायतनगर येथील महाविकास आघाडी कडून आज दि २० ऑगस्ट रोजी हिमायतनगर तहसीलदार पल्लवी टेमकर यांना लेखी निवेदन देऊन मागणी केली आहे. यावेळी हिमायतनगर तालुक्यातील महाविकास आघाडीचे कार्यकर्ते व पदाधिकारी मोठ्या संख्येने उपस्थित होते.

### माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची जयंती साजरी

**नरसी** -भारताचे माजी पंतप्रधान राजीव गांधी यांची ८१ वी जयंती नरसी येथील लहुजी साळवे नगरात आज दि. २० ऑगस्ट २०२५ रोजी साजरी करण्यात आली. यावेळी बाबुराव पाटील शिंदे होटाळकर यांच्या हस्ते राजीव गांधी यांच्या प्रतिमेचे पूजन करून अभिवादन करण्यात आले. यावेळी जेष्ठ पत्रकार गोविंद नरसीकर, सामाजिक कार्यकर्ते संतोष कुडके,नागोराव कुडके, शेखर पांचाळ, मारोती कुडके, पुंडलिक भाऊ, शिवाजी महाराज कुंचेलीकर सह गावातील नागरिक मोठ्या संख्येने उपस्थित होते.

# आ.भिमराव केराम यांनी केली पुरबाधित क्षेत्राची पाहणी



**तभा वृत्तसेवा**
**किनवट, दि. २० ऑगस्ट -**

किनवट व परिसरात झालेल्या ढगफुटी सदृष्य पावसामुळे शेतकरी आणि नागरिकांवर मोठे अस्मानी संकट कोसळले आहे. निसर्गाच्या या प्रचंड तडाख्यामुळे शेतमाल, घरे व इतर मालमत्तेचे मोठ्या प्रमाणात नुकसान झाले आहे. या पार्श्वभूमीवर किनवट माहुर विधानसभा मतदारसंघाचे आमदार भिमरावजी केराम यांनी दि.२० रोजी पूरग्रस्त गावांचा दौरा करुन परिस्थितीचा आढावा घेतला.

या पाहणी दौऱ्यात त्यांनी पिंपरी, भंडारवाडी, कोपरा, बोधडी व पार्डी, कोपरा या गावांना भेट देऊन पूरग्रस्त शेती, घरे तसेच नागरिकांच्या समस्या जाणून घेतल्या. त्यांच्या समवेत तहसीलदार डॉ. शारदा चौंडेकर, माजी नगराध्यक्ष आनंद मच्छेवार, जिल्हा बॅंकेचे माजी अध्यक्ष दिनकर दहिफळे, जिल्हा उपाध्यक्ष संदिप केंद्रे, माजी जिल्हा परिषद सदस्य भागवान हुरदुके, मुसा खान, बाजार समितीचे संचालक श्रीराम कांदे, विवेक केंद्रे, कपिलकुमार कांबळे, तसेच संबंधित गावांचे सरपंच, उपसरपंच, ग्रामपंचायत सदस्य आणि नागरिक उपस्थित होते. या दौऱ्यात आमदार भीमराव केराम यांनी शेतकऱ्यांशी प्रत्यक्ष संवाद साधून त्यांच्या व्यथा जाणून घेतल्या. पूरामुळे झालेले शेतीचे नुकसान, घरांची झालेली हानी तसेच गावातील रस्ते व पूल यासंदर्भातील समस्या त्यांनी गांभीर्याने ऐकून घेतल्या. यावेळी आमदार केराम यांनी त्वरित रस्ते व पूल दुरुस्तीसाठी संबधीतांना आवश्यक त्या सूचना दिल्या.

शेतकरी व नागरिकांशी बोलताना आमदार केराम यांनी शासनाकडून लवकरच योग्य ती मदत मिळवून देण्याचे आश्वासन देत बांधावर जाऊन शेतक-यांचे अश्रु पुसतांना आपल्या भावना व्यक्त केल्या. या आश्वासनामुळे पूरग्रस्त शेतकऱ्यांना व नागरिकांना दिलासा मिळाला.

# भर पावसात कृषीमंत्री दत्तात्रय भरणे यांची अतिवृष्टी बाधित भागास भेट



**तभा वृत्तसेवा**
**हदगाव, दि. २० ऑगस्ट -**

तालुक्यातील करमोडी या ठिकाणी महाराष्ट्र राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांनी भर पावसात बाधित क्षेत्राची पाहणी करून राज्याचे मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस, उपमुख्यमंत्री एकनाथ शिंदे , उपमुख्यमंत्री अजित पवार हे संपूर्ण परिस्थितीवर लक्ष ठेवून आहेत लवकरच पंचनामे होऊन शासनातर्फे जे मदत शक्य आहे ते मदत पूर्ण केली जाईल असे आश्वासन यावेळेस कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी दिली.यावेळी आ. बाबुराव कदम कोहळीकर , जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, जिल्हाप्रमुख विवेक देशमुख , माजी खासदार सुभाषराव वानखेडे, भाजपाचे उत्तर जिल्हाध्यक्ष किशोर देशमुख, अनिल पाटील बाभळीकर, निळू पाटील कल्याणकर यांच्यासह महायुतीतील पदाधिकारी, कार्यकर्ते व शेतकरी बांधव उपस्थित होते.

हदगाव- हिमायतनगर ला काही दिवसा पूर्वी अति मुसळधार पावसाचा जबरदस्त तडाका बसला होता त्यातच भर म्हणजे ईसापुर धरणातून पैनगंगा नदीत मोठ्या प्रमाणावर पाणी विसर्ग करण्यात आले होते यादरम्यान हदगाव- हिमायतनगर तालुक्याचे आमदार कोहळीकर यांनी संपूर्ण मतदारसंघ पिंजून काढत शेतकरी बांधवांना धीर देण्याचे काम केले यानंतर त्यांनी राज्याचे कृषिमंत्री दत्तात्रय भरणे यांना हदगाव तालुक्यातील करमोडी पूर बाधित परिस्थितीचा आढावा घेण्याचे अनुषंगाने त्यांचा दौरा आज पार पडला व यावेळी कृषी मंत्री दत्तात्रय भरणे यांनी आश्वासित केले की, पूर्ण पंचनामे झाल्यानंतर काही ठिकाणी पंचनामे अद्यापही करायचे बाकी असून त्यानंतर शासनातर्फे मदत देण्यात येणार असल्याची ग्वाही यावेळेस शेतकरी बांधवांना दिली.

# शहीद सुधाकर शिंदे यांचे स्वप्न विद्यार्थ्यांनी साकार करावे : असिस्टंट कमांडंट प्रविण नारंजे



**तभा वृत्तसेवा**
**नांदेड, दि. २० ऑगस्ट -**

गावातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून शासकीय सेवेत रुजू व्हावे हे शहीद सुधाकर शिंदे यांचे स्वप्न विद्यार्थ्यांनी साकार करावे, असे आवाहन असिस्टंट कमांडंट प्रविण नारंजे यांनी केले.

छत्तीगढ येथे नक्षली चकमकीत शहीद झालेल्या सुधाकर शिंदे यांच्या स्मृतीदिनानिमित्त मुखेड तालुक्यातील बामणी येथे आयोजित गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार व करिअर मार्गदर्शन सोहळ्यात ते बोलत होते. यावेळी तहसीलदार राजेश जाधव, प्यारनबी सायमियाँ शेख, पोलीस निरीक्षक विजय प्रतापसिंह, वीरपत्नी सुधा सुधाकर शिंदे, माजी सैनिक अध्यक्ष लालबा पिल्लेवाड यांची उपस्थिती होती.

पुढे बोलताना असिस्टंट कमांडंट प्रविण नारंजे म्हणाले की, देशाचे रक्षण करत असताना २०२१ मध्ये छत्तीगढ येथे नक्षली चकमकीत सुधाकर शिंदे यांना वीर मरण आले. शहीद सुधाकर शिंदे हे गरीब परिस्थितीतून शिक्षण घेत सैन्य दलात अधिकारी झाले होते. गावातील विद्यार्थ्यांनी शिक्षण घेवून अधिकारी व्हावे हे त्यांचे स्वप्न होते. शहीद सुधाकर शिंदे यांचे हे स्वप्न विद्यार्थ्यांनी साकार करावे, असे आवाहन नारंजे यांनी केले. यावेळी गुरुजी फाऊंडेशनच्या वतीने गुणवंत विद्यार्थ्यांचा सत्कार करण्यात आला.

या कार्यक्रमास सुधाकर घोडके, राजू पवार, योगेश पाचपुते, मुख्याध्यापक कुलकर्णी, अर्जुन भोसले, माधव पाटील, मनुसाब शेख, व्यंकटराव पाटील, गुरुनाथअप्पा भायकाटे, विनोद शिंदे, अनिल पारडे, दस्तगीर शेख, प्रा.संजय शिंदे, शिवराज शिंदे, रामराव कांबळे, गुरुजी फाऊंडेशनचे अध्यक्ष यशपाल भोसले, उपाध्यक्ष सतीश इंगोले यांची उपस्थिती होती.

### संतोष गाडले यांचे वडीलांच्या पावलांवर पाऊल

# मातंग समाज स्मशानभूमी रस्त्यासाठी दिली तीन गुंठे जमीन दान



**तभा वृत्तसेवा**
**नरसी, दि. २० ऑगस्ट -**

नायगाव तालुक्यातील मुगाव येथील मातंग समाजाला वर्षानुवर्षे स्मशानभूमीसाठी झगडावे लागत असल्याने त्याच गावातील विश्वनाथ चंदर गाडले या दानशूर व्यक्तींने त्यांचे शेत गट क्रमांक २७४ मधील पाच गुंठे स्वतःची जमीन देऊन मातंग समाजाच्या स्मशानभूमीचा प्रश्न मोठ्या मनाने सोडवला होता .परंतु १९९३ पासून ते आजपर्यंत सदर स्मशानभूमीसाठी जाण्यासाठी रस्ता नसल्याने अनेक वाद निर्माण झाले होते. सदर स्मशानभूमीसाठी रस्ता नसल्याने मुगाव येथील मातंग समाजाच्या वतीने शासन दरबारी विनंती ही करण्यात आली होती. परंतु सदर स्मशानभूमी ही वैयक्तिक गटातील शेतमालकांनी दिली असल्याने सदर वाद हा गावात आपापसात बसून मिटवावा असा सल्ला शासनाकडून देण्यात आल्याचे सांगण्यात येते. परंतु जेव्हा हा वाद त्याच शेतमालकाच्या मुलाच्या कानावर पडला व स्वतःच्या मनाला असे वाटले की आपल्या वडिलाने मातंग समाजाच्या स्मशानभूमीसाठी एवढ मोठ पुण्याचे काम केले आहे. आज त्या स्मशानभूमीसाठी जाणे येणे करण्यासाठी रस्ता नसल्याने अनेक वेळा या गावात वाद निर्माण होत आहेत. हे लक्षात आल्याने विश्वनाथाचे वंशज संतोष विश्वनाथ गाडले यांनी मनाचा मोठेपणा व आपण वडीलाप्रमाणे काहीतरी पुण्य करावे. म्हणुन त्यांनी त्याच गटातील आपल्या स्वतःच्या नावे असलेली तीन गुंठे जमीन स्मशान भूमीच्या रस्त्यासाठी या मातंग समाजाला मनाचा मोठेपणा ठेवून आज तब्बल ३२ वर्षाच्या नंतर दिल्याने मातंग समाजात या दोन्हीही जमीन दानकर्ते गाडले परिवारावर ऋण व्यक्त केले.

मुगाव येथील सामाजिक कार्यकर्ते बाबाराव भालेराव व मारोती जुटुलकर, यांच्या पुढाकाराने व समवेत अनेक कार्यकर्त्यांनी स्मशान भूमीच्या जागेसाठी सरकार दरबारी चक्रा मारून काहीच उपयोग झाला नसल्याने शेवटी मनाचा मोठेपणा ठेवत मुगाव येथील जाणकार शेतकरी संतोष विश्वनाथ पाटील गाडले या शेतकऱ्याने आपली स्वतःची मालकी हक्काची जमीन देऊन येथील मातंग समाजाच्या स्मशानभूमीच्या रस्त्याचा प्रश्न कायमचा मिटवल्याने समाजाच्या वतीने त्यांचे खूप खूप आभार व अभिनंदन करण्यात येत आहे कारण आजच्या जमान्याला जमिनीचे भाव गगनाला पोहोचले असताना आजही सामाजिकतेची जाण ठेवून कुठलाही विचार न करता निस्वार्थपणे जमीन दान करणारे व्यक्ती आहेत अशी भावना गावात व परिसरात व्यक्त होत आहे .

शेवटी शासन दरबारी न मिळालेली जमीन गावातील या शेतकऱ्यांनी मातंग समाजाला सर्व गावकऱ्यासमोर व उपस्थित सामाजिक कार्यकर्ता बाबुराव भालेराव, मारुती जुटुलकर, चंद्रकांत वाघमारे, शेषेराव तलवारे, दादाराव बैलकर, गोविंद बैलकर, बळी जुटुलकर ,साहेबराव जुटुलकर, मारुती मास्तर ,सुनील तलवारे, शंकर बैलकर, सोपान भालेराव ,अशोक बैलकर, शंकर ओमप्रसाद बैलकर, विलास जुटुलकर ,बापूसाहेब जुटुळकर ,रामा कांबळे, शाम कवडेकर यासह गावातील प्रतिष्ठित नागरिक व सरपंच माजी सरपंच ग्रामपंचायत सदस्य आणि पोलीस पाटील आदी उपस्थित होते.

**माणुसकीच्या नात्यानेच हे कार्य: विश्वनाथ गाडले**

मातंग समाजाच्या स्मशानभूमीसाठी रस्ता उपलब्ध करून आम्ही समाजाप्रती असलेली बांधिलकी जोपासली आहे कुणी आमचे आभार मानावेत एवढं मोठं कार्य नक्कीच नसून ते आमचं कर्तव्यच होतं माणुसकीच्या नात्यानेच हे कार्य आम्ही केलेला आहे यातच खूप मोठे समाधान असल्याचे विश्वनाथ संतोष पाटील गाडले यांनी सांगीतले

**३० वर्षापासुन रखडलेला प्रश्न सुटला**

२५ ते ३० वर्षापासून रखडलेला मातंग समाजाच्या स्मशानभूमीच्या रस्त्याचा प्रश्न शेतमालक संतोष विश्वनाथ पाटील गाडगे यांनी स्वतःच्या मालकी हक्काची तिन गुंठे जमीन देऊन मातंग समाजाचा व गावकऱ्यांचा विचार करून कुठलीच अपेक्षा न करता आपल्या वडिला प्रमाणेच निस्वार्थ भावनेतून स्मशानभूमी ला जाण्यासाठी रस्ता दिल्याबद्दल मुगाव येथील मातंग समाज त्यांचा कायम ऋणी असल्याची भावना व्यक्त केली.

# नुकसानग्रस्तांना शासनाकडून सर्वतोपरी मदत केली जाईल : आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन



**तभा वृत्तसेवा**
**बाऱ्हाळी, दि. २० ऑगस्ट -**

मुखेड तालुक्यातील लेंडी धरणाच्या प्रभावक्षेत्रात मोठ्या प्रमाणात अतिवृष्टी झाल्याने रावणगाव, हसनाळ, भिंगोली, भासवाडी या गावामध्ये पाणी शिरले. या गावांमध्ये मोठ्याप्रमाणात जनावरांचे नुकसान होऊन ५ नागरिकांचा मृत्यू झाला आहे. अनेक हेक्टर क्षेत्रावरील शेतीचे नुकसानही झाले आहे. या नुकसानीचा अंदाज घेऊन नुकसानग्रस्त गावातील नागरिकांना शासनाच्यावतीने सर्वतोपरी मदत करण्यात येईल, अशी ग्वाही राज्याचे जलसंपदा (विदर्भ, ताणी व कोकण पाटबंधारे विकास महामंडळ), आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांनी दिली. यावेळी मृत्तांच्या वारसदारांना प्रत्येकी ४ लाख रुपयांची मदत धनादेश स्वरुपात मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते वितरीत करण्यात आली.

नांदेड जिल्ह्यात नुकसानग्रस्त भागाची पाहणी करण्यासाठी मंत्री गिरीश महाजन हे दौऱ्यावर आले. त्यांनी मुखेड तालुक्यातील हसनाळ या गावातील पूरग्रस्त भागाची पाहणी करुन येथील नागरिकांची भेट घेऊन त्यांच्या समस्या जाणुन घेतल्या. तसेच मारजवाडी या पुर्नवसीत गावालाही त्यांनी भेट देऊन तेथील गावकऱ्यांशी संवाद साधला.

याप्रसंगी आमदार डॉ. तुषार राठोड, जिल्हाधिकारी राहुल कर्डिले, पोलीस अधिक्षक अबिनाश कुमार, अप्पर जिल्हाधिकारी पांडुरंग बोरगावकर, देगलूरचे उपविभागीय अधिकारी अनुप पाटील,मूक्रमाबाद पोलीस ठाण्याचे स.पो.नि.राजेश चव्हाण यांच्या सह परिसरातील शेतकरी, नागरिक आदींची उपस्थिती होती. यावेळी आमदार डॉ. तुषार राठोड यांनी या भागात पूरपरिस्थितीमुळे झालेल्या नुकसानीची माहिती मंत्री गिरीश महाजन यांना दिली.

यावेळी मंत्री गिरीश महाजन यांनी तात्काळ पंचनामे करण्याचे जिल्हा प्रशासनाला निर्देश दिले. त्यांनी स्थानिक नागरिकांच्या समस्याही जाणून घेतल्या. त्यांच्या या समस्यांबाबत लवकरच मुख्यमंत्री देवेंद्र फडणवीस यांच्या अध्यक्षतेखाली बैठक घेऊन त्या सोडविण्यात येतील, असे त्यांनी सांगितले. तसेच या भागातील नुकसानग्रस्तांचा रोष जलसंपदा विभागाच्या अधिकाऱ्यांवर असल्याचे कळल्यानंतर याबाबत लवकरच चौकशी करुन दोषी असणाऱ्या अधिकाऱ्यांवर कार्यवाही करण्यात येईल, असे मंत्री गिरीश महाजन यांनी स्पष्ट केले.

**मृतांच्या वारसदारांना मदत**

नैसर्गिक आपत्तीमध्ये मृत्यू झालेल्या नागरिकांच्या वारसदारांना यावेळी प्रत्येकी ४ लाख रुपयाची मदत धनादेश स्वरुपात आपत्ती व्यवस्थापन मंत्री गिरीश महाजन यांच्या हस्ते देण्यात आला. मृत्यू झालेल्या व्यक्ती व त्यांचे वारसदार याप्रमाणे आहेत. मृत्य व्यक्ती पिराजी म्हैसाजी थोटवे (वय ७०) त्यांचे वारस मारोती पिराजी थोटवे मुलगा. चंद्रकला विठ्ठल शिंदे (वय ३५) त्यांचे वारस विठ्ठल व्यंकटराव शिंदे पती. ललिताबाई गोविंद भोसले (वय ६०) त्यांचे वारस मुलगा जगदीश गोविंद भोसले व मधुकर गोविंद भोसले. भीमाबाई हिरामण मादाळे (वय ६५) त्यांचे वारस संग्राम हिरामण मादाळे, राहुल हिरामण मादाळे मुले. गंगाबाई गंगाराम मादाळे (वय ६५) त्यांचे वारस मुलगी लालाबाई व्यंकट मादाळे यांना मदतीचा धनादेश सुपूर्द करण्यात आला.